# ‘‘ पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयांचा चिकित्सक अभ्यास ’’

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पूणे
तात्विक व सामाजिक विद्याशाखेअंतर्गत
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील एम्.फिल. पदवीसाठी
सादर केलेला प्रबंध


**✲ संशोधक ✲**

श्री. कोरे योगीराज बबनराव
**(M.A. M. lib. & I. Sci.)**
**(PRN 10413001113)**

**✲ मार्गदर्शक ✲**

प्रा. डॉ. श्री. मनोज कुलकर्णी,
(वरिष्ठ ग्रंथपाल, यशदा पूणे)

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पूणे


जुलै २०१६

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री. कोरे योगीराज बबनराव (कायम नोंदणी क्र. १०४१३००१११३) यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पूणे येथून सदर प्रकल्प माझ्या मार्गदर्शनाखाली सन २०१३–२०१४ या शैक्षणिक वर्षात पूर्ण केला आहे.

**मार्गदर्शकाचे नांव :–  प्रा. डॉ. श्री. मनोज कुलकर्णी,**
**(वरिष्ठ ग्रंथपाल, यशदा पूणे)**

**दिनांक :–**

**ठिकाण :–** **मार्गदर्शकाची सही**

# अभ्यासकाचे प्रमाणपत्र

सदर प्रकल्प मी श्री. कोरे योगीराज बबनराव (कायम नोंदणी क्र. १०४१३००१११३) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पूणे येथून सन २०१३–२०१४ या शैक्षणिक वर्षात स्वत: तयार केला असून त्यातील सर्व संशोधन माझे स्वत:चे आहे.

पूर्वी या विषयावर संशोधन झालेले नाही. याचीही मी खात्री करून घेतलेली आहे.

**दिनांक :–**

**ठिकाण :–** **अभ्यासकाची सही**

**श्री. कोरे योगीराज बबनराव**

# ऋणनिर्देश

संशोधकास हा संशोधन प्रकल्पपूर्ण करण्यासाठी सर्व प्रथम माझे आई, वडिल यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संशोधन प्रकल्प पूर्ण करित असताना माझ्या हातून कळत नकळत चुक झाल्या तरी समजून सांगणारे, सतत प्रोत्साहन देणारे मार्गदर्शक गुरूवर्य प्रा. डॉ. श्री. मनोज कुलकर्णी सर यांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने मातृभाषेतून शिक्षणाची दारे खुली करून दिली त्याबद्दल मी प्रथम विद्यापीठाचा मन:पूर्वक आभारी आहे. विद्यापीठाच्या '' विद्या बोधकारी यश: सुखकारी विद्या गुरूणां गुरू '' या ब्रिदवाक्याप्रमाणे त्यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातून विद्या निष्णात हा अभ्यासक्रम उपलब्ध करून दिला त्याबद्दल मी त्यांचा मन:पूर्वक ऋणी आहे.

तसेच विद्यापीठ ग्रंथपाल डॉ. सौ. खंदारे मॅडम, ग्रंथालयातील सुजाता मॅडम, अर्चना मॅडम, मित्रांच्या सहकार्याने हा प्रकल्प पूर्णत्वास आला त्याबद्दल मी सर्वांचे मन:पूर्वक आभारी आहे. तसेच हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पत्नी सौ. सपना हिने घरातील कामाची जबाबदारी संभाळून लेखन कार्य पूर्ण केले त्याबद्दल तिचेही आभार मानने हे माझे कर्तव्य समजतो. तसेच श्री. हेमंत किरकिसे यांनी टायपिंगचे काम वेळेवर पूर्ण करून दिले त्याबद्दल आभारी आहे. तसेच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभारी आहे.

# अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकरणाचे तपशिल | पान नंबर |
|---|---|---|
| | **मुखपृष्ठ** | I |
| | **मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र** | II |
| | **अभ्यासकाचे प्रमाणपत्र** | III |
| | **ऋणनिर्देश** | IV |
| | **अनुक्रमणिका** | V-VIII |
| | **प्रकरण पहिले – संशोधनाची पार्श्वभूमी** | |
| १.१ | प्रस्तावना | १ |
| १.२ | संशोधन शिर्षक | १–२ |
| १.३ | संशोधन विषयाची निवड | २ |
| १.४ | संशोधन | २ |
| १.५ | संशोधनाचे महत्व | २ |
| १.६ | संशोधनाची गरज | ३ |
| १.७ | संशोधनाची उद्दिष्टे | ३ |
| १.८ | संशोधनाची गृहितके | ३ |
| १.९ | संशोधनाचे स्वरूप | ३–६ |
| १.१० | संशोधनाचे तंत्र | ६–७ |
| १.११ | अहवाल लेखन | ७ |
| १.१२ | संशोधनाची समस्या | ७ |
| १.१३ | व्याप्ती व मर्यादा | ८ |
| १.१४ | पंढरपूर शहराचा इतिहास | ८–९ |
| १.१५ | पंढरपूर क्षेत्राची प्राचिनता | ९–१० |

| | | |
|---|---|---|
| १.१६ | पंढरपूर शहराचा थोडक्यात परिचय | ११–१३ |
| १.१७ | पंढरपूरचे हवामान व नवीन बदल | १३–१५ |
| १.१८ | यात्रा वर्णन | १५–२० |
| १.१९ | मठ | २१–२३ |
| | **प्रकरण दुसरे – पूर्व अभ्यासाचे समालोचन** | |
| २.१ | प्रस्तावना | २४ |
| २.२ | सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासात शासनाचे प्रयत्न | २४–२५ |
| २.३ | सार्वजनिक ग्रंथालय उदय आणि विकास | २५–२७ |
| २.४ | सार्वजनिक ग्रंथालय स्थापना | २७–२८ |
| २.५ | युनेस्को :– सार्वजनिक ग्रंथालय जाहिरनामा १९४९ | २८–२९ |
| २.६ | भारतातील सार्वजनिक ग्रंथालयाचा विकास | २९–३० |
| २.७ | सार्वजनिक ग्रंथालयाची सामाजिक कार्य व उद्दीष्टये | ३०–३४ |
| २.८ | संशोधन विषयाचा पुर्वाभ्यास | ३५–३८ |
| | **प्रकरण तिसरे – माहिती संकलन** | |
| ३.१ | प्रस्तावना | ३९ |
| ३.२ | सामाजिक योगदानाचा अर्थ | ४० |
| ३.३ | ग्रंथालय एक सामाजिक संस्था | ४०–४२ |
| ३.४ | ग्रंथालय आणि समाज | ४३ |
| ३.५ | ग्रंथालय आणि शिक्षण | ४३–४४ |
| ३.६ | ग्रंथालय आणि माहिती संप्रेषण | ४४ |
| ३.७ | ग्रंथालयाचे प्रकार | ४४–४५ |
| ३.८ | कार्यक्षम सार्वजनिक ग्रंथालये समाजाची गरज | ४५–४६ |
| ३.९ | सार्वजनिक ग्रंथालये स्वरूप व महत्व | ४६ |

| | | |
|---|---|---|
| ३.१० | सार्वजनिक ग्रंथालयाचे स्वरूप | ४७ |
| ३.११ | सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्य | ४७–५० |
| ३.१२ | राजाराम मोहन राय ग्रंथालय प्रतिष्ठानची अर्थ सहाय्याच्या योजना | ५०–५३ |
| ३.१३ | पंढरपूर शहराचा इतिहास | ५३–५४ |
| ३.१४ | संशोधन | ५४ |
| ३.१५ | संशोधनाची व्याख्या | ५४–५५ |
| ३.१६ | संशोधनाचे प्रकार | ५५ |
| ३.१७ | संशोधन पध्दती | ५६–५८ |
| ३.१८ | माहिती संकलनाची तंत्रे | ५८–६१ |
| ३.१९ | अनुसुचीचे प्रकार | ६२ |
| ३.२० | माहिती संकलनाची साधने | ६३–६७ |
| ३.२१ | माहिती संकलन | ६७ |
| | **प्रकरण चौथे – माहिती सादरीकरण आणि विश्लेषण** | |
| ४.१ | प्रस्तावना | ६८ |
| ४.२ | आशय विश्लेषणाची संकल्पना | ६९ |
| ४.३ | ग्रंथालयाचा परिचय | ६९–८७ |
| ४.४ | ग्रंथालय कार्यालयीन वेळ | ८७ |
| ४.५ | ग्रंथालयातील उपलब्ध ग्रंथेत्तर साहित्य | ८८–८९ |
| ४.६ | ग्रंथालयातील विभाग | ८९–९० |
| ४.७ | ग्रंथ खरेदी | ९१ |
| ४.८ | सार्वजनिक ग्रंथालयातील उपक्रम | ९२ |
| ४.९ | नियतकालके | ९३ |
| ४.१० | वर्तमानपत्रे | ९४ |

| | | |
|---|---|---|
| ४.११ | ग्रंथालयीन सुविधा | ९५ |
| ४.१२ | ग्रंथालयातीन उपाययोजना | ९६–९८ |
| ४.१३ | ग्रंथालयांना मिळालेले पुरस्कार | ९९ |
| ४.१४ | ग्रंथालयांना भेडसावणाऱ्या समस्या | ९९–१०० |
| ४.१५ | भविष्यकालीन योजना | १०० |
| | **प्रकरण पाचवे – निष्कर्ष व शिफारशी** | |
| ५.१ | प्रस्तावना | १०१ |
| ५.२ | निष्कर्ष | १०२–१०३ |
| ५.३ | शिफारशी | १०३ |
| ५.४ | नविन संशोधनासाठी दिशा | १०४ |
| ✻ | **प्रश्नावली** | १०५–११६ |
| ✻ | **संदर्भ ग्रंथ सुची** | ११७ |

# <u>प्रकरण पहिले</u>

# संशोधनाची पार्श्वभूमी

## १.१) प्रस्तावना :–

आजचे युग हे स्पर्धात्मक युग आहे. आजच्या या युगात प्रत्येकाला आपला व्यक्तीमत्व विकास घडविण्यासाठी नवनवीन ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी महत्वाकांक्षा वाढत चालली आहे. शिक्षण क्षेत्रात संशोधनात तसेच समाजाभिमुख कार्यासाठी ग्रंथालयांना तसेच दुर्मिळ संत साहित्यांना अनन्य साधारण महत्व आहे. अनेक नवनवीन संकल्पना ग्रंथ साहित्याची माहिती मिळविण्यासाठी संशोधकास या पंढरपूर शहरातील वारकरी सांप्रदायाचे जे संताचे धार्मिक वाचन आहे वाचकाच्या गरजेनुसार अभ्यास करण्यासाठी संत साहित्याचा उपयोग होणार आहे. सार्वजनिक ग्रंथालये ही समाज प्रबोधनाची महत्वाची केंद्रे मानली जातात. समाज प्रबोधनाची महत्वाची केंद्रे मानली जातात. समाज प्रबोधनामध्ये वाचन साहित्याला महत्वाचे स्थान असते. महाराष्ट्र हे सांस्कृतिक वारसा असलेले राज्य आहे. या परंपरेमध्ये संत साहित्य आणि त्यांची कार्ये यांनी मोलाची भर घातली आहे. विशेष करून भागवत धर्माची पताका संत नामदेवांनी पंजाब पर्यत पोचविण्याची नोंद इतिहासात आहे. आपल्या सांस्कृतिक वारसामध्ये ज्या ज्या घटकांचे योगदान आहे. ते घटक उजेडात आणणे, संशोधन करणे आणि पुढील पिडीत संग्रहीत करणे यासाठी प्रत्येक महत्वाच्या घटकावरती संशोधन सुरू आहे. भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार माध्यम या वारकरी सांप्रदायाच्या ग्रंथालयाने आपल्यापरीने अत्यंत दुर्मिळ अशा पोथ्यापुराणे आणि पुस्तकाचे जतन केलेले आहे.

## १.२) संशोधन शिर्षक – व्याख्या –

संशोधकाने निरीक्षण वृत्तीने उत्सुकतेने या ग्रंथालयाच्या व्यक्तीस भेटीने तेथील पदाधिकाऱ्यांची त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या ग्रंथसंग्रहाबाबतची चर्चा केली या ग्रंथालयात अत्यंत दुर्मिळ हस्तलिखित पोथ्या, पुराणे पंढरपूर शहराचा इतिहास, विठ्ठल रूक्मिणी दैवत वारकरी सांप्रदाय इ. बद्दल माहिती घेतली.  या प्रकल्पामुळे पंढरपूर शहराचा इतिहास आणि

शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाबाबतची माहिती मिळू शकेल. कोणत्या ग्रंथालयामध्ये किती वाचन साहित्य आहे, कोणत्या प्रकारचे आहे तसेच वारकरी सांप्रदाय आणि ग्रंथालयाचा विकास याबाबत वेगळी माहिती प्रकाश झोतात येवू शकेल. या संशोधनासाठी एक वेगळा विषय हाताळावा व दुर्लक्षित दुर्मिळ वाचन साहित्य समाजापुढे यावे या उद्देशाने हा उपाय निवडला आहे.

### १.३) संशोधन विषयाची निवड :-

आजकाल आधुनिक युगामध्ये प्रसार माध्यमाचा मोठ्या प्रमाणात भडीमार होत आहे. आज कालचे जीवन हे धावपळीचे बनत चालले आहे आधुनिक युगामध्ये संगणक टेलिव्हीजन क्षेत्राचा मोठ्या  प्रमाणात वापर होत आहे. समाजातील प्रत्येकजण त्याला हवी असणारी माहिती संगणकाव्दारे मिळवून आपल्या ज्ञानात वाढ करतो आहे. २१ वे शतक हे स्पर्धेचे युग आहे त्यामुळे समाजामध्ये वाचन संस्कृती लोप पावत आहे ही वाचन संस्कृती जतन करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालय तयार होणे गरजेचे आहे. वाचन संस्कृती जतन करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालय महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. यासाठी संशोधकाने, ' पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाचा चिकित्सक अभ्यास ' हा विषय निवडला आहे. याद्वारे संशोधकाने सार्वजनिक ग्रंथालय परिस्थितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

### १.४) संशोधन :-

संशोधकाने '' पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयांचा चिकित्सक अभ्यास '' या विषयाची निवड केली आहे.

### १.५) संशोधनाचे महत्व :-

संशोधकाने निवडलेल्या विषयाचे महत्व असे की, आजकाल समाजामध्ये संगणक, टेलिव्हीजन, सोशल नेटवर्किंगचा वापर खूप मोठ्या प्रमाणावर होत आहे. यामुळे वाचन संस्कृतीचा ऱ्हास होत आहे. वाचन संस्कृती जतन करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालय महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. सार्वजनिक ग्रंथालय ही भारतीय समाजामध्ये 'लोकविद्यापीठ म्हणून नावारूपास येत आहेत. या सार्वजनिक क्षेत्रातील ग्रंथालयाची संपूर्ण माहिती व्हावी यासाठी संशोधकाने हा विषय निवडला आहे.

**१.६) संशोधनाची गरज :-**

संशोधकाला ' पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाचा चिकित्सक अभ्यास ' या विषयाची गरज निर्माण झाली कारण आज २१ व्या शतकामध्ये भारतीय समाजामध्ये वाचन संस्कृती लोप पावत आहे. ती टिकविण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालय महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. यासाठी राष्ट्रीय पातळीवर राजाराम मोहन राय फाऊंडेशन ही स्वायत्त संस्था कार्यरत आहे. ही सार्वजनिक ग्रंथालयाना अनुदान देण्याचे कार्य करते. या संस्थेचे कार्य कसे चालते. ही संस्था निर्माण कशी झाली, याबद्दलची माहिती व्हावी ही गरज जाणून संशोधकाने वरील विषयाची निवड केली.

**१.७) संशोधनाची उद्दिष्टे :-**

पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाचा आढावा घेणे.

**१.८) संशोधनाची गृहितके :-**

सार्वजनिक ग्रंथालयांचा आधुनिकतेविषयी अजून प्रयत्न नाहीत.

**१.९) संशोधनाचे स्वरूप :-**

'' पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयातल चिकित्सक अभ्यास '' हा संशोधनासाठी विषय घेण्याचे प्रमुख कारण म्हणजे आपल्या शहराचा वाचनालयाचा परिपूर्ण अभ्यास करता येईल व त्याचे स्वरूपही मांडता येईल. संशोधनाचे स्वरूप हे जरी मोठे होत असले तरी विषयाला व मुद्द्यांना धरून संशोधन करण्याचा प्रयत्न करता येईल. हा विश्वास मनाशी ठेवून संशोधनाचे स्वरूप ठरविले आहे. सध्याच्या काळात सार्वजनिक ग्रंथालयांना जे मर्यादित अनुदान व आर्थिक उत्पन्न मिळते. त्या मानाने वाचक संख्या वाढते आहे व कामाच्या जबाबदारीत ही वाढ होत आहे. अनंत समस्या या ग्रंथालयांना भेडसावत असतात. सार्वजनिक ग्रंथालय हे खऱ्या अर्थाने लोक विद्यापीठ म्हणून ओळखले जाते. कारण या ग्रंथालयात सर्व स्तरावरील विविध गटातील वाचक आपल्या मनोरंजन, ज्ञान, विज्ञान माहिती इत्यादी उद्दीष्ट पुर्तीसाठी येतात. म्हणून सार्वजनिक ग्रंथालयाचे महत्व वाढत आहे. सार्वजनिक ग्रंथालयाची समाजाच्या राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी

गरज आहे, कारण ग्रंथालय ही एक आता माहिती केंद्रे म्हणून ओळखली जाऊ लागली आहे. आजच्या संगणकीकृत युगात वाचकांना सर्व सोयी संगणकावर दिल्या जातात. यावरून पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी व दुसऱ्यांना सांगण्यासाठी एक छोटासा प्रयत्न केला आहे.

**१.९.१) संशोधन पध्दती :-**

संशोधनाच्या अनेक पध्दती आहेत. त्यापैकी वर्णनात्मक व सर्वेक्षण पध्दतीद्वारे संशोधन केले जाईल. त्यासाठी वाचक समुहातील माहिती शास्त्रीय पध्दतीने संकलित करण्याचा प्रयत्न केला आहे.

**१.९.२) नमुना निवड :-**

पंढरपूर शहर सार्वजनिक ग्रंथालय या ग्रंथपालाची व वाचकांची या संशोधनासाठी जनसंख्या म्हणून केली जाईल. या ग्रंथालयाचे ग्रंथपालाकरीता प्रश्नावली या अभ्यासासाठी निवडली आहे.

**अ) मुलाखत :-**

संशोधनाचा हेतू अणि उद्दीष्टानंतर माहिती संकलनासाठी ग्रंथालय कर्मचारी, संख्या पदाधिकारी इ. च्या मुलाखती घेतल्या आहेत.

**ब) प्रश्नावली :-**

संशोधनाचा हेतु आणि उद्दीष्टानुसार प्रश्नावली तयार केली व तज्ञ मार्गदर्शकांकडून तपासून घेतली. सदरची प्रश्नावली व संशोधन प्रकल्पामध्ये शेवटी सादर करण्यात आली.

**क) संशोधनाची कार्यपध्दती :-**

पंढरपूर शहर सार्वजनिक ग्रंथालय या ग्रंथपाल कर्मचारी यांचा विचार यामध्ये केला आहे. या सर्वांकडून तज्ज्ञमार्गदर्शकांनी मान्य केलेली व संगणकावर मुद्रित केलेली प्रश्नावली भरून घेतली आहे. पंढरपूर शहर सार्वजनिक ग्रंथालय सभासद नोंदवही, ग्रंथ देवघेव वही, ग्रंथ दाखल नोंदवही, वार्षिक अहवाल, जमाखर्च वही, वार्षिक तपासणी अहवाल, इत्यादी कार्यालयीन

कागदपत्रातील एक वर्षाच्या नोंदी घेतल्या जातील. तसेच संस्था पदाधिकारी, यांच्याही मुलाखती घेतल्या आहेत. ही सर्व संकलित माहिती पध्दतशीरपणे मांडली आहे.

**ड) माहिती संकलन :–**

ग्रंथालयाचे वाचक, कामकाज, सेवासुविधा इमारत इत्यादी विषयावर आधारीत ग्रंथपालाकडून प्राप्त झालेला डाटा संकलित केला आहे. संकलित केलेल्या माहितीत रूपांतर करण्यात येईल. अशा संकलित अर्थपूर्ण माहितीवर संस्कटन करण्यासाठी संख्याशास्त्रीय परिणाम वापरण्यात आली आहेत.

**१.९.८) पूर्व सहित्याचा इतिहास :–**

**संशोधन पध्दती :–**

संशोधन पध्दतीचे खालील प्रकार पडतात.

अ) वर्णनात्मक संशोधन पध्दती :–

ब) ऐतिहासिक संशोधन पध्दती :–

क) प्रायोगिक संशोधन पध्दती :–

प्रस्तुत संशोधनासाठी ' वर्णनात्मक संशोधन ' पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. वर्णनात्मक संशोधनात कोणत्याही घटनेच्या सामाजिक संस्थेच्या व एखाद्या उपक्रमाचा सद्यस्थितीचा सर्वंकष अभ्यास करून प्रगतीचा आढावा घेवून त्याचे विश्लेषणात्मक वर्णन करता येते. अशा संशोधनास वर्णनात्मक संशोधन पध्दती म्हणतात. यामध्ये सत्यशोधन वाचकासंबंधी अभ्यास, केस स्टडी, मूल्यमापन जॉब अनॅलिसिस आणि कितीतरी गोष्टी वर्णनात्मक संशोधनात समाविष्ट होते. या संशोधन पध्दतीमध्ये खालील टप्प्यानुसार काम केले जाते.

१) वस्तुनिष्ठपणे निरक्षणाद्वारे माहिती संकलन करणार आहे.

२) संकलित केलेल्या माहितीचे शास्त्रशुध्द विश्लेषण करणार आहे.

३) सखोल अभ्यास केला जाणार आहे.

४) त्याअनुषंगाने संबंधित विषयाचा अभ्यास करणे.

यामध्ये संकलित केलेली माहिती संशोधन होत नाही ही माहिती शास्त्रशुध्द पध्दतीने सादर केली म्हणजेच अर्थपूर्ण संशोधन होय.

**१.१०) संशोधनाचे तंत्र :-**

सदर प्रकल्पामध्ये संशोधक संशोधन पध्दतीत प्रत्यक्ष या तंत्राचा अवलंब करणार आहे. पाहणीतंत्र संशोधनकरीता लागणारी माहिती  निरीक्षण तंत्र, माहिती गोळा करण्यासाठी उपयुक्त आहे. तसेच प्रश्नावलीचा वापर करण्यात येणार आहे.

**१.१०.१) माहिती संकलनाची साधने :-**

संशोधनाकरिता लागणारी माहिती गोळा करण्यासाठी माहिती संकलनाची साधने म्हणून प्रश्नावली प्रत्यक्ष पाहणी, निरीक्षण करणे याचा वापर करण्यात येणार आहे.

**१.१०.२) माहिती विश्लेषण तंत्र :-**

प्रश्नावली, प्रत्यक्ष पाहणी या तंत्राचा अवलंब करून सदरील सार्वजनिक ग्रंथालयांना भेट देऊन प्रकल्प तयार करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | वाचनालयाचे नांव | वाचक | सभासद संख्या | प्रतिसाद |
|---|---|---|---|---|
| १) | नगर वाचन मंदिर, उध्दव घाट, पंढरपूर | १० | २२० | १ |
| २) | स्वा. सावरकर मुक्तव्दार वाचनालय, पंढरपूर | १० | ८८५ | १ |
| ३) | शब्दशिल्प वाचनालय, गाताडे प्लॉट पंढरपूर | १० | २५० | १ |
| ४) | दलित वाचनालय, पंढरपूर | १० | १०५ | १ |
| ५) | श्री संत ज्ञानेश्वर सार्व. ग्रंथालय, सांगोला रोड, पंढरपूर | १० | १०५ | १ |
| ६) | सुशिल सार्वजनिक वाचनालय, पंढरपूर | १० | २५० | १ |
| ७) | डॉ. द. ता. भोसले सार्वजनिक वाचनालय इसबावी, पंढरपूर | १० | १८२ | १ |

### १.१०.३) संशोधनाच्या लक्षसमुहाची निवड :-

सार्वजनिक वाचनालयातील ग्रंथपालांना प्रश्नावली देऊन प्रत्यक्ष पाहणी करून माहिती गोळा करण्यात येणार आहे.

### १.१०.४) माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण :-

अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून तसेच संशोधन नेमके कशा प्रकारे असते हे समजुन घेण्याकरीता संशोधन प्रकल्प सादर करावयाचा आहे.

### १.११) अहवाल लेखन :-

अहवाल लेखन हा संशोधनातील शेवटचा टप्पा होय. संशोधन महवालाच्या माध्यमातून ज्ञानाची प्रचिती समाजातील बुध्दीजीवि व्यक्तीचा येत असते. संशोधन अहवालात संशोधन प्रक्रियेबद्दल केवळ विश्लेषण केलेले नसते तर त्यात सैद्धांतिक सामान्यीकरणाबाबत संक्षिप्त आढावा घेतलेला असतो. अहवाल लेखन हे एक शास्त्रही व कलाही आहे. कारण अहवाल लेखनाची कृती कौशल्यपूर्ण करणे जरूरीचे असते. त्यासाठी त्याची मांडणी, सुरूवात, मध्य व शेवट अशी असावी. त्यातील भाषा कशी असावी ? आकृत्यांचा वापर कसा करावा ? कोठे करावा ? इ. बाबत संशोधनाकने जागरूक असले पाहिजे. सदर प्रकल्पात पहिल्या प्रकरणात संशोधनाचा आराखडा दिलेला आहे. दुसऱ्या प्रकारणात संशोधन साहित्याचा पूर्व इतिहास दिलेला आहे. तिसऱ्या प्रकरणात माहितीचे संकलन केलेले आहे. चौथ्या प्रकरणात माहिती विश्लेषण केलेले आहे. तर पाचव्या प्रकरणात निष्कर्ष व शिफारशी दिलेल्या आहेत.

### १.१२) संशोधनाची समस्या :-

समस्या निर्माण झाल्या की संशोधनाला सुरूवात होते संशोधन झाल्याशिवाय समस्याचे निराकरण होत नाही. म्हणून संशोधन समस्यांना खूप महत्व आहे. यासाठी सार्वजनिक ग्रंथालय या विषयाचा सर्व प्रकारचा अभ्यास करणे असे या संशोधनाचे स्वरूप आहे. त्यासाठी संशोधकाने खालील प्रमाणे संशोधन, समस्या उपलब्ध केलेली आहे व त्याची मर्यादा निश्चित केली आहे.

## १.१३) व्याप्ती व मर्यादा :-

कोणतेही संशोधन करताना या संशोधनाची व्याप्ती व मर्यादा ठरविणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधनातील व्याप्ती ही पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाची असून ग्रंथालयाच्या विविध कार्याचा व कार्यपध्दतीचा सविस्तरपणे चिकित्सक आढावा घेतला जाणार आहे. संशोधन हे पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयापुरती मर्यादित आहे.

**❊ सार्वजनिक ग्रंथालयाची नावे खालील प्रमाणे :-**

१) नगर वाचन मंदिर, उध्दव घाट, पंढरपूर

२) स्वा. सावरकर मुक्तव्दार वाचनालय, पंढरपूर

३) शब्दशिल्प वाचनालय, गाताडे प्लॉट पंढरपूर

४) दलित वाचनालय, पंढरपूर

५) श्री संत ज्ञानेश्वर सार्व. ग्रंथालय, सांगोला रोड, पंढरपूर

६) सुशिल सार्वजनिक वाचनालय, पंढरपूर

७) डॉ. द. ता. भोसले सार्वजनिक वाचनालय इसबावी, पंढरपूर

## १.१४) पंढरपूर शहराचा इतिहास :-

पंढरपूर हे दक्षिण भारतातील एक प्राचीन तीर्थक्षेत्र भारताची दक्षिण काशी म्हणून आळखले जाते. पंढरपूर हे महाराष्ट्राच्या सोलापूर जिल्ह्यातील कुर्डूवाडी या गावापासून सुमारे बत्तीस मैलावर आहे. त्याला पंढरपूर, पंढरी, पांडूरंगपूर, पंढरपूर, पौंडरीक क्षेत्र, पंडरंगे, पांडूरंगपल्ली अशी विविध नावे आहेत.

पडंरगे हा कानडी शब्द आहे त्याचे पंडरीका, पंडरी किंवा पंढरी असे रूप झाले असले पाहिजे. पंढरी या शब्दाला पूर हा नगरवाचक प्रत्यय लागुन पांढरीपूर आणि मग पंढरपूर हा शब्द बनला. डी. राज पुरोहित व डॉ. रा. गो. भांडारकर यांनी अनुक्रमे पंदुरीकापूर व पांडूरंगपूर या शब्दापासून पंढरपूर हा शब्द व्युत्पादला आहे.

पंढरपूर क्षेत्राचे महात्म्य सांगणारा पंढरी महात्म्य हा एक नामक संस्कृत ग्रंथ आहे. पंढरपूर हे तिर्थक्षेत्र भिमानदीच्या काठावर वसलेले आहे या ठिकाणी नदी अर्धचंद्राकृती वाहते म्हणून चंद्रभागा हे नांव मिळाले आहे. पंढरी महात्म्य हा ग्रंथ स्कंदपुराणांतर्गत समजला जातो. त्यामध्ये पंढरपूरचे वर्णन असे आहे.

पौण्डीकमिति ख्यात तिर्थ क्षेत्रच पूजितम ।
पांण्डूरंङःगश्च तवस्ते मूर्तिमान देवतोत्तम ।।
अर्थयोजनविस्तीर्ण तद् र्धायामसाम्तग् ।

**अर्थ :–**

भीमेच्या काठी पौंडरिक या नावाचे तीर्थक्षेत्र त्या क्षेत्रामध्ये देव श्री पांडूरंग रूक्मिणी मातेसह मूर्ति स्वरूपात रहात आहेत हे क्षेत्र अर्धायोजन लांब आहे व त्याची रूंदी दिर्घ म्हणजेच एक कोस आहे.

**यात्रा :–**

पंढरपूर या तीर्थक्षेत्री आषाढी–कार्तिकी या मोठ्या यात्रा भरतात. चैत्र व माघ मासातही यात्रा भरतात पण त्या आषाढी व कार्तिकी यांच्या तुलनेने लहान असतात यात्रेच्या वेळी देवाचे व देवीचे स्नान व पूजा सोडून इतर सर्व नित्योपचार बंद असतात आणि देव सर्वकाळ भक्तांसाठी मोकळे असतात यात्रेनंतर देवाची प्रक्षाळपूजा होते आणि त्यानंतर देवाचे नित्योपचार पुनश्च सुरू होतात.

### १.१५) पंढरपूर क्षेत्राची प्राचिनता :–

पंढरपूरला महाराष्ट्रातील भक्तीसांप्रदयाचे आद्यपीठ मानतात. त्याचा अगदी पहिला उल्लेख इ.स. ५१३ च्या ताम्रपटात पांडुरंगपल्ली या नावाने आढळतो. हा ताम्रपट राष्ट्रकूट घराण्यातील अविधेय राजाने खोदला आहे.

शके ११११ (इ.स. ११८९) मधील शिलालेख हे पंढरपूरातील आद्य व नवोपलब्ध साधन आहे प्रस्तुत शिलालेखात जो कोणी मंदिराला पीडा देईल त्याला विठ्ठलाची आण घातली आहे त्यावरून हे देऊळ विठ्ठलाचे आहे हे सिध्द होते.

गावाचा व देवाचा उल्लेख असलेला यानंतरचा शके ९५९ चा शिलालेख खुद्द मंदिरातच सोळखांबी मंडपात आहे.

**विष्णूपद :-**

पुंडलिक मंदिराच्या दक्षिणेस सुमारे दोन किलोमीटर अंतरावर विष्णूपद हे तीर्थस्नान आहे हे अति निसर्गरम्य ठिकाणी चंद्रभागेच्या पात्रात आहे. इ. स. १६४० साली सोळाखांबी आकाराचे हे मंदिर धामणकर बुवा यांनी बांधले आहे हे मंदिर बारा फूट उंचीचे आहे. मंदिराच्या मध्यभागी भगवान श्रीकृष्णाच्या पाऊलांचे, गोपाळांचे व गायीच्या खूरांचे ठसे आहेत. विष्णूपद हे वनभोनजासाठी रमणीय ठिकाण असून मार्गशीर्ष प्रतिप्रदेस पांडूरंगाच्या पादुका या ठिकाणी आणल्या जातात व महिनाभर उत्सव असतो.

**गोपाळपूर :-**

विष्णूपद मंदिराच्या जवळच नदीच्या पात्रात एक छोटेसे मंदिर दिसते ते नारदमुनीचे मंदिर आहे. विष्णूपद मंदिरापासून जवळच अर्धा किलोमीटर अंतरावर गोपाळपूर क्षेत्र आहे पायथ्याशी पुष्पावती नदी आहे. येथील गोपाळकृष्णाचे मंदिर भव्य आणि विशाल असून तेथून संपूर्ण पंढरपूरचे दर्शन घडते. मंदीराच्या पायथ्याशी संत जनाबाईचा संसार आपणास पहावयास मिळतो. संत शिरोमणी श्री नामदेव महाराजांनी येथील मूर्तीचे वर्णन एका अभंगातून असे केलेले आहे.

देहूडा चरण वाजवितो वेळू । गोपीका रमणू स्वामी माझा ।।

आज दिसत असलेले मंदिर इ.स. १७४४ साली बांधण्यात आलेले आहे.

**गोपाळकाल्याचा इतिहास :-**

भगवान श्रीकृष्ण व त्यांचे सवंगडी यांनी आपल्या घरून शिदोरी आणून ती एकत्र केली व वनभोजन साजरे केले. त्यालाच काल्याचा प्रसंग किंवा गोपाळकाला असे म्हणतात आषाढी यात्रेच्या पौर्णिमेच्या  दिवशी येथे सर्व वारकऱ्यांच्या उपस्थितीत गोपाळकाला केला जातो यावेळी सर्व लोक उत्साहाने सहभागी होतात.

## १.१६) पंढरपूर शहराचा थोडक्यात परिचय :-

जनता जनार्दनाची मायमाऊली आणि दुखीतांची सावली असणारी पंढरी नगरी म्हणजे महाराष्ट्राची दक्षिणकाशी व पवित्र तीर्थक्षेत्र आहे. मराठी संस्कृती घडविणाऱ्या थोर भागवत धर्मिय संतानी नावारूपास आणलेले हे महाराष्ट्राचे आद्य व पवित्र तिर्थक्षेत्र म्हणजेच पंढरपूर होय. पंढरपूर येथील विठ्ठल मंदिर अवघ्या महाराष्ट्राचे एक चिरंतन स्फूर्तीस्थान आहे समुद्रसपाटीपासून ४५० मीटर उंचीवर आणि १७०४१ इंच व उत्तर अक्षांशास ७५.२३ इंच पूर्ण रेखांशावर असणारी ही नगरी महाबळेश्वर येथे उगम पावलेली भिमा नदीच्या काठावरती आहे भिमानदी ही जेथून उगम पावली आहे तेव्हापासून स्वत:च्या प्रवाहाने वळणे घेत आलेली आहे. या वळणामुळे पंढरपूर येथे चंद्राकृती आकार निर्माण झालेलाआहे त्यामुळे या नदीला चंद्रभागा नदी असे नांव पडले आहे. पंढरपूरची लोकसंख्या १९७१ साली ५३६३८ एवढी होती. सोलापूर जिल्ह्यातील याच नावाच्या तालुक्याचे ते मुख्य ठिकाण असून सोलापूरच्या पश्चिमेस ७१ कि.मी. अंतरावर भिमानदीच्या उजव्या तीरावर समुद्र सपाटीपासून ४५० कि.मी. उंचीवर वसलेले आहे. हे मिरज कुर्डूवाडी अरूंद लोहमार्गावरील स्थानक असून येथून महाराष्ट्रात सगळीकडे जाणारी रेल्वे वाहतूकीची सोय आहे. या भक्तीसांप्रदायाच्या आद्यपीठात आणि भिमा नदीच्या महायोगपीठात महाराष्ट्राच्या सर्व भागातून आणि कर्नाटक तसेच देशाच्या इतर राज्यातील भागातूनही प्रतिवर्षी आषाढी व कार्तिकी शुध्द एकादशीच्या दियशी लाखोंच्या संख्येने वारकरी भाविक आणि यात्रेकरू यांची पंढरपूरात अलोट गर्दी होते.

येथील नगरपालिका १८५८ मध्ये स्थापन झाली असून गावास शुद्ध पाणी पुरवठा, अग्निशमनदल, घरगुती, औद्योगिक व्यापारी आणि सार्वजनिक उपयोगासाठी वीज इ सेवा सुविधा सवलती आहेत. नऊ रूग्णालये, व कुटुंब नियोजन केंद्र रोग प्रतिबंधक व्यवस्था केली जाते शहरातील ५६.६% लोक साक्षर व शिक्षित आहेत. येथे वाङमय, विज्ञान व वाणिज्य शाखांचे दोन महाविद्यालये आहेत, आठ माध्यमिक विद्यालये आहेत तर २८ प्राथमिक शाळा असून सात सार्वजनिक वाचनालये आणि एक चित्रपट गृह आहे मंदिराभोवती अरूंद फरसबंदी बोळ आहेत नव्या वस्तीत रूंद मोठमोठया इमारती आहेत तर चारशेंच्या आसपास मठ व धर्मशाळा आहेत. उदा. सेना महाराज मठ, संत दामाजी मठ, गाडगे महाराज मठ, रोहिदास मठ, तनपुरे महाराज मठ, इत्यादी मठ आणि धर्मशाळा आहेत तसेच गोरक्षण, नवरंगे बालकाश्रम, रिमांड होम, संस्कृत

पाठशाळा, मिशन रूग्णालय इ संस्था येथे मोलाचे कार्य करतात. तर दिवाणी व फौजदारी न्यायालये, एक जिल्हा सत्र न्यायालय व पोलीस ठाणे आहे. दर मंगळवारी आठवड्याचा बाजार असतो यात्रेच्या वेळी येथे गुरे व घोड्यांचा बाजार मार्केट यार्डामध्ये असतो येथे यात्रेच्या निमित्ताने कुंकु, बुक्का, अष्टगंध यांचा चांगला खप होतो. वारकऱ्यास लागणारे टाळ, मृदुंग, चिपळ्या इ. प्रकारच्या साहित्याची मोठ्या प्रमाणात उलाढाल होते.

विठ्ठल मंदिर हे अर्थातच गावातील सर्व प्रमुख मंदिर आहे विठ्ठलाचे दर्शन घेण्यापूर्वी चंद्रभागेच्या पात्रातील महाव्दार घाटावर असलेल्या भक्तपुंडलीकाचे व नामदेव पायरीजवळ असलेल्या संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेण्याची प्रथा येथे प्रचलीत आहे. पंढरपूरात भिमा नदीचा प्रवाह अर्धचंद्राकृती आहे म्हणून तिला चंद्रभागा असेही म्हणतात चंद्रभागेच्या वाळवंटात भक्त पुंडलीकाचे मंदिर आहे. येथून श्री विठ्ठल मंदिर सुमारे २०० मी. आहे. मध्यवस्तीतील हे मंदिर पूर्वाभिमुख असून त्याला पुर्वेस एक, पश्चिमेस एक, दक्षिणेस एक व उत्तरेस तीन असे एकूण आठ दरवाजे आहेत. पुर्वेकडील महाव्दाराला नामदेव पायरी असे म्हणतात मंदिरात जाण्यासाठी एकूण बारा पायऱ्या आहेत यातील पहिली पायरी म्हणजे नामदेव पायरी म्हणून ओळखली जाते संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांनी आपल्या चौदा कुटुंबीयासमवेत समाधी घेतली आहे त्यांना वंदन करून पुढे जातात पायरी समोरच उजव्या बाजूस कोपऱ्यात संत चोखामेळा यांची समाधी आहे. महाद्वारातूनच आत जाताच एक ठोटा मुक्ती मंडप लागतो तेथे उजव्या हातास विघ्नहर्ता श्री गणराय आहे. तर महाव्दाराच्या माडीवर नगारखाना आहे नंतरच्या चौकात तीन दिपमाळा व भक्त प्रल्हाद महाराज बडवे आणि कान्हा हरिदास यांच्या समाध्या आहेत. समर्थ रामदास महाराजांनी स्थापलेले हणमंताचे मंदिर व गरूडाचे मंदिर आहे यानंतर अरूंद दगडी मंडपाच्या सोप्याच्या भिंतीत तीन दरवाजे आहेत मधल्या दरवाजाच्या दोन बाजूस जय विजय हे व्दारपाल व सरस्वती आहेत. मधल्या दरवाजातून आपण सोळखांबी मंडपात जातो तेथे छतावर दशावतारांची व कृष्ण लिलेची चित्रे आहेत बाजूच्या खोलीवजा दालनात काशी, चारोधाम, राम, लक्ष्मण, काळभैरव दत्तात्रय यांची मंदिरे आहेत.

इ.स. पहिल्या दुसऱ्या शतकात किंवा त्यापुर्वी काही शतकापासून पंढरपूर हे तीर्थक्षेत्र महायोगपीठ म्हणून प्रसिध्द होते. श्रीसंत नामदेव महाराजांनी आपल्या अभंगात पंढरी विषयी लिहिले कीं,

जेंव्हा नव्हते चराचर तेंव्हा होते पंढरपूर ।
जेंव्हा नव्हती गोदा गंगा तेंव्हा होती चंद्रभागा ।।
चंद्रभागेच्या तटी, धन्य पंढरी गोमटी ।।

**१.१७) पंढरपूरचे हवामान व नवीन बदल :-**

पंढरपूरचे हवामान उष्ण आहे. परंतू जवळच चंद्रभागा नदी असल्यामुळे हवामानात वेळोवेळी बदल होतो. स्वातंत्र्य काळातील पंढरपूर आणि स्वातंत्र्यानंतरचे पंढरपूर यात लक्षणीय फक पडला आहे. नगरविकास आराखडा क्र. १ मधील चौफाळा ते पश्चिमव्दार पूर्वीपेक्षा रूंदावले असून नगरविकास आराखड्याप्रमाणे विकसित होत असून रस्ते रूंदीकरण व विकास होत आहे. आज मुळ पंढरपूर सोडून पंढरपूरच्या पश्चिमेस नगरविकास झपाट्याने होऊ लागला आहे अनेक गृहनिर्माण संस्था निर्माण झाल्या आहेत तसेच भाविकांच्या सोयीसाठी आणि नदीच्या पात्रात बारा महिने पाणी रहावे यासाठी नदीवरील जुन्या पुलाच्या अलीकडच्या बाजूस बंधारा बांधण्यात आला असून तेथे पाणी अडविले जाऊन ते दर दोन दिवसाआड नदीपात्रात सोडले जाते.

व्यवसायाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्रामध्ये एक विशेष ग्रंथालय उभे राहील व या विशेष ग्रंथालयाच्या अभ्यासाचा फायदा ग्रंथालय व्यावसायिकांना होईल. संबंधीत वाचन साहित्य जास्तीत जास्त टिकवून ठेवण्याच्या तंत्राचा अभ्यास विशेषत्वाने दुर्मिळ ग्रंथ संग्रहालयाचे ग्रंथालय अद्ययावत करण्याच्या दृष्टीने सर्वसामान्य वाचक व संशोधक यांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी होईल.

**❊ वारकरी सांप्रदाय :-**

वारकरी सांप्रदाय आणि वारकरी पंथ हे दोन्ही एकाच अर्थाचे शब्द आहेत. वारकरी लोक ज्या आचरण प्रणालीचे पालन करतात त्यामध्ये श्री विठ्ठल भक्ती प्रमुख आहे त्या धर्माला भागवत धर्म म्हणतात या भागवत धर्माचा पाया श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी घातला आणि श्री

संत तुकाराम महाराजांनी या धर्म मंदिरावर कळस चढवला म्हणूनच वारकरी पंथाचा नित्यस्मरणी महामंत्र आहे तो म्हणजे, ज्ञानोबा माऊली तुकाराम.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी श्रीमदत भगवत् गीतेवर सर्वजण सुलभ असे प्राकृत भाषेत भाष्य केले आहे ही ज्ञानेश्वरी हे मराठी वाङमयातील अनुपम लेणे आहे. भागवत धर्माचा प्रमाणभूत ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी होय. भारतातील युध्दाचा प्रारंभ मोहग्रस्त अर्जुनाला भगवान श्रीकृष्णाने कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तीयोगाचा सदुपदेश केला त्याच गीतेतील अठरा अध्यायावर ज्ञानेश्वर महाराजांनी मराठीतून भाष्य केले. वारकरी सांप्रदायामध्ये ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे अनन्यसाधारण असे स्थान आहे त्यापैकी नाथ भागवत, रामायण, नामदेव गाथा, तुकाराम गाथा इ. प्रमुख आहेत.

श्री ज्ञानेश्वर व नामदेव महाराजांच्या पूर्व काळातही विठ्ठल अस्तित्वात होता यास काही विव्दानांनी शैव सांप्रदाय मानले आहे. ज्ञानेश्वर माऊलीनी भागवत धर्म किंवा विठ्ठल सांप्रदायाला साधेसोपे स्वरूप देण्याचे महान कार्य केले त्यांनी समाजातील सर्व वर्णाच्या लोकांना भागवत धर्म सहजसुलभ केला आहे. या सांप्रदायाची आचारसंहिता बनविली म्हणूनच ज्ञानदेवे रचिला पाया उभारिला देवालया असे म्हणतात.

संत तुकाराम महाराजांनी अभंग संकीर्तनातून संसारातील कर्मे करीत विठ्ठलाचे नाम घेण्याचा उपदेश केला संत जनाबाईने कर्मपूजा करता करता ईश भजावा हे सूत्र कष्टकरी जनतेला सांगितले. कोणतेही तीर्थव्रत न करता पंढरीची वारी करावी हा संतांनी जनतेला संदेश दिला आणि भक्त भाविकांनी तो आत्मसात केला. भागवत धर्माचे बहुसंख्य अनुयायी ग्रामीण भागात राहतात त्यांची श्री विठ्ठल ही एकमेव देवता आहे. वारकरी पंथ, विठ्ठल पंथ, वैष्णव धर्म  किंवा भागवत धर्म या सर्वांच्या शब्दाच्या मागे ही एकच कल्पना साकार आहे. ज्ञानेश्वर महाराज, त्यांचे गुरूबंधू श्री निवृत्तीनाथ महाराज यांच्यापासून हा सांप्रदाय प्रसार केला या परंपरेला अखेरचे संत निळोबाराय मानले जातात.

महाराष्ट्रातील सर्व संत स्वत:ला विष्णूभक्त किंवा वैष्णव म्हणतात व विष्णू एकच प्रतिमा आहे असा अनुभव संत नरहरी सोनारांना आला तोच अनुभव निळोबाराय यांनाही आला. ऐक्यारूपे हरिहरा उभा कटीवर विटेवरी या शब्दातून व्यक्त केला. समर्थ रामदासाना सावळ्या विठ्ठलाच्या ठिकाणी भगवान शंकर आणि प्रभु रामचंद्राचे दर्शन झाले. श्री विठ्ठलाच्या मस्तकावर

शिवलिंग आहे म्हणून शैव आणि वैष्णव सांप्रदायाचे लोक श्री विठ्ठलोपासना करतात. निवृत्तीनाथ, सोपानदेव, विसोबा खेचर इ. संत नाथपंथातील अनुग्रह घेतला होता काही इतिहासकारांच्या मते पंढरपूर हे शैवक्षेत्र  होते. जेंव्हा ज्ञानदेवांची भावंड पंढरीस आली तेंव्हा वारकरी सांप्रदायाची लोकप्रियता पाहून त्यांनी या पंथाचा स्विकार केला असेही मानले जाते. अशा प्रकारे पंढरपूर क्षेत्र समन्वयाचे तीर्थक्षेत्र आहे तर भागवत धर्म हे वैदिक धर्माचे सार आहे. वेद, उपनिषदे, गीता, भागवत यांची थोरवी सकल संतानी अभंगातून गायली आहे.

### १.१८) यात्रा वर्णन :-

आषाढी कार्तिकी भक्तजन येती शेकडो वर्षापासून यात्रेसाठी लाखो लोक पंढरपूरला येत आहेत. पंढरपूर हे असे एकाच तीर्थक्षेत्रात वर्षातून चार मोठ्या यात्रा भरतात. चैत्री यात्रा, आषाढी यात्रा, कार्तिकी यात्रा, माघी यात्रा यापैकी चैत्री व माघी यात्रा छोट्या प्रमाणात भरतात तर आषाढी व कार्तिकी यात्रा मोठ्या प्रमाणात भरत असतात पंढरपूरातील सर्वात महत्वाची व मोठी यात्रा म्हणजे आषाढी यात्रा. यात्रा म्हणजे भाविक यात्रेकरूंच्या दृष्टीने अनन्य साधारण महत्व आहे. काही वारकरी भाविक तर दर महिन्याच्या वारीला येतात. पंढरपूर हे दक्षिण भारतातील अत्यंत महत्वाचे पर्यटन स्थळ झाले आहे. आता आपण येथील महत्वाच्या यात्रांचा थोडक्यात परिचय करून घेऊ या.

### १) चैत्रवारी :-

भारतीय सनातन हिंदू संस्कृतीप्रमाणे चैत्र महिना म्हणजे नववर्षारंभाचा महिना चैत्र शुध्द एकादशीला पंढरपूरात श्री विठ्ठल दर्शनासाठी मोठी यात्रा भरते. चंद्रभागेत स्नान, श्री विठ्ठल दर्शन, क्षेत्र प्रदक्षिणा करून भजनात तल्लीन होवून वारकरी कृतार्थ होतात. रामनवमी व गुढीपाडवा या सणाला पंढरपूरात भाविकांची गर्दी होते. मंदिरात, मठात, धर्मशाळेतच नव्हे तर घरोघरी गुढ्या उभ्या करून नववर्षाचे स्वागत केले जाते. याच महिन्यात शिखर शिंगणापूर येथेही यात्रा असते. नगर जिल्ह्यात आणि सातारा जिल्ह्याच्या हद्दीवर श्रीक्षेत्र शिखर शिंगणापूर तीर्थस्थान आहे. येथे डोंगरावर श्री शंभू महादेवाचे अतिशय प्राचीन देवस्थान आहे. चैत्रवारीस आलेले भाविक श्री विठ्ठल दर्शन घेवून खांद्यावर कावडी घेऊन वाजत, गाजत, नाचत श्री महादेवाच्या दर्शनाला जाऊन

येतात पुंडलीक वरदा हरि विठ्ठल या नामघोषा बरोबरच हर हर महादेव ही गर्जना आसमंतात घुमते आणि नकळत शैव–वैष्णव संप्रदाय, मुलत: एकच आहे भेद नाही. हरिहरा ही अव्दैताची भावना भाविकांच्या मनात दृढमुल होते. श्री क्षेत्र शिंगणापूर हे महादेवाचे तीर्थस्थान पंढरपूर – पुणे महामार्गावर  सुमारे ६५ ते ७० कि.मी. अंतरावर आहे.

**२) आषाढी यात्रा :–**

स्वत: पांडूरंगाने नामदेवरायांच्या जवळ आपले गुपीत सांगताना म्हटले आहे आषाढी कार्तिकी विसरून कामजा सांगत से गुज पांडूरंग वारकरी सांप्रदायाची ही अत्यंत महत्वाची यात्रा मानली जाते. आषाढी यात्रेपासून ते कार्तिक यात्रेपर्यंतचा चार महिन्याचा काळ चार्तुमास म्हणून संबोधला जातो या चार्तुमासात हजारो वारकरी पंढरपूरात मठ, मंदिर, धर्मशाळेत राहून किर्तन आदि कार्यक्रमात सहभागी होतात. भागवत धर्माचा अभ्यास करतात या सर्वात मोठ्या यात्रेसाठी दरवर्षी संतांच्या पालख्या समवेत व अन्य मार्गाने  सुमारे ५ ते ८ लाख लोक पंढरीत येत असतात. पंढरीचा आसमंत ग्यानबा, तुकाराम, पुंडलीक वरदा हरी विठ्ठल या नामघोषाने टाळ मृदुंगाच्या नाद घोषाने अवघे पंढरपूर दुमदुमत असते. साधारणत: हा काळा वर्षाऋतु चा काळ शेतकरी वर्ग शेतात पेरण्या करून श्री विठ्ठल दर्शनाची आस मनी घेवून पंढरीत येतो. चंद्रभागा नदी यात्रा काळात भरून वहात असते आल्हाददायक वातावरण झालेले असते. वारकऱ्या प्रमाणेच अनेक व्यापारी आपल्या मालाची विक्री करण्यासाठी दुकाने थाटून बसतात. आषाढ शुध्द दशमीला अनेक संताच्या पालख्याचे पंढपूरात आगमन होते हजारो लोक पालखीला सामोरे जातात साधू–संताच्या आगमनाचा देवदुर्लभ सोहळा अवर्णनिय असतो.

दिंड्या पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णावा किती ।<br>संत नामदेवाच्या या अभंगानुसार लाखो वारकरी माझे जीवीची आवडी ।<br>पंढरपूरा नेईन गुढी ।

हा भाव अंतरी ठेवून खांद्यावर पताका, मुखाने हरिनाम आणि टाळ मृदुंगाच्या गजरात पंढरीत दाखल होतात यावेळी पंढरपूरला भूवैकुंठ का म्हणतात याचा प्रत्यक्ष अनुभव येतो.

या यात्रेपुर्वी ठरलेल्या मुहुर्तावर आळंदी, देहू, पैठण, शेगांव इ. ठिकाणाहून संत सत्पुरूषांच्या गावाहून त्या त्या संताच्या पालख्या पंढरपूरकडे मार्गस्थ होतात एवढेच नव्हे तर भारताच्या विविध प्रांतातून भिन्न भिन्न भाषा बोलणारे, चालिरितीचे श्री विठ्ठलाच्या भक्तीभावाने आपले  देहभान विसरून एकत्र येतात. उच्चनिचता, श्रीमंत, गरीब, जातीभेद, भाषाभेद, प्रांतभेद विसरून आपण सर्व एक श्री विठ्ठलाचे वारकरी विष्णूदास आहोत ही भावना मनीमानसी दृढ धरून येतात. सांप्रदाय समता, एकता, अभेदता शिकविणार आहे कारण त्याला माहित आहे उच्च नीच काही नेणे भगवंत तिष्ठे भावभक्ती देखुनिया । यामुळेच यात्रेत विषमता संपते, भेदभाव नाहीसा होतो, परदेशी अभ्यास पर्यटकही हा सोहळा पाहण्यासाठी पंढरपूर मध्ये येतात.

आषाढ शुध्द ९ ला भंडीशेगांव येथे रिंगण होऊन सर्व वारकरी सांप्रदाय वाखरी येथील संत नगरात मुक्कामास येतात. दशमीच्या दिवशी सकल संताच्या पालख्यासमोर दिंड्याचे रिंगण होते. रिंगण सोहळा अत्यंत प्रेक्षणीय असतो. संतांचा अश्व वर्तुळाकार नाचत असतो, धावत असतो त्यामागे वारकरी धावत असतात रिंगण सोहळा संपल्यावर सर्व पालख्या पंढरपूराकडे मार्गस्थ होतात.

वाखरी येथून पालख्यांच्या शेवटी श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांची पालखी निघते या पालखी सोहळ्यामध्ये प्रथम क्रमांक श्री ज्ञानेवर महाराजांच्या पालखीचा असतो तर दुसरा क्रमांक देहुच्या संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा, तिसरा क्रमांक पैठणच्या संत एकनाथ महाराजांच्या पालखीचा, चौथा क्रमांक संत निवृत्तीनाथ महाराजांची पालखी तर पाचवी संत सोपानदेवाची, सहावी औरंगाबादहून आलेली मुक्ताबाईची पालखी आणि पंढरपूरहून संतांच्या पालख्यांना सामोरे जाऊन पंढरीस आणणारी श्री नामदेवरायांची पालखी या प्रमुख संतांच्या पालख्याचे मार्ग  ठरलेले असतात. संतनगर (वाखरी येथिल सर्व संताच्या पालख्या एकत्रित येणारे ठिकाण) हून आषाढ शुध्द दशमीला सकाळी १० च्या सुमारास एकेक पालखी हळूहळू पंढरपूरकडे मार्गक्रमण करू लागते. पंढरपूरामध्ये सर्वात शेवटी येणारी पालखी श्री ज्ञानेश्वर महाराजांची असते ती रात्री १० किंवा ११ वाजण्याच्या सुमारास पंढरपूरातील प्रदक्षिणा रोडवरील श्री ज्ञानेश्वर मंदिरात येते अन्य संताच्या पालख्या आपापल्या मंदिरात जातात. आषाढ शुध्द एकादशीला यात्रेकरू चंद्रभागेच्या पवित्र प्रवाहात स्नान करून शुर्चिभूत होतात. कपाळी गोपीचंदन व बुक्याची नाममुद्रा लावतात

गळ्यात तुळशीची माळ व टाळ, खांद्यावर पताका घेवून हे वारकरी संतांच्या पालख्यासमवेत नामघोष करीत क्षेत्र प्रदक्षिणा करतात. श्री विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी लाखो भाविकांची गर्दी होते. दर्शन बारीत ८–१० तास उभे राहून लोक श्री चे दर्शन घेवून कृतार्थ होतात, वारी पूर्ण करतात. दुपारी दोनच्या दरम्यान श्री विठ्ठलाचा रथ क्षेत्र प्रदक्षिणासाठी निघतो माहेश्वरी धर्मशाळा (पूर्वी खाजगीवाले वाडा) श्री विठ्ठल – रूक्मिणी – राही यांच्या चांदीच्या मुर्तींना सोन्याचा मुलामा दिलेला आहे सजवलेल्या रथामधून श्रीची मिरवणूक काढली जाते ज्या भाविकांना एकादशी दिवशी मंदिरात जाऊन दर्शन घेता आले नाही त्या भाविकांना रथातून दर्शन घेता येते. रथापुढे श्री गजानन महाराज संस्थानचा हत्ती झुलत असतो. श्री दर्शनासाठी प्रदक्षणा मार्गावर लोकांची झुंबड उडते. लोक रथावरती खारीक, खोबरे, बुक्का, लाह्या, पैसे उधळतात. परंपरेनुसार मानकरी लोक श्रीची पूजा करतात रथाची नगरप्रदक्षिणा पूर्ण झाली की वारी परिपूर्ण झाल्याचा वारकऱ्यांना संकेत मिळतो आनंद होतो ही परपंरा सुरू होऊन सुमारे १९० वर्षे झाली आहेत.

आषाढ शुध्द पौर्णिमेला गोपाळकाला होऊन यात्रेची सांगता होते. क्षेत्राच्या दक्षिणेस सुमारे १ ते २।। कि.मी. असलेल्या गोपाळपूर येथे गोपालकाल्यासाठी पौर्णिमेच्या दिवशी सकाळपासून दिंड्या, पालख्यांची गर्दी होते. दुपारी १० ते १२ च्या सुमारास किर्तनानंतर दहीहंडी फोडली जाते. गोपाळकाला एकमेकांना वाटला जातो अनेक प्रकारचे खेळ खेळले जातात. एकमेकाच्या मुखात लाह्यांचा दहीकाला घालून नामस्मरणी दंग असलेले वारकरी गोपाळकाला गोड झाला गोपाळांनी गोड केला असे म्हणत उराउरी भेट घेतात. पंढरीच्या लोकांनाही अभिमान, पाया पडती जन एकमेका । या संत वाणीप्रमाणे एकमेकांना वंदन करतात लहान थोर उच्च नीच भेद संपतो सर्व भाविक, वैष्णव हा आनंद सोहळा साजरा करून पंढरीची वारी परिपूर्ण झाल्याच्या आनंदात आपापल्या गावाकडे मार्गस्थ होतात. पंढरीत यात्रेसाठी येताना आणि यात्रा पूर्ण झाल्यावर गावी परत जाताना जागोजागी मुक्काम करून नामस्मरण, भजन, कीर्तन, प्रवचन, भारूडाचे कार्यक्रम करून हरिजागर करीत असतात पालखी सोहळ्यातील विणेकरी, कीर्तनकार, प्रवचनकार, घोडेस्वार इ. बाबतीतली संपूर्ण व्यवस्था संस्थानच्या मार्गदर्शनाखाली पाहिली जाते या व्यवस्थेत आवश्यकतेनुसार होणारे बदल आळंदी देवस्थान पंचकमिटी, महामंडळ व जिल्हा

न्यायाधिश यांचे नियम ठरविले जातात अलीकडे पालखीसमवेत येणाऱ्या यात्रेकरूंच्या दिंडयाच्या संख्येत वाढ होत आहे.

आषाढ शुध्द पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी महाव्दार काला होतो. प्राचीन काळी पंढरपूरात कान्हा हरीदास नावाचे श्री विठ्ठलाचे अनन्यभक्त होवून गेले रोज पहाटे काकड आरतीला मंदिरात भजन, पदे, आरत्या म्हणून ते सेवा करीत असत श्री विठ्ठलाने प्रसन्न होवून त्यांना स्वत:च्या पादुका दिल्या अशी आख्यायिका आहे श्रीविठ्ठल मंदिराजवळ हरिदास वेशीकडे जाताना श्री. मदन महाराज हरिदास यांचा स्वत:च्या मालकीचा वाडा आहे. त्याला काल्याचा वाडा असे म्हणतात यावाड्यात श्री विठ्ठलाच्या चांदीच्या पादुका आहेत. आषाढ व कार्तिक यात्रेच्या पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी या पादुका वै. कान्हा हरिदास यांचे वंशज श्री मदन महाराज हरिदास यांच्या मस्ताकवर बांधल्या जातात यापादुका मस्तकी ठेवताच श्री हरिदासाची शुध्द हरपते ते समाधी अवथेत जातात नंतर टाळमृदुंगाच्या नादघोषात व नामघोषात मिरवणूकीने श्री हरिदासाना खांद्यावर घेवून पाच प्रदक्षिणा केल्या जातात दहीहंडी फोडली जाते. ही मिरवणूक महाव्दारातून निघते पादुकावर गुलाल, बुक्का , कुंकु लाह्याचा वर्षाव होतो महाव्दारातून ही मिरवणूक चंद्रभागेच्या भेटीसाठी जातो तेथून कुंभार घाटाने मिरवणूक माहेश्वरी धर्मशाळेत जाते तेथून दत्तघाटावरून मुक्ताईच्या मठावरून हरिदास वेशीतून पुन्हा वाड्यात विसावते. मिरवणूकीत हरिनामाचा गजर व अबीर गुलालाची उधळण होते. दहीहंडी फोडली जाते भाविक लोक श्री विठ्ठलाच्या पादुकाचे दर्शन घेतात. मिरवणूक काला वाडयात आल्यानंतर महाआरती होते सर्व भाविकाना काला वाटला जातो महाप्रसाद होतो आणि यात्रेची या सोहळ्याने परिपूर्णता सांगता होते.

आषाढी एकादशीपासून ते कार्तिक पौर्णिमेपर्यतच्या काळास चार्तुमास म्हणतात.

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी जि पुणे यांनी श्री  ज्ञानेश्वर महाराजांच्या आळंदी ते पंढरपूर पालखी सोहळ्यामध्ये पालखी बरोबर असणाऱ्या दिंड्या व त्यांची नावे १९४९ साली निश्चित केली आहेत. त्याचप्रमाणे पालखी समवेत पुढे व मागे दिंड्या चालत असतात.

**३) कार्तिकी यात्रा :-**

कार्तिकी शुध्द एकादशीला पंढरपूरात मोठी यात्रा भरत असते या यात्रेनंतर संतमंडळी व चार्तुमासात भगवद् चिंतनासाठी राहिलेले वारकरी लोक आपापल्या गावी परत जातात चार्तुमास संपतो गावी परत जातात. या यात्रेत नदीच्या वाळवंटात जागोजागी कीर्तनाचे फड उभारलेले असतात गावातील मठातून मंदिरातून तसेच धर्मशाळेतूनही कीर्तन, भजनाचे कार्यक्रम होत असतात एकादशीच्या दिवशी श्री विठ्ठलाचा रथ नगर प्रदक्षिणेला निघत असता दिंड्या निघतात पौर्णिमेला गोपाळकाला (गोपाळपूर) येथे व त्याच्या दुसऱ्या दिवशी मंदिरात आषाढी यात्रेप्रमाणे महाव्दार काला होतो.

**❊ कार्तिकी यात्रेचे वैशिष्ठ्य :-**

या यात्रेला कर्नाटकातून पालख्या व दिंड्या येतात. विजापूर, हुबळी, धारवाड, बेळगांव इ. जिल्ह्यातून पालखी पंढरपूर ला येतात. विजापूर जिल्ह्यात इंचगिरी संप्रदायाची शिष्यमंडळी आहेत भाऊसाहेब महाराज उमदीकर, रामभाऊ रानडे इ. थोर सत्पुरूषांनी भागवत धर्माच्या प्रसाराचे महानकार्य या भागात केले आहे या प्रांतातील विविध मंदिरातून श्री ज्ञानेश्वरीच्या निरूपणाचे कार्य, कीर्तने प्रवचन पारायण इ. कानडी भाषेतून चालते यात्रेच्या निमित्ताने भागवत धर्माच्या प्रचारा व प्रसारामुळे प्रांतभेद संपून स्नेहसंबंध दृढमुल होत आहेत.

**४) माघ वारी (माघी यात्रा):-**

पंढरपूरातील ही चौथी महत्वाची यात्रा माघ शुध्द एकादशीला ही यात्रा कर्नाटक महाराष्ट्रा बरोबरच आंध्र प्रदेशातील भाविकांची श्री विठ्ठल भक्ती, भागवत धर्माविषयी जिव्हाळा दिसून येतो आंध्रातील भट्टीपोल्लू गावातील प्राचीन गावातील प्राचीन विठ्ठल मंदिरातही अशी यात्रा भरते. या प्रदेशातील गावातून असलेल्या श्री विठ्ठल मंदिरातून तेलगु भाषेत ज्ञानेश्वरीवर प्रवचने होतात.

मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान या प्रांतात सुध्दा पंढरीच्या यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे हिंदी, गुजराथी, कन्नड, तेलगु भाषेतून प्रवचने होतात म्हणूनच आवर्जुन सांगावेसे वाटते कीं, पंढरपूर हे तीर्थक्षेत्र देशातील विविध प्रांतातील भाविकांना भागवत धर्माच्या माध्यमातून एकत्रित आणणारे पवित्र तीर्थक्षेत्र, एवढेच नव्हे तर हिंदुधर्म संस्कृतीचे प्रतिकसुध्दा आहे.

## १.१९) मठ :-

आषाढी ते कार्तिकीस प्रत्येक मठामध्ये दशमी ते पौर्णिमेपर्यत भजन व कीर्तन होतात सकाळ, संध्याकाळ कीर्तन व रात्री हरिजागर होतो फड म्हणजे वारकरी संप्रदायातील विशिष्ठ पंरपरतेतील प्रमुखांचा व व्यक्तीचा समुदाय संत परंपरेचे तीन मठ असून पुढे या मठामधुनच अनेक मठ निर्माण झाले आहेत श्री तुकोबारायांच्या शिष्य परंपरेतुन निघालेल्या ह.भ.प. वासकरांचा मठ त्यांच्या वंशातून निघालेल्या देहूकरांचा मठ श्री. नामदेव महाराजाच्या वंशाचा मठ आहे तीन मठ प्रमुख आहेत वारकरी संप्रदायात पंढरीचे जितके महत्व आहे तितकेच आळंदीचे ही आहे पंढरीची वारी ही देवाची वारी तर आळंदीची वारी ही संताची वारकरी संप्रदायाच्या पंढरपूरच्या वारकरी पालखी सोहळ्यामध्ये दिंड्या घेवून वारीस येतो व दिंड्या उतरण्याच्या ठिकाणास मठ असे म्हटले जाते काही निवडक दिंड्याची नावे खालील प्रमाणे :-

१) पंढरपूरातील कृष्णबुवा, एकनाथ बुवा सोलापूरकरांच्या दिंड्या

२) ह. भ. प. सोपानकाका देहुकर यांची दिंडी

३) ह. भ. प. अमळनेरकर महाराज यांची दिंडी

४) एलाबादहून (जळगांव, खान्देश) ह.भ.प. काशीनाथ बुवा यांची मुक्ताबाईची दिंडी

५) आळंदीहून हैबतबाबा यांचे तर्फे दिंडी

६) पैठणची दिंडी

७) सासवडहून ह. भ. प. परकाळे बुवा यांची दिंडी

वारीच्या वेळी निरनिराळ्या फडावर किर्तन, भजन, प्रवचन इ. कार्यक्रम होतात.

**आराखडा अभ्यास**

**❊ प्रकरण पहिले :– प्रस्तुत संशोधनाची पार्श्वभूमी**

प्रस्तुत लेखामध्ये संशोधकाने प्रस्तावना, संशोधन शीर्षक, व्याख्या, संशोधन विषयाची निवड, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाची गरज, संशोधनाचे गृहितके, संशोधनाचे उद्दीष्ट्ये, स्वरूप, संशोधनाचे तंत्र, माहिती संकलन साधने, व्याप्ती व मर्यादा, पंढरपूर शहराचा इतिहास, वारकरी सांप्रदायाचे महत्त्व, यात्रा वर्णन इ. चा समावेश या लेखामध्ये केलेला आहे.

**❊ प्रकरण दुसरे – पूर्व अभ्यास समालोचन**

प्रस्तुत लेखामध्ये संशोधकाने प्रस्तावना, सार्वजनिक गंथालयाच्या विकासात शासनाचे प्रयत्न, राजाराम मोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, सार्वजनिक ग्रंथालयांचा उदय आणि विकास, ग्रंथालयांची स्थापना व इतिहास, युनेस्को जाहिरनामा, सार्वजनिक ग्रंथालयांची सामाजिक कार्ये व उद्दीष्टे, संशोधन विषयाचा पूर्वाभ्यास इ. समावेश या लेखामध्ये केलेला आहे.

**❊ प्रकरण तिसरे :– माहिती संकलन**

प्रस्तुत लेखामध्ये संशोधकाने प्रस्तावना, सार्वजनिक ग्रंथालय, ग्रंथालयांची कर्तव्ये, ग्रंथालय शिक्षण आणि समाज, ग्रंथालयांचे प्रकार, ग्रंथालय समाजाची गरज, स्वरूप व महत्त्व, सांस्कृतिक कार्ये, ध्येय, उद्दीष्ट्ये, राजाराम मोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान च्या योजना, संशोधनाची व्याख्या इ. चा अभ्यास केला आहे.

**❊ संशोधन पध्दती :–**

प्रामुख्याने संशोधनाच्या तीन पध्दती आहेत.

१) वर्णनात्मक संशोधन पध्दती

२) ऐतिहासिक संशोधन पध्दती

३) प्रायोगिक संशोधन पध्दती

**✲ वर्णनात्मक संशोधन पध्दती :–**

सार्वजनिक, सामाजिक शां ामध्ये या पध्दतींचा वापर केला जातो. वर्णनात्मक संशोधनामध्ये सामाजिक संस्थेच्या सद्यस्थितीचा सर्वंकष अभ्यास, प्रगतीचा आढावा घेण्यात येतो. या संशोधनास वर्णनात्मक संशोधन पध्दती म्हणतात.

वर्णनात्मक संशोधन पध्दतीचे गुण

१) वस्तुनिष्ठपणे गोळा केलेली माहिती.

२) उपयुक्त माहितीचे वर्गीकरण माहितीचे शां शुध्द विश्लेषण

३) चिकित्सा

४) चिकित्सेला लाभलेली चिंतनाची पार्श्वभुमी

तसेच वर्णनात्मक पध्दतीचे महत्त्व यांचे वर्णन केले आहे.

**✲ प्रकरण चौथे – माहिती सादीकरण आणि विश्लेषण**

प्रस्तुत लेखामध्ये संशोधकाने पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे. शहरातील एकुण सात सार्वजनिक ग्रंथालयांचा परिचय आणि विश्लेषण केलेले आहे. संशोधकाने शहरातील सार्वजनिक ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन ग्रंथालयातील ग्रंथपाल व वाचकांना प्रश्नावली देऊन माहिती गोळा करण्यात आली. तसेच ग्रंथालयांचे प्रश्न उपक्रम, सेवा–सुविधा, ग्रंथालयातील साहित्य, ग्रंथसंपदा, ग्रंथालयातील ग्रंथपाल, कर्मचारी तसेच संस्थांविषयी माहिती गोळा केली तसेच सार्वजनिक ग्रंथालयातील प्रत्येकी दहा–दहा वाचकांना प्रश्नावली देऊन माहिती गोळा करण्यात आली. ग्रंथालयांना भेडसावणाऱ्या समस्यांचा आढावा, भविष्यकालिन योजना, ग्रंथालयांना मिळालेले पूरस्कार यांचा सविस्तर अभ्यास केला आहे.

**✲ प्रकरण पाचवे :– निष्कर्ष व शिफारशी**

प्रस्तुत लेखामध्ये संशोधकाने निष्कर्ष काढून शिफारशी केलेल्या आहेत. तसेच संशोधनाच्या पुढील दिशा यामध्ये स्पष्ट केलेल्या आहेत.

# प्रकरण दुसरे

## पूर्व अभ्यासाचे समालोचन

### २.१) प्रस्तावना :–

प्रस्तुत संशोधन प्रकल्पाच्या विषयानुसार ज्या वाचन साहित्याची आवश्यकता आहे अशा वाचन साहित्याचा शोध घेण्यासाठी विद्यापीठ ग्रंथालय महाविद्यालयीन व सार्वजनिक ग्रंथालय येथे जाऊन ग्रंथालय तालिका, नियतकालिका, सूची ग्रंथसुची निवडलेल्या विषयाच्या संदर्भात प्रबंधातील सूची प्रकाशकांच्या याद्या, वर्तमानपत्रातील महाविद्यालयीन कात्रणे इ. साधनांचा उपयोग करून प्रकल्पासाठी आवश्यक असलेने वाचनसाहित्य मिळविण्याचा प्राथमिक प्रयत्न केला.

पूर्व साहित्याचा आढावा घेताना संशोधनाचा विषय मध्यवर्ती मानून त्याअनुषंगाने संशोधन विषयाला पूरक ठरतील अशा संशोधन पदवीसाठी विद्यापीठामध्ये सादर केले गेलेल्या शोध प्रबंधाची यादी संकलित केली आहे. संशोधकाने संशोधनासाठी '' पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाचा चिकित्सक अभ्यास '' हा विषय निवडल्यानंतर या विषयाच्या अनुषंगाने इतर काही प्रकल्प आहे का याचा शोध घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. वाचन सवयी व वाचन अभिरूची सर संबंधीच्या प्रकल्पाची उद्दीष्टये व गृहितके याचा समावेश पूर्वाभ्यासात केला आहे.

### २.२) सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासात शासनाचे प्रयत्न :–

ग्रंथालय कायदा, पंचवार्षिक योजना, जिल्हा समिती डिलिव्हरी ऑफ बुक ॲक्ट, राजाराम मोहन राय प्रतिष्ठान, फैजी समिती इ. प्रयत्नांमधून सार्वजनिक ग्रंथालयांना आधार देण्यात आला. तसेच भारत स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शिक्षणाचा प्रचार व प्रसार होण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालय चळवळीस गती देण्यात आली.

**मंगल पी. बी. (१९८४) :–**

सार्वजनिक ग्रंथालयाच्या उन्नतीसाठी शासनाने जे प्रयत्न केले त्याचा रोल ऑफ पब्लीक लायब्ररी इन डेव्हलपिंग कॅन्टीज या लेखात आपले मत लिहितात.

केंद्र सरकारने १९७२ मध्ये सार्वजनिक ग्रंथालयाच्या मदतीसाठी राजाराम मोहन रॉय फौंडेशन ही संस्था स्थापन केली. ही संस्था सार्वजनिक ग्रंथलयांना त्यांच्या निधीच्या प्रमाणात आर्थिक मदत देते. चर्चासत्र, इमारत बांधणी, कार्यशाळा, ग्रंथसाहित्य खरेदी यासाठी अर्थसहाय्य करते.

**राजा राममोहनरॉय प्रतिष्ठान (१९९९) :–**

प्रस्तूत प्रतिष्ठानने प्रसिध्द केलेल्या कार्यविशेष अंकात प्रतिष्ठानही उद्दीष्टये रचना व स्वरूप याविषयी लिहीले आहे. राजा राममोहन राय या प्रतिष्ठानची स्थापना ग्रंथालय चळवळ ग्रामीण भागापर्यंत पोहचवावी व तेथील ग्रंथालयांना आर्थिक आधार मिळावा या मुलभूत उद्देशांनी झाली आहे. तसेच या प्रतिष्ठानमार्फत राज्य विभागीय जिल्हा तालुका व ग्रामपातळीवर सार्वजनिक ग्रंथालयांना सुधारण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येते.

**खोत नमिता बाबासाहेब (१९९०) :–**

सांगली जिल्हा नगर वाचनालय, सांगली (१८६९–१९९१) :– एक मुल्यमापन व प्रबंधात त्या लिहीतात – भारतातील ग्रंथालयांच्या विकासासाठी शासनाने केलेले प्रयत्न हे थोडे आहेत. आपल्याकडे सार्वजनिक ग्रंथालयासाठी स्वतंत्र मिनिस्ट्री नाही. शैक्षणिक खालीलप्रमाणे ग्रंथालय सेवेसाठी दर्जा दिलेला नाही. कर्मचाऱ्यांसाठी वेतन निश्चिती नाही. ग्रंथालयकाराची निश्चित पध्दती नाही. तसेच सार्वजनिक ग्रंथयालयाच्या विकासासाठी राष्ट्रीय धोरण अनुकुल नाही.

**२.३) सार्वजनिक ग्रंथालय उदय आणि विकास :–**

**अ) ग्रंथ :–**

साहित्यकाला लेखन सुचते, कविता, काव्य सुचते. संशोधकाला संशोधनाचा उगम झालेला कळतो. अशी कोणती ना कोणती गोष्ट आहे. त्यामुळे प्रत्येकात काही तरी करण्यास भाग पाडते. उत्तर येईल ‘ ग्रंथ ’ अशा ग्रंथाचा उगमांचा अभ्यास केल्यास खालीलप्रमाणे माहिती मिळते. सर्वांत प्राचीन भाषा संस्कृत भाषा आहे. या संस्कृत भाषेत ग्रंथाच्या ‘ पुस्त ’ असे पर्यायी नाव आहे. याचा अर्थ घडण किंवा आकार देणे असा आहे. फार प्राचीन काळी शिला वास्तुचे

तुकडे भुर्जुत्र यावर केलेल्या लिखाणावर ' पुस्तक ' हा शब्द रूढ झाला असावा. ' एकार्थको वाक्य संदर्भ यथा महाभारत रामयणदी '' भारतीय संस्कृती कोशात याचा अर्थ '' एक विशिष्ट अर्थाने उद्देशाने निर्माण केलेल्या वाक्य संदर्भ म्हणजे ग्रंथ होय.''

मराठी विश्वकोषात सांगितल्याप्रमाणे, '' आधुनिक कल्पनेनुसार ग्रंथ म्हणजे कागदावर किंवा मुद्रीत केलेल्या सुक्ता वा बांधलेल्या षष्ठांचा संग्रह होय. मानवी संस्कृतीत ज्या अवस्थेत आपले विचार स्वत:साठी भावी–पिढीसाठी जतन करून ठेवावेत ही कल्पना माणसाच्या मनात रूजली त्या मानवी संस्कृतीच्या अतिप्राचीन अवस्थेपासून कोणत्या तरी स्वरूपात ग्रंथाचे अस्तित्व आढळते. ग्रंथपूर्व काळही विचार संक्रमनाचे कार्य अनेक शतके श्रुतिमुर्ती द्वारा व्यक्तिगतरीत्या घडत असे. गुरूमुख हे त्या काळात ज्ञान प्रसाराचे एकमेव साधन होते.

**ब) वाचन :–**

ज्ञान हे नदीच्या प्रवाहाप्रमाणे सतत पुढे जाणारे आहे आणि म्हणून जगात पुर्वी लिहीलेले महत्वाचे ग्रंथमापन वाचले पाहिजेत. यातूनच व्यक्ती आणि समाज सुसंस्कृत बनतात. हे लक्षात घेऊनच युनोस्कोने विश्वपुस्तक दिप साजरा करण्याचे ठरविले आहे. त्याच बरोबर भारत सरकारचा मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या वतीने २००१–२००२ वर्ष हे पुस्तक वर्ष म्हणून घोषित केले. म्हणूनच या ग्रंथाविषयी म्हटले जाते.

'' Book for all for Book ''

म्हणजे सर्वांसाठी ग्रंथ आणि ग्रंथासाठी सर्व हेच डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी आपल्या पंचसूत्रात सुचित केले आहे.

आपण ज्यावेळी वाचन करतो, त्यावेळी आपण लेखक यांच्यामध्ये कोणीही नसतो. वाचन हा वाचक व लेखन हा लेखक यांच्यामधील संवाद असतो. वाचक बोलत असला तरी त्याच्या बुध्दीला लेखकाचे म्हणणे समजत असते. त्याच्या मनाच्या प्रतिक्रिया होत असतात. यालाच श्री. मठकर संवाद म्हणतात ज्यांची बुध्दी तल्लक असते. असा वाचक गंभीर विषयांवरील कठिण पुस्तके वाचतो. ज्यांच्या संवेदना तरूण असतात असा वाचक रसिक श्रेष्ठ लेखन साहित्याचा आस्वाद घेतो.

### क) ग्रंथालय इतिहास :-

ज्ञान प्राप्त करून घेण्याची तृष्णा ही मनुष्य प्राणमध्ये अनादी काळापासूनच आहे. मानवाच्या या प्रवृत्तीमुळेच ज्या-ज्या मार्गाने ज्ञान मिळू शकेल त्या मार्गांनी ते प्राप्त करून घेऊन आपले जीवन अधिकाअधिक समृध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच त्याने आपला सर्वांगीण विकास व्हावा म्हणून वेगवेगळ्या संस्था स्थापन केल्या. उदा. कुटुंब संस्था, राज्य संस्था, धर्मसंस्था, शिक्षण संस्था इ.

अशाप्रकारे ग्रंथालयाच्या इतिहासात अलिकडील उत्खननता प्राचीन काळातील शहरांचे जे अवशेष सापडले त्यावरून जगातील सर्वांत प्राचीन ग्रंथालये सुमेरियन व बॅबेनियन संस्कृतीच्या काळात अस्तित्वात होती, असे सिध्द होते. सुमेरियन व बॅबेनियन संस्कृतीचा वारसा मिळालेला होता. याकाळी देवालये राजवाडे यामधून ग्रंथसंग्रह केला जाई. बॉर्सिया येथे एक महत्वाचे ग्रंथालय होते. इ.स. पूर्व ६६८ ते ६२७ या काळात असुरबनिपाल या राजाने निनेव्ह येथील एक मंदिराजवळ एक मोठे ग्रंथालय स्थापन केले होते. सुमेरियन भाषेतील सुमारे २०००० ग्रंथ होते. १६ व्या शतकाच्या सुमारास प्रबोधन काळ अवरतला. कागदांचा शोध देशी भाषांचा उदय मुद्रण कलेचा शोध या तीन क्रांतीकारक गोष्टींनी सांस्कृतिक प्रबोधनाला गती मिळाली. ग्रंथसुचीचा जनक कोनुरार गेस्नर (१५९५), गेब्रिअल नोंडे (१६००-१६५३), जॉन ड्युरी (१५९६-१६८०) व गोटफीर (१६४६-१७५३) या नामवंत ग्रंथपालांनी ग्रंथालयांना महत्वाचे स्थान प्राप्त करून दिले. युरोपातील ग्रंथालय विश्वावर फ्रेंच राज्य क्रांतीचा मोठा परिणाम झाला. क्रांतीवाद यांनी सर्व खाजगी देवालयातील ग्रंथालये नष्ट करून तेथील सर्व ग्रंथसंग्रह पॅरिस येथील राष्ट्रीय ग्रंथालयात नेले. अशारितीने राजा व महाधिपती यांची ग्रंथावरील मक्तेदारी संपून ग्रंथालये जनतेला खुली झाली.

## २.४) सार्वजनिक ग्रंथालय स्थापना :-

प्रत्येक राष्ट्रात ग्रंथालये स्थापन झाली. सार्वजनिक ग्रंथालयाचा कल्पनेचा उगम झाला. विशेष ग्रंथालयेही स्थापन करण्यात आली. भारतातील पहिले सार्वजनिक ग्रंथालय हे कलकत्ता येथे १८५० मध्ये खाजगी व्यक्तींनी एकत्र येऊन कलकत्ता पब्लिक लायब्ररी या ग्रंथालयाची

स्थापना केली. त्यांच्या अनुकरणाने भारतातील प्रमुख शहरातधून सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना झाली. कलकत्ता ' पब्लिक लायब्ररी ' चे रूपांतर १९०२ मध्ये '' इंपिरियल लायबरी '' त झाले. त्याचे पूर्नरूपांतर होऊन भारताच्या राष्ट्रीय ग्रंथालयाची १९४८ साली स्थापना झाली. या ग्रंथालयात सुमारे १३ लाख ग्रंथ असून १० हजार नियकालिके व संस्कृत, अरेबिक, इराणी, उर्दु भाषांतील अनेक हस्तलिखिते आहेत. सध्या लेखाधिकारी कायद्याप्रमाणे देशातील प्रत्येक भाषांतील प्रत्येक पुस्तकांची एक प्रत या ग्रंथालयात येते. भारतातील राष्ट्रीय ग्रंथसूचीचे काम याच ग्रंथालयाच्या सहकार्याने होत आहे.

**२.५) युनेस्को :– सार्वजनिक ग्रंथालय जाहिरनामा १९४९ :–**

**व्याख्या :** सार्वजनिक ग्रंथालयाची जास्तीत जास्त व्यापक व सर्वांना ग्राह्य होऊ शकणारी अशी व्याख्या युनेस्को या संस्थेने सन १९४९ मध्ये व सन १९६२ मध्ये ती अधिक बिनचेक करण्याचा प्रयत्न केला.

युनेस्को या जाहीनाम्यात सार्वजनिक ग्रंथालये सर्वसामान्य वाचकांबरोबरच विशेष सेवा द्यायचे म्हणजे अपंग प्रौढ विद्यार्थी, महिला, बालवाचक इ. या जाहीरनाम्याच्या सुधारित स्वरूपामुळे सार्वजनिक ग्रंथालये ही शिक्षण संस्कृती व माहितीचे ं ोत असल्याचे युनोस्कोचे मत असून आंतरराष्ट्रीय सामंजस्य व शांततेचे प्रतिक आहेत असे आवर्जुन सांगण्यात आले आहे.

अशाप्रकारे वाचकांची सोय करण्यासाठी ग्रंथालये वाचकांना सहज जाता येईल अशा जवळच्या अंतरावर असणे ते त्यांना विनामुल्य सेवा मिळते. ज्ञात, राष्ट्रीयत्व, वय, भाषा, सामाजिक स्थान किंवा शैक्षणिक पात्रता याबाबतचा अडसर न राहता सर्वांना सर्व प्रकारच्या सेवा मिळतील अशी तरतुदी कायद्याद्वारे होणे आवश्यक आहे.

१) विनामुल्य सेवा

२) सहज पोहोचता येईल अशा मोक्याच्या ठिकाणी ग्रंथालय असणे.

३) कायद्याचा आधार

या तीन तत्वांवर वाचक सेवा देताता कुठलीही अडचण न येणे व ग्रंथालय सेवा.  उच्च प्रतीची असणे हे युनोस्कोचा अभिप्रत आहे. या व्यतिरिक्त बालवाचक, महिला, अपंग व्यक्तींना द्यावयाच्या वाचन सेवेचा विचार ही युनोस्कोने या जाहिरनाम्यात प्रतिपादन केले आहे.

## २.६) भारतातील सार्वजनिक ग्रंथालयाचा विकास :-

इ. स. ५ व्या शतकात या विहाराला एक उत्तम शैक्षणिक केंद्र म्हणून कीर्ति मिळालेली होती असे दिसते. '' चिनी प्रवसी फहियानने मालदांचे मुळनांव मान असे देऊन बुध्दशिष्य सारिपूत या आपल्या ८०००० शिष्यासह तेथे राहत असल्याच्या दंत कथेत उल्लेख केलेला आहे.''

नालंदा येथे १० व्या व १२ व्या शतकात लिहीलेले लेख पहावयास मिळतात. पुरातत्वेने डॉ. अ. स. आळतेकर यांनी आपल्या Education on Ancient India 1944 मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकात नमुद केलेले आहे.

नालंदा ग्रंथालयाचे नांव '' धर्मगंज '' होते. याकरिता प्रयस्त व उंच इमारती होत्या. त्यापैकी एक ९ मजली इमारत ग्रंथालयासाठी देण्यात आली होती असा उल्लेख के यांनी आपल्या ग्रंथात केलेला आहे. धर्मगंजाच्या तीन इमारतीपैकी एकाचे नांव ' रत्नसागर ' दुसरे ' रत्नादाधि ' व तिसरीचे नांव ' रत्नरंजन ' होते. यामध्ये धार्मिक व तांत्रिक विषयावरील ग्रंथसंग्रह होते. भारतामध्ये ग्रंथालय शां ाचा शां  म्हणून प्रथमच उल्लेख केला. तो डॉ. शियाली रामामृता रंगनाथन यांनी म्हणूनच त्यांना भारतीय ग्रंथालय शां ाचे जनक असे म्हणतात.

१) ग्रंथ हे उपयोगी आहेत.

२) प्रत्येक वाचकास हवा असलेला ग्रंथ मिळाला पाहिजे.

३) प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळालाच पाहिजे.

४) वाचकाचा वेळ वाचावा.

५) ग्रंथालय ही वीर्धष्णु संस्था आहे.

इ.स. १९५१ मध्ये दिल्ली सार्वजनिक ग्रंथालयाची प्रथम पायचट सार्वजनिक ग्रंथालय म्हणून युनोस्कोच्या सहाय्याने स्थापना केली. या ग्रंथालयांना कायद्याचा आधार नाही, ज्याप्रकारे सार्वजनिक ग्रंथालयांना आहे. परंतू यावर केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रयालयाचे देशरेख रूपाने पहिल्या पंचवार्षिक योजनेत भरीव तरतुद केल्यामुळे जाळे निर्माण झाले.

**२.७) सार्वजनिक ग्रंथालयाची सामाजिक कार्य व उद्दीष्टये :–**

**अ) कार्ये :–**

१) शिक्षण घेण्यासाठी आणि ज्ञान साहित्याचा मुक्तपणे आस्वाद घेण्यासाठी, ज्ञानसाहित्यसर्व प्रकारचा वचकांना उपलब्ध करून देणे यासाठी वाचकांच्या गरजा माहिती करून घेणे त्यानंतर ग्रंथ निवड करणे. त्यांचे तालिकीकरण आणि वर्गीकरण करणे.

**२) स्वयं शिक्षणास प्रोस्ताहन देणे :–** शाळेमध्ये जाऊन शिक्षण घेणे भारतामधील अनेक लोकांना विशेषत: प्रौढांना शक्य नसते. शेतकऱ्यांना शेतीच्या क्षेत्रातील माहिती होणे आवश्यक असते. नवीन ज्ञानाच्या सहाय्याने तो पीक चांगल्या रितीने घेऊ शकेल. मधुमक्षिका पालन पशुखाद्य निर्मिती, कोंबड्याचे पालन इ. स्वयंरोजगार योजना आहेत.

**३) स्थानिक इतिहासाचे दालन निर्माण करणे :–** सार्वजनिक ग्रंथालय स्थानिक क्षेत्रामध्ये, गावामध्ये, पेठेमध्ये, उपनगरामध्ये काम करते. त्या गावातील स्थानिक इतिहासाची साधने, गावांचा इतिहास, ऐतिहासिक स्मारक, इमारत संस्था यांचा इतिहास जतन करणे हे सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्य होय.

**४) लोकशाही मुल्यांची जोपासना करणे :–** सार्वजनिक ग्रंथालय एक विशिष्ट भूभागामध्ये काम करते तेथील लोकांमध्ये परस्पर सामंजस्य निर्माण करणे, नि:पक्षपाती एखाद्या विषयावरील सर्व बाजूच्या लोकांना एकत्र आणून सामंजस्य निर्माण करणे, दुसऱ्याचे मताबद्दल आदर राखणे, तसेच मतभिन्नता असली तरीही एकोपा टिकविण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच लोकशाही मुल्यांची जोपासना करणे.

**ब) उद्दीष्टये :-**

**१) फी मोफत राहील :-** ग्रंथालयात बसून वाचणे अथवा ग्रंथ घरी नेणे अथवा संदर्भ सेवा देणे यासाठी वाचकांकडून वर्गणी घेतली जाणार नाही. वाचकाला ज्ञान साहित्याचा आस्वाद घेण्याचा हक्क प्रदान करण्यात आला आहे.

**२) सार्वजनिक पेशामधून उदरनिर्वाह :-** ग्रंथालयाची स्थापना, विकास आणि देखभाल हे शासनाचे कर्तव्य राहील. त्यासाठी नागरिकाकडून ग्रंथालय कर वसुल करण्यात येईल. ग्रंथालय कराशिवाय इतर आवश्यक निधी स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य आणि केंद्र शासन विविध प्रकारे पुरवतील.

३) या कायद्यानुसार स्थापन झालेली संस्था आहे. लोकशाही रूजविण्यासाठी शिक्षित समाज असणे आवश्यक असते. म्हणून कायदा करून सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना व विकास केला पाहिजे. ही जबाबदारी राष्ट्राची/ शासनाची आहे. हे तत्व पाळावयास हवे.

**४) माहिती केंद्र :-** सार्वजनिक ग्रंथालय हे माहिती केंद्र आहे.

## ग्रंथालयाचे वर्गीकरण व प्रमुख अटी

### तक्ता क्रमांक १

| अटी | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| ग्रंथसंख्या | १५००१ | ५००१ | १००१ | १०१ |
| दैनिके | १६ | ६ | ४ | ४ |
| नियकालिके | ५१ | १६ | ६ | ६ |
| सभासद | ३०१ | १०१ | ५१ | २६ |
| कामाचे तास | ६ | ६ | ६ | ६ |
| स्वतंत्र बालविभाग | आवश्यक | आवश्यक | नाही | नाही |
| महिला | आवश्यक | आवश्यक | नाही | नाही |
| महिला विभाग | आवश्यक | आवश्यक | नाही | नाही |
| सांस्कृतिक कार्यक्रम | १० | ४ | नाही | नाही |

**ग्रंथालयाचे वर्गीकरण व प्रमुख यादी दर्शविणारा तक्ता**

**संदर्भ :-**

पूर्ण विभाग ग्रंथालय संघ व पूर्ण जिल्हा ग्रंथालय संघ संयुक्त व वार्षिक अधिवेशन स्मरणिका, ज्ञानदिप, सार्वजनिक वाचनालय लेख सु. ना. कांबळे, सन १९९९ स्थळ पृष्ठ १०

**शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या वर्गवारीनुसार कर्मचारी संख्या विहीत आकृतीबंध**

**तक्ता क्र. २**

| पदनाम | जिल्हा | तालुका | | इतर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | अ | ब | क | ड |
| ग्रंथपाल | १ | १ | १ | १ | १ | १ | १ |
| सहा. ग्रंथपाल | १ | १ | ० | १ | ० | ० | ० |
| निर्गम सहाय्यक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| लिपीक | १ | १ | १ | १ | १ | ० | ० |
| शिपाई | २ | १ | १ | १ | १ | १ | ० |
| एकूण | ६ | ४ | ३ | ४ | ३ | २ | १ |

**शासमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या वर्गवारीनुसार कर्मचारी संख्या दर्शविणारा तक्ता**

**संदर्भ :-**

महाराष्ट्र शासन/ उच्च तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. १०९६/ ७५/८८०/९६१/ सारी ५ मंत्रालय विस्तार भवन मुंबई – ४०००३२, दि. २२/०१/१९९८

**शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना मंजूर करण्यात येणाऱ्या परिरक्षण अनुदानाचे विवरणपत्र**

**तक्ता क्र. ३**

| ग्रंथालयाचा दर्जा | कमाल वार्षिक | परिरक्षण अनुदान वेतनेतर | एकूण अनुदान |
|---|---|---|---|
| जिल्हा अ | १२०००० | १२०००० | २४०००० |
| जिल्हा ब | ६४००० | ६४००० | १२८००० |
| तालुका अ | ६४००० | ६४००० | १२८००० |
| तालुका ब | ४८००० | ४८००० | ९६००० |
| तालुका ब | २४००० | २४००० | ४८००० |
| तालुका क | ४८००० | ४८००० | ९६००० |
| इतर अ | ३२००० | ३२००० | ६४००० |
| इतर ब | १६००० | १६००० | ३२००० |
| इतर क | ५००० | ५००० | १०००० |
| इतर ड | १६००० | १६००० | ३२००० |

**शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना मंजूर करण्यात येणाऱ्या परिरक्षण अनुदानाचे विवरण दर्शविणारा तक्ता**

| | |
|---|---|
| प्रत्येक शाखेसाठी | प्रत्येक शाखेसाठी |
| रू. ४०००/– | रू. ४०००/– |

**संदर्भ :–**

ग्रंथपरिवार संपादक ना. वि. देशपांडे, मराठवाडा विभाग, ग्रंथालय संघ औरंगाबाद वर्ष १७ वे अंक जाने. २००२ पृ. १०

## २.८) संशोधन विषयाचा पुर्वाभ्यास :-

**१) सोलापूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयामधील महिला वाचकांची वाचनाभिरूची एक अभ्यास**

**संशोधकाचे नांव :-** भालेराव अनंतमनी पोपटलाल

**मार्गदर्शक :-** प्रा. आडसकर पी. व्ही.

**उद्दीष्टे :-**

१) सोलापूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाचा सद्यस्थितीचा आढावा घेणे

२) सार्वजनिक ग्रंथालयातील महिला वाचकांच्या वाचनाभिरूचीला अनुसरून वाचन साहित्याची उपलब्धता जाणून घेणे

३) सार्वजनिक ग्रंथालयातील महिला वाचकांच्या वाचनाभिरूचीचा परामर्श घेणे

**गृहितके :-**

१) सोलापूर शहरातील ग्रंथालये समृध्द आहेत.

२) सदरील ग्रंथालयाचे दर्जेनुसार अ, ब, क, ड यामध्ये वर्गीकरण केले आहे.

३) सार्वजनिक ग्रंथालयातील महिला सभासदांची संख्या मर्यादित आहे.

**२) नगरवाचन मंदिर सार्वजनिक वाचनालय पंढरपूर वाचकांची वाचन अभिरूची एक अभ्यास**

**संशोधकाचे नांव :-** अत्रे विवेक विजय

**मार्गदर्शक :-** प्रा. सरसंबे एस. जी.

**उद्दीष्टे :-**

१) नगरवाचन मंदिर पंढरपूर वाचनालयातील वाचन नियमित वाचनालयाचा वापर करतात काय याचा शोध घेणे.

२) प्रत्येक प्रकारचे वाचक कोणत्या प्रकारचे वाचन करतात याचा शोध घेणे

**गृहीतके :-**

१) ज्ञानाचा विकास सामाजिक संशोधनामुळे ज्ञानाच्या कक्षा विस्तारीत होतात सामाजिक घटक व तथ्ये या संबंधी सखोल ज्ञान प्राप्त होते.

२) सामाजिक जीवनाचा शास्त्रीय अभ्यास संशोधनाव्दारे सामाजिक जीवनाचा शास्त्रीय अभ्यास करता येतो समाजातील बदलांची प्रकिया समजते.

३) मानवतेचे कल्याण संशोधनाचा उद्देश केवळ अभ्यास करणे हा नसून त्याव्दारे मानवतेचे कल्याण साधायचे असते मानवाला भौतिकदृष्ट्या सुरक्षितता प्रदान करायची असते.

**३) पंढरपूर येथील नगरवाचन मंदिर सावरकर वाचनालय या ' अ ' दर्जा प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयाचा तुलनात्मक अभ्यास**

**संशोधकाचे नांव :-** श्री. तोडकर नागनाथ धोंडीराम

**मार्गदर्शकाचे नांव :-** प्रा. डॉ. आडसकर पी. व्ही.

**उद्दीष्टे :-**

१) सदरील ग्रंथालयातील इमारत, फर्निचर, आर्थिक स्त्रोत, मनुष्यबळ, सोयी सुविधा या दृष्टीकोनातून तुलनात्मक अभ्यास करणे.

२) सदरील ग्रंथालयातील वाचकांच्या गरजा जाणवून घेणे.

३) सदरील ग्रंथालयाच्या सुधारणेच्या दृष्टीकोनातून उपाय योजना सुचविणे.

**निष्कर्ष :-**

१) ' अ ' दर्जाचे ग्रंथालयास वाचन साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

२) दोन्ही ग्रंथालयाना स्वत:ची इमारत आहे.

३) दोन्ही ग्रंथालयाना शासकीय अनुदान प्राप्त होत आहे.

४) नगर वाचन मंदिर या वाचनालयाने आपले सभासद वाढविणे गरजेचे आहे.

**शिफारशी :-**

१) सावरकर मुक्तव्दार वाचनालयातील ग्रंथपालाने ग्रंथालय माहिती शास्त्रांचा अद्ययावत बी. लिब. कोर्स पूर्ण करून घ्यावा.

२) दोन्ही ग्रंथालये ३६५ दिवस खुले ठेवून अखंड सेवा देण्याचा प्रयत्न करावा.

३) दोन्ही ग्रंथालयानी आपल्या कार्यालयीन वेळेत वाढ करावी.

४) दोन्ही ग्रंथालयानी सामाजिक कार्यक्रम वाचनालयात राबवावे.

**४) श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज सार्वजनिक ग्रंथालय एक अभ्यास**

**संशोधकाचे नांव :-** क्षिरसागर वैशाली अंकुश

**मार्गदर्शकाचे नांव :-** प्रा. रेघे एम. एम.

**उद्दीष्टे :-**

१) श्री संत ज्ञानेश्वर महाराज सार्वजनिक ग्रंथालयाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२) ग्रंथालयात पुरविल्या जाणाऱ्या सेवा सुविधांचा अभ्यास करणे.

३) सदरील ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या अमुद्रित साहित्याचा शोध घेवून त्याची वर्गवारी करणे.

**निष्कर्ष :-**

१) वाचकाना वाचन साहित्याची यादी पुरविली जाते.

२) हस्तलिखिते स्वतंत्र कपडयात बांधून ठेवली आहेत.

३) ग्रंथालयात वीज खंडीत झाल्यास इनव्हर्टरची सोय केलेली आहे.

४) वाचकांना पाहिजे असलेले वाचन साहित्य ग्रंथालयात मिळते.

५) या वाचनालयामध्ये बाल वाचकाचे प्रमाण जास्त आहे.

**शिफारशी :-**

१) ग्रंथालयात बाल वाचकांची संख्या जास्त आहे म्हणून ग्रंथालयात बाल साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध करावे व छंद जोपासावे.

२) सामाजिक जनजागृतीसाठी ग्रंथालयाने विशेष प्रयत्न करावेत.

३) बाल वाचकासाठी स्वतंत्र वाचन कक्ष असला पाहिजे.

४) महिलांसााठी पाककला, मेहंदी, शिवणकाम इ. साहित्य खरेदी करावे.

५) महिला वाचकाचे प्रमाण वाढविण्यासाठी ग्रंथालयाने प्रयत्न करावा.

**५) सोलापूर जिल्ह्यातील ' अ ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील सेवक अभ्यास**

**संशोधकाचे नांव :-** मोरे वैशाली

**६) सातारा शहरातील नगरवाचनालयातील साखळी योजनेचा अभ्यास**

**संशोधकाचे नांव :-** राऊत स्मिता

**७) पुणे शहरातील ' अ ' वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांचा अभ्यास**

**संशोधकाचे नांव :-** बनसोडे विकास

# प्रकरण तिसरे

## माहिती संकलन

**३.१) प्रस्तावना :-**

ज्ञानाची सदावर्ती म्हणजे सार्वजनिक ग्रंथालये ही ग्रंथालये सतत समाजाचा सर्वांगिण विकास करण्याच्या कार्यात व्यस्त असतात कारण या ग्रंथालयाची स्थापना सेवाभावी संस्था म्हणूनच करण्यात आली आहे.

समाजातील जबाबदार नागरिकाच्या जीवनाला सखोलता व अर्थ प्राप्त करून देणाऱ्या काही आत्मप्रवृत्ती असतात उदा आध्यात्मिक तत्वचिंतनाची प्रवृत्ती सांस्कृतिक असते सौंदर्यशास्त्रीय प्रेरणा अशा काही प्रेरणा वा प्रवृत्तीमुळे जीवनाला आशय आणि उदात्तता मिळत असते धर्म, संस्कृती, कला अशा गोष्टी जतन करून पुढच्या पिढीला सुसंस्कृत करण्याचे कार्य सेवाभावी संस्था करतात आणि ही सेवाभावी संस्था म्हणजे सार्वजनिक ग्रंथालये या ग्रंथालयामधून जातीभेद न मानता विविध वाचक वर्गासाठी ज्ञान साहित्य पुरवून सांस्कृतिक कार्यक्रम राबवून सामाजिक योगदानाचे कार्य केले व सुसंपन्न नागरिक घडवून समाज घडवण्यास हातभार लावला जातो.

संशोधकानी निवडलेला विषय ' पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाचा चिकित्सक अभ्यास ' या ग्रंथालयाच्या सामाजिक योगदानाचा अभ्यास हा असल्याने विषयाचे तथ्य माहिती संकलन करण्याचा प्रयत्न या तिसऱ्या प्रकरणात केला आहे यामध्ये संशोधकांनी समाज सामाजिक योगदानाचा अर्थ ग्रंथालय एक सामाजिक संस्था ग्रंथालय आणि समाज, सार्वजनिक ग्रंथालये स्वरूप व महत्व तसेच कार्यक्षम सार्वजनिक ग्रंथालये गरज याबद्दल माहिती दिली आहे तसेच प्रकरणाचा समारोप करताना राजाराम मोहनरॉय प्रतिष्ठान सार्वजनिक ग्रंथालयातील कसे वरदान आहे याची थोडक्यात माहिती दिली आहे.

## ३.२) सामाजिक योगदानाचा अर्थ :-

योगदानही अत्यंत अमूर्त व अस्पष्ट म्हणूनच कल्पना आहे तरीही योगदानाची व्याख्या करावयाची झाल्यास ती कशी करता येईल की कोणत्याही संस्थेने संस्थेच्या व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी जे कार्य केले आहे ते कार्य म्हणजे सामाजिक योगदान ठरेल.

ग्रंथपालन हे एक सामाजिक शास्त्र आहे म्हणून ग्रंथालयाकडून निश्चित अशी कामे करून सामाजिक सर्व घटकांना सेवा दिली जाते समाजातील सर्व सभासदापर्यंत ज्ञानाचे संप्रेषण करणे औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणामध्ये मदत करणे व पुढील सुपूर्द करणे अशा अनेक जबाबदाऱ्या ग्रंथालये पूर्ण करीत असतात.

जो जी नागरिक लिहू वाचू शकतो त्या प्रत्येकाला वाचनसाहित्य उपलब्ध करून दे एवढेच नव्हे तर लहाना पासून थोरापर्यंत सर्व नागरिकामध्ये वाचनाची आवड निर्माण करून तिचा विकास करीत राहणे ही ग्रंथालयाची प्रमुख भूमिका आहे समाजाच्या प्रगतीसाठी अने सामाजिक संस्थाचा हातभार लागतो ग्रंथालय ही सुध्दा एक महत्वाची सामाजिक संस्था आहे ती आपली भूमिका पूर्ण करीत असताना सामाजिक विकास साधत असते.

## ३.३) ग्रंथालय एक सामाजिक संस्था :-

महत्वाची व आवश्यक अशी सामाजिक संस्था म्हणून ग्रंथालयाचे महत्व मान्य झालेले आहे कारण सामाजिक विकासाबरोबर ग्रंथालयाचा विकास होतो ग्रंथालयाच्या विकासामुळे सामाजिक विकासात हातभार लागतो आज ग्रंथालये म्हणजे एखादी इमारत किंवा एखादी खोली किंवा खोल्याचा समूह आणि त्यातील ग्रंथसंग्रह असा अर्थ होतो इ.स. १५ व्या शतकापासून हा अर्थ अस्तित्वात आहे. याच अर्थाच्या दृष्टीकोनातून ग्रंथालय ही प्रत्येक समाजातील महत्वाची व उपयुक्त अशी संस्था आहे सांस्कृतिक विकासाचे द्योतक असे जे ज्ञान असते त्याचे जतन ग्रंथालय करतात त्या ज्ञानाचे लेखन व वाचन यांचा जास्तीत जास्त उपयोग सुरू केला तसतसा तो अधिकाधिक सुसंस्कृत होवू लागला लिखित ज्ञानच ग्रंथालयात संग्रहीत केले जाते म्हणून ग्रंथालये ही समाजाशी व संस्कृतीशी संबंधित असतात.

ग्रंथालये लेखकाकडून वाचकाकडे ज्ञान प्रवाहित करतात म्हणूनच ती संप्रेषण केंद्रे बनतात समाजामध्ये संप्रेषणाचे माध्यम किंवा साधन म्हणून ग्रंथालये महत्वाची ठरतात.

रोमन काळात ग्रंथालये सर्वासाठी खुली होती पण नंतर त्यांचा प्रयोग मर्यादित झाला व ग्रंथतर कडी कुलपात ठेवले गेले विद्येच्या पुनरूज्जीवनाच्या काळात पुन्हा लेखन व मुद्रण कलेमुळे अनेक ग्रंथ उपलब्ध होवू लागले अनेक वाचकांना ते वाचण्यासाठी उपलब्ध करणे शक्य होवू लागले व ग्रंथालये हे काम करू लागले.

**३.३.१) ग्रंथालय :-**

मानवी समाजाच्या विकासात ग्रंथालयासारख्या एका सामाजिक संस्थेचा उदय हा मानवाच्या सामाजिक परिपक्वतेचा पुरावा ठरला जस-जसे ग्रंथाचे उत्पादन वाढू लागले तसतसे त्यांच्या जास्त प्रति उपलब्ध होवू लागल्या आणि त्यामुळे ग्रंथ व ग्रंथालये यांच्या संकल्पनेमध्ये बदल होवू लागला समाजाच्या सर्व थरातील लोकापर्यत ग्रंथ पोहोचले पाहिजेत कारण समाजाच्या प्रत्येक घटकाला त्याचा फायदा झाला पाहिजे अशा गोष्टी समाज धुरीणांना, ग्रंथालय शास्त्रज्ञांना व शासकीय अधिकाऱ्यांनाही मान्य झाल्या.

ग्रंथ हे ज्ञान संप्रेषणासाठी आहेत हे मान्य झाल्याने ते संप्रेषणाचे साधन म्हणून उपयोगात येऊ लागले. इतर संस्थाप्रमाणेच ग्रंथालयेही सुध्दा एक सामाजिक व आवश्यक अशी संस्था आहे हे समाजाला मान्य झाले.

पूर्वीच्या किंवा जुन्या विचारानुसार ग्रंथ आणि कर्मचारी एवढेच ग्रंथालयाचे महत्वाचे घटक होते. काही काळानंतर वाचक किंवा उपयोग कर्ता हाही महत्वाचा घटक ठरू लागला. ग्रंथालयातील ग्रंथपाल हे ग्रंथ व वाचक यांना एकमेकाच्या जवळ आणण्याचे प्रयत्न करू लागले म्हणूनच ग्रंथालय या सामाजिक संस्थेचे ज्ञान प्रसाराचे काम शक्य होऊ लागले.

समाज Society म्हणजे एकमेकांशी सहकार्याने राहणाऱ्या व्यक्तीचा समूह यातील व्यक्ती एकत्रितपणे एकमेकांना काही गोष्टी करीत असतात त्यासाठी सर्वमान्य मार्गाचा स्वीकार करीत असतात त्यासाठी सर्वमान्य मार्गाचा स्वीकार करून सर्वानाच फायदा करून दिला जातो याच समाजातील सर्व घटकांनी समाजातील निर्माण केलेली एक संस्था म्हणून ग्रंथालय पुढील प्रकारचे कर्तव्य पार पाडते.

### ३.३.२) ग्रंथालयाची कर्तव्ये :-

१) समाजातील कोणीही सभासद त्याच्या स्वत:च्या विकासासाठी ज्ञान व शिक्षण प्राप्त करून घेवू शकतो या ज्ञानासाठी किंवा शिक्षणासाठी लागणारी साधने ही ग्रंथालयाकडून उलब्ध करून दिली जातात.

२) संशोधक जुने दुर्मिळ तसेच आधुनिक किंवा नव्याने निर्माण झालेले वाचन साहित्य संघटित करून त्याचा पुरवठा संशोधन करणारी ग्रंथालये सतत करीत असतात.

३) राजकीय, सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील घटना व समस्या यांच्या विषयांची माहिती ग्रंथालयाकडूनच समाजाला उपलब्ध करून दिली जाते राजकीय परिस्थिती बदलली किंवा सुधारणा घडवून आणण्यासाठी अशी माहिती सर्वानाच आवश्यक असते.

४) औद्योगिक उत्पादन क्षमता विकसित होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान तांत्रिक व वैज्ञानिक विकास आणि नव्या उत्पादन पध्दती याची माहिती उद्योजकांना तंत्रज्ञान आणि संचालकांना ग्रंथालयाकडून दिली जाते.

५) संस्कृती प्रत्येक राष्ट्रातील तत्वचिंतकाचे विचार ज्यांच्या ग्रंथातून प्रकट होतात असे ग्रंथालय म्हणजे राष्ट्रांचा मौल्यवान ठेवा असतो व तो ठेवा आजच्या व पुढच्या पिढीसाठी ग्रंथालये जतन करून ठेवत असतात.

आधुनिक काळातील सर्व ग्रंथालये ही सर्वच्या सर्व कर्तव्ये पूर्ण करू शकतीलच असे नाही पण काही ग्रंथालयाना तरी यापैकी काही कर्तव्ये पूर्ण करता येतात व ती सामाजिक संस्था म्हणून आपली भूमिका निभावतात.

माहितीच्या गरजा भागविणे व मनोरंजन ही करणे ही आमच्या आधुनिक ग्रंथालयाची उद्दीष्टे असतात त्यासाठी योग्य मार्गदर्शन वाचकांना योग्य सेवा प्रचलित घडामोडीवरील माहितीचा संचय करणे व त्याचे वर्गीकरण व तालिकाकरण करणे यांच्या सहाय्याने सामाजिक संस्था म्हणून असलेले ग्रंथालयाचे महत्व समाजाच्या सर्व थरापर्यत पोहोचवता येते.

### ३.४) ग्रंथालय आणि समाज :-

आदर्श व उन्नत समााजाचे ध्येय साधण्यासाठी प्राचीन काळापासून समाजामध्ये विविध संस्थाची निर्मिती झालेली आहे उदा शाळा महाविद्यालये, विद्यापीठे या सारख्या शैक्षणिक संस्था तसेच ग्रंथालये सुध्दा अशाच प्रकारची संस्था आहे ग्रंथालय समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मूलभूत स्वरूपाची कार्य करीत आहेत माहिती देवून मनुष्याला जागृत करण्याचे कार्य ग्रंथालये पुस्तकाद्वारे करीत असतात. अभिरूची पूर्ण ग्रंथ वाचकांच्या हाती देवून सुसंस्कार करतात ही माहिती ज्ञान मनोरंजन व संस्कार देवून ग्रंथाच्या माध्यमातून वाचकांची जडणघडण करण्याचे मोठे अदभूत सामर्थ्य ग्रंथालयामध्ये असते समाजाला प्रगतीपथावर नेण्याची प्रेरणा आणि त्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान व संस्कार हे दोन्ही ग्रंथालयाव्दारे समाजाला उपलब्ध होत असतात.

### ३.५) ग्रंथालय आणि शिक्षण :-

१) औपचारिक

२) अनौपचारिक

औपचारिक शिक्षणामध्ये विद्यार्थी आपले नाव शाळा महाविद्यालये अगर विद्यापीठ या सारख्या संस्थेमध्ये दाखल करीत असतो व तेथे त्याला शिक्षक प्राध्यापक नियमितपणे शिकवित असतात.

अनौपचारिक शिक्षणामध्ये मात्र विद्यार्थी शाळा महाविद्यालयात न जाता पत्र व्यवहाराद्वारे खाजगी वर्गामध्ये अभ्यास करून किंवा स्वत:च पुस्तके वाचून ज्ञान संपादन करीत असतो शिकत असतो त्याच्या या शिक्षणामध्ये ग्रंथालये महत्वाची भूमिका बजावतात.

औपचारिक शिक्षणाला मदत करण्याची जबाबदारी शाळा महाविद्यालयातील शैक्षणिक ग्रंथालया खेरीज सार्वजनिक क्षेत्रातील ग्रंथालयावर ही आहे म्हणून सार्वजनिक ग्रंथालयाने प्रमाणात का होईना आपल्या कार्यक्षेत्रातील विद्यार्थी व शिक्षक वर्गाला उपयुक्त ठरतील अशा प्रकारची पुस्तके आपल्या संग्रही आवश्य ठेवावीत व गरजूंनी त्याचा लाभ घ्यावा समाजातील सर्व घटकांना ग्रंथालयीन सेवा देणे हे सार्वजनिक ग्रंथालयाचे उद्दीष्ठ्य असेल तर विद्यार्थी व शिक्षक हे

ही समाज घटकच आहेत त्यांच्यासाठी योग्य ती ग्रंथालयीन सेवा सार्वजनिक ग्रंथालयामधून दिली जाते तसेच अनौपचारिक शिक्षणामध्ये भारतासारख्या ग्रामीण भागास अशा विकसनशील देशात खेड्यातील अनेक प्रकारानी मार्गदर्शन सुलभ उपाय म्हणजे सार्वजनिक ग्रंथालयेच होय.

## ३.६) ग्रंथालय आणि माहिती संप्रेषण :-

ग्रंथालये हे मूलतः त्यातील पुस्तके व इतर वाचन साहित्याचा संग्रहामुळे एक माहिती केंद्रच असते समाज विकासाच्या दृष्टीने होणाऱ्या प्रत्येक मानवी कार्यक्रमासाठी माहिती अगदी महत्वाची प्राथमिक गोष्ट आहे. संशोधक शिक्षक, विद्यार्थी, प्रशासक, औद्योगिक व तांत्रिक क्षेत्रातील व्यवस्थापक कलावंत एवढेच नव्हे तर शेतकरी मजूर आदि सर्वानाच उपयोग होत असतो अशा प्रकारची उपयुक्त माहिती पुरविणारे ग्रंथ व वाचन साहित्य मिळविणे व गरजू वाचकांना मागणीनुसार त्याचे वितरण करणे हेच ग्रंथालयाचे अंगभूत कार्य असते त्यासाठी ग्रंथालयास माहिती केंद्र असे दुसरे नामाभिधान आहे.

वाचकाच्या सामाजिक, आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक असणारी माहिती साठवून ठेवणे हेही कार्य ग्रंथालय करीत असते उदा. नोकरी, व्यवसायाची गरज असणाऱ्या तरूणांसाठी व्यवसाय मार्गदर्शनपर साहित्य स्वतःचा उद्योग धंदा सुरू करू इच्छिणाऱ्यासाठी डू इट युवर सेल्फ सारखी माहितीपर पुस्तके अशा प्रकारच्या पुस्तकाव्दारे ग्रंथालय समृध्द व संपन्न असले पाहिजे की समाजातील बहुविध घटकांना आवश्यक ती माहिती तेंथे उपलब्ध झाली पाहिजे.

## ३.७) ग्रंथालयाचे प्रकार :-

ग्रंथालयाचे कार्य व वाचकांचे प्रकार या इतर गोष्टींच्या संदर्भात ग्रंथालयाचे खालील प्रकार पडतात.

१) शैक्षणिक ग्रंथालय

२) सार्वजनिक ग्रंथालय

३) विशेष ग्रंथालय

### ३.७.१) शैक्षणिक ग्रंथालय :-

शैक्षणिक संस्था म्हणजे शाळा महाविद्यालये व विद्यापीठ यामध्ये ग्रंथालय विद्यार्थी वर्ग यांना हवी असलेली माहिती व त्या अनुषंगाने उपयुक्त पुस्तके पुरविण्याचे कार्य असतात.

### ३.७.२) सार्वजनिक ग्रंथालय :-

सार्वजनिक ग्रंथालय त्यातील सार्वजनिक या शब्दाप्रमाणे समाजातील सर्वासाठी उपलब्ध असतात समाजातील सर्व स्तरावर व्यक्ती अध्यापक व विद्वान व्यक्तीपासून अल्पशिक्षित व्यक्तीपर्यंत सार्वजनिक ग्रंथालयीन सेवेचा लाभ घेवू शकतात अशा ग्रंथालयाचा लाभ घेणारे वाचक विविध वयोगटातील व विविध स्तरावर शिक्षण घेतलेले व घेणारे नागरिक असतात बहुतांश वाचक अशा ग्रंथालयात केवळ करमणूकीसाठी जातात व अशांची संख्या जास्त असते त्यामुळे या ग्रंथालयात सोयी सुविधा पुस्तके व नियतकालिके यांचा संग्रह प्रामुख्याने आढळतो काल्पनिक गोष्टी कादंबऱ्या विनोदी लेखा संग्रह अशा पुस्तकांना या ग्रंथालयात विशेष मागणी असते. स्थानिक समाजातील विविध व्यवसायीकांना आपापल्या व्यवसायाला उत्तेजन देण्यासाठी उपयुक्त पुस्तके उपलब्ध करून देण्याचे तसेच स्थानिक माहिती असलेली पुस्तके संग्रहित करण्याचे काम ग्रंथालयास करावे लागते.

### ३.७.३) विशेष ग्रंथालय :-

वैशिष्ठ्यपूर्ण काम करण्यासाठी ही ग्रंथालये आपल्या सेवा प्रदान करतात अशा वैशिष्ठ्यपूर्ण ग्रंथालयाचे अनेक प्रकार आहेत. उदा. बाल ग्रंथालये, माहिती ग्रंथालये क्षेत्रात काम करण्यासाठी खास ग्रंथालये म्हणजेच संशोधन किंवा शासकीय ग्रंथालय उद्योजकासाठी औद्योगिक ग्रंथालय अंधासाठी ग्रंथालय अशी अनेक प्रकारची विशेष ग्रंथालये अस्तित्वात आहेत.

### ३.८) कार्यक्षम सार्वजनिक ग्रंथालये समाजाची गरज :-

ग्रंथालयाच्या प्रकारापैकी सार्वजनिक ग्रंथालय महत्वपूर्ण आहेत. शैक्षणिक व विशेष ग्रंथालये त्या संस्थेच्या ध्येयधोरणानुसार चालविली जातात. त्या संस्था पुरतीच मर्यादित असतात शैक्षणिक ग्रंथालय त्या त्या शिक्षण संस्थेचा अभ्यासक्रम व अध्यापनाला उपयुक्त असा संग्रह

प्रामुख्याने केला जातो तर विशेष ग्रंथालयात तेथे येणाऱ्या विशिष्ट वाचक  वर्गासाठी संशोधक शां  ज्ञ अभ्यासक यांच्यासाठी ग्रंथसंग्रह केला जातो मात्र एकाच वेळी विद्यार्थी सामान्य वाचक व संशोधक या सर्वाची सोय सार्वजनिक ग्रंथालय करू शकते.

सार्वजनिक ग्रंथालय सेवा ही ज्ञान आणि मनोरंजनासाठी आवश्यक आहे असे ग्रंथालय सेवाच्या आरंभापासून सांगीतले जात असे तसेच लोकशाही दृढ करण्याकरीता आणि निरंतर शिक्षणाची सोय करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयेही आवश्यक आहे असेही सांगीतले जाते समाज शास्त्रज्ञाच्या तसेच मानस शास्त्राच्या मतानुसार उत्तम सार्वजनिक ग्रंथालयीन सेवा असते ही समाजाची मानस शास्त्रीय गरज आहे. नागरिकांच्या वैयक्तिक पातळीवरच्या तसेच सामुहिक पातळीवर मानसिक गरजा किती तरी मोठ्या प्रामणात सार्वजनिक ग्रंथालयाच्या माध्यमातून भागविता येतात.

## ३.९)  सार्वजनिक ग्रंथालये स्वरूप व महत्व :-

समाजाचे व व्यक्तीचे स्वातंत्र्य, वैभव व विकास ही मूलभूत अशी मानवी मुल्ये आहे ती साध्य करण्यासाठी नागरिकांना व्यवस्थीत माहिती मिळत राहिली पाहिजे तरच ते लोकशाही हक्क बजावू शकतील आणि समाज कार्यक्षम भूमिकाही करू शकतील त्याची विधायक कामगिरी आणि लोकशाहीचा विकास या गोष्टी यांच्या शिक्षणावर अवलंबून राहतात त्याच बरोबर ज्ञान, विचार, संस्कृती व माहिती यांच्या पर्यत पोहोचवण्याचे अनिर्बध स्वातंत्र्यही मिळावे लागत. याबाबतीत सार्वजनिक ग्रंथालये महत्वाची ठरतात. कारण ही ग्रंथालये म्हणजे ज्ञानापर्यत जाण्याचे स्थानिक पातळीवरील  महाद्रिघ असतात कारण व्यक्तीला व समाजाचे आयुष्यभराचे अध्ययन निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आणि सांस्कृतिक विकास यातही ग्रंथालये ही मदत करीत असतात संस्कृती, माहती शिक्षण यांचा जीवनस्त्रोत म्हणून सार्वजनिक ग्रंथालयावील विश्वास व्यक्त करणारा युनेस्कोचा जाहीरनामा होय त्यानुसार सार्वजनिक ग्रंथालये ही शांती व आत्मिक कल्याण मिळण्यास मानवी मनाना प्रोत्साहित करतात.

**३.१०) सार्वजनिक ग्रंथालयाचे स्वरूप :-**

१) सार्वजनिक ग्रंथालये ही म्हणजे स्थानिक माहिती केंद्र असते त्याचा उपयोग करणाऱ्याना सर्व प्रकारचे ज्ञान व माहिती उपलब्ध होते.

२) वय, लिंग, जात, धर्म, राष्ट्रीयत्व, भाव किंवा सार्वजनिक दर्जा यापैकी कशाचाही भेदभाव न करता सर्वाना समभावाने सेवा देणारी ही ग्रंथालये असतात.

३) भाषेच्या दृष्टीने अल्पसंख्याक, अपंग, रूग्ण किंवा कैदी यांना स्वतंत्र प्रकारची सेवा ही ग्रंथालयाकडून मिळू शकते.

**३.११) सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्य :-**

१) शैक्षणिक कार्य

२) सांस्कृतिक कार्य

३) माहिती पुरविण्याचे कार्य

४) मनोरंजनात्मक कार्य

**१) शैक्षणिक कार्य :-**

सार्वजनिक ग्रंथालय हे एक शैक्षणिक केंद्र मानले जाते म्हणूनच या ग्रंथालयाने औपचारिक, अनौपचारिक, प्रौढ व निरंतर अशा सर्व प्रकारच्या शिक्षणाला व संशोधकासाठीही कार्य केले पाहिजे. त्यासाठी ग्रंथालयात इतर वाचन साहित्याचा पुरेसा संग्रह करून तो समाजाच्या सर्व घटकांना उपलब्ध करून दिला पाहिजे.

ज्या गांवामध्ये वाहतूकीच्या साधनाअभावी वाचन साहित्य पोहोचू शकत नसे तेथेही अशा वाचनाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत अशा वेगवेगळ्या व त्याच मार्गाचा अवलंब केला तरच शैक्षणिक कार्य पूर्ण करणे शक्य होते.

**२) सांस्कृतिक कार्ये :-**

कोणत्याही समाजाच्या सांस्कृतिक विकासात पुढील दोन गोष्टी महत्वाच्या असतात.

अ) वाचन व विचार यांच्यामुळे सौदर्यपूर्ण असे आस्वादन वाढीस लागते यामुळे मानसिक पातळीवरील विचाराच्या कक्षा रूंदावतात व मानवाच्या विधायक क्षमतेचा विकास होतो आणि या गोष्टी सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रयत्नामुळे साध्य होतात तेथे उपलब्ध होणाऱ्या वाचन साहित्यामुळे हा विकास घडू शकतो.

ब) ग्रंथालयीन वाचन साहित्य उपलब्ध करून दिले जाते याशिवाय अशी ग्रंथालये समाजासाठी काही विस्तारित कार्यक्रम राबवितात त्यामुळे समाजातील अनेक घटक एकत्र येतात आणि विचाराची देवघेव होते त्यामुळे सर्वाचाच सांस्कृतिक विकास होतो.

क) जनतेसाठी व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, ग्रंथप्रदर्शन व सांस्कृतिक मेळावे यांचे आयोजन करून सार्वजनिक ग्रंथालये समाजाचे सांस्कृतिक वैभव वाढवू शकतात बदलत्या संस्कृतीचे प्रतिबिंब वाचन साहित्यातून दिसत नसते अशा साहित्याचे जतन करून तो ठेवा पुढच्या पिढ्याकडे सोपविण्याचे कामही ग्रंथालये करू शकतात. अशा रितीने सार्वजनिक ग्रंथालये आपले सांस्कृतिक कार्य पूर्ण करू शकतात.

**❊ ग्रंथालयाचे सांस्कृतिक कार्यक्रम :–**

वाचनालयाने दरवर्षी तीन ते चार सांस्कृतिक कार्यक्रम करावेत.

१) ग्रंथ प्रदर्शन भरवावे

२) दिवाळी अंकाचे प्रदर्शन भरवावे

३) व्याख्यानमाला ठेवावी.

४) ग्रंथालय सप्ताह साजरा करावा १४ ते २० नोव्हेंबर दरम्यान

५) राष्ट्रीयदिन साजरे करावेत उदा. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे, १४ सप्टेंबर, १४ नोव्हेंबर, ९ ऑगस्ट

**३) माहिती पुरविण्याचे कार्य :–**

पारंपारिक मार्गाने वाचकांना संदर्भ सेवेसारख्या सेवा देणे तेवढेच सिमित कार्य सार्वजनिक ग्रंथालयाकडून आता अपेक्षित नाही तर समाजाच्या इतर सामाजिक व आर्थिक गरजा भागविणारी

माहिती सेवाही द्यावी लागते त्यामुळे या ग्रंथालयाना माहिती पुरविणारे व संदर्भ निदर्शक केंद्र म्हणून काम करावे लागते व विशेष प्रकारच्या माहिती साधनामधून माहिती पुरविण्याची सेवा द्यावी लागते.

ग्रामीण भागातील सार्वजनिक ग्रंथालयाना पुढील गोष्टीची माहिती देवून तेथील जनतेला सेवा द्याची लागते त्या जनतेसाठी उपलब्ध असणाऱ्या व उपलब्ध होवू शकणाऱ्या रोजगाराची संधी पुढीलप्रमाणे :–

१) सार्वजनिक क्षेत्रातील सेवासंधी

२) समाज कल्याण संस्थाकडून मिळणाऱ्या सुविधा

३) विकसन खात्याचे विविध कार्यक्रम आणि त्यापासून ग्रामीण जनतेला मिळणारे फायदे

**४) मनोरंजनात्मक कार्ये :–**

सामान्य जनतेला निखळ मनोरंजनाला वाव मिळण्याची सोय करणे किंवा त्याच्या रिकाम्या वेळेचा सदुपयोग करण्याच्या संधी त्यांना उपबल्ध करून देणे हे सार्वजनिक ग्रंथालयाचे आणखी एक महत्वाचे कार्य आहे कामाच्या जबाबदाऱ्या व ताण यांनी शिणलेल्या जनतेला कथा, कादंबऱ्या, नियतकालिके, वृत्तपत्रे असे हलके फुलके वाचन साहित्य द्यावे लागते त्यायोगे त्यांचे मनोरंजनही होवू शकते व नव्या जबाबदाऱ्या घेण्यास उत्साही वाढू लागतो त्याच्याकडून त्यांची कामे उत्तमपणे पार पाडण्यामागे अंतिम: सर्वाचाच विकास होण्यास हातभार लागतो असे हे मनोरंजनात्मक कार्य ही आवश्यक आहे. आता तर त्यासाठी दृकश्राव्य साधने उपलब्ध होवू शकतात त्याच्या सहाय्याने ही ग्रंथालये अशी अधिक सेवा देवू शकतात या मार्गाने त्या ग्रंथालयाचा उपयोगही वाढू शकतो.

**❊ ध्येय व उद्देश :–**

सार्वजनिक ग्रंथालये सुरू करताना मनोरंजन, साक्षरता शिक्षण व संस्कृती यांच्याशी संबंधित असणाऱ्या पुढील ध्यासाचा विचार केला जातो.

१) बाल वाचकामध्ये वाचनाच्या सवयी निर्माण करून त्यांचा विकास करणे.

२)	सर्व पातळीवरील वैयक्तिक व स्वयंशिक्षण आणि औपचारिक शिक्षण यांना पाठींबा व प्रोत्साहन देणे.

३)	समाजातील सर्व घटकांच्या व्यक्तिगत व विधायक विकासाच्या संधीबाबत मार्गदर्शन करणे.

४)	बालके आणि युवक यांच्या कल्पना शक्तीला व विधायक शक्तीला प्रोत्साहन देणे.

५)	वैधानिक व तांत्रिक यश यांची कदर करून एकूणच सांस्कृतिक वारसा जपण्याबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्यासाठी कलेच्या माध्यमातून सांस्कृतिक वारसा सादर करणाऱ्यांना संधी मिळवून देणे.

अशा तऱ्हेने सामान्य जनतेची विद्यापीठे म्हणून भूमिका वाढवण्याचे ध्येय या ग्रंथालयासमोर असावे लागते अशा ध्येयाच्या पूर्ततेसाठी काही निश्चित उद्देश ठरविले तर कार्याचा मार्ग स्पष्ट होतो.

**३.१२) राजाराम मोहन राय ग्रंथालय प्रतिष्ठानची अर्थ सहाय्याच्या योजना :-**

देशातील सार्वजनिक ग्रंथालये समृध्द व्हावीत म्हणून प्रतिष्ठान ज्या काही अर्थ सहाय्याच्या योजना राबविते त्या दोन प्रकारच्या आहेत.

१) समतुल्य सहाय्य योजना

२) असमतुल्य सहाय्य योजना

समान अर्थसहाय्य योजना म्हणजे राज्य शासनाचा जेवढा निधी तेवढाच हिस्सा प्रतिष्ठानचा मिळून समतुल्य सहाय्य योजना तयार होते तर असमतुल्य अर्थ सहाय्य योजना म्हणजे प्रतिष्ठानच्या पूर्ण निधितून राबविण्यात येणाऱ्या योजना होय.

**अ)	समतुल्य सहाय्य योजना :-**

**१)	ग्रंथसंग्रह वाचन साहित्य दृकश्राव्य साधने वाढविण्यासाठी अर्थ सहाय्य.**

अ)	ग्रंथ आणि वाचक हे ग्रंथालय सेवाचे दोन मूलभूत घटक आहेत म्हणून प्रतिष्ठानतर्फे दिल्या जाणाऱ्या अर्थ सहाय्याचा मोठा हिस्सा ग्रंथसंग्रह वाढविण्यासाठी दिला जातो.

ब)	जेंव्हा समतुल्य अर्थ सहाय्याच्या तत्वावर सहाय्य दिले जाते तेंव्हा ग्रंथाची निवड खरेदी व वाटप करण्याची जबाबदारी राज्य शासन किंवा केंद्र शासन प्रशासनाची असते.

क)	समतुल्य सहाय्य तत्वावर मदत करण्याची जबाबदारी राज्य ग्रंथपाल समितीवर सोपविली आहे.

**२)	ग्रामीण ग्रंथालय केंद्र आणि फिरत्या ग्रंथालय सेवांच्या विकासासाठी अर्थसहाय्य :-**

या योजनेत ग्रामीण व शहरी जनतेस वाचनाचा लाभ मिळावा म्हणून ग्रंथसंचय केंद्र स्थापन करून त्याव्दारे फिरती ग्रंथालये सेवा सुरू करण्याबाबत विचार करण्यात येतो जिल्हा ग्रंथालये आणि त्याच प्रमाणे इतर निवडक ग्रंथालये या केंद्र म्हणून काम करतात तेथून त्या परिसरातील ग्रंथालय केंद्राना वाचनासाठी ग्रंथ पुरविले जातात वाचन झाल्यानंतर या ग्रंथ संचयात ठराविक कालावधीनंतर बदल करून दिला जातो ज्या दुर्गम भागातील जनतेला ग्रंथालय सेवा उपलब्ध नाहीत तेथे ग्रंथालय सेवा उपलब्ध करून देणे व जनतेमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे अल्पशिक्षित तसेच नवसाक्षरासाठी ही लाभदायक योजना असून त्यांना उपयुक्त ठरतील असेच अभिरूची संपन्न ग्रंथ केंद्राव्दारे त्यांच्यापर्यत पोहोचविणे आवश्यक असते.

**३)	चर्चा सत्र, परिसंवाद, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग आणि ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यासाठी अर्थ सहाय्य :-**

समाजाच्या वाढत्या गरजा लक्षात घेवून ग्रंथालयीन सेवाचे मुल्यांकन करून त्यांचा गुणात्मक दर्जा व उपयुक्तता वाढविणे गरजेचे आहे त्या दृष्टीने सार्वजनिक ग्रंथालयातून सामाजिक विषयावरील चर्चासत्रे, व्याख्याने आयोजित केली जातात ग्रंथालय संचाव्दारे ग्रंथालय प्रशिक्षण वर्ग घेवून कर्मचाऱ्यांचा गुणात्मक दर्जा वाढविण्याचा प्रयत्न केला जातो तर थोर पुरूषाच्या जयंती महोत्सवानिमित्त तसेच सार्वजनिक ग्रंथालय वर्धापन दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शने आयोजित करून जनतेस वाचनाची अभिरूची जोपासण्याचे कार्य सार्वजनिक ग्रंथालये करतात अशा सर्व

सार्वजनिक ग्रंथालयाना प्रोत्साहन मिळावे त्यांना आर्थिक सहाय्य मिळावे म्हणून प्रतिष्ठानने १९७८–७९ पासून ही योजना कार्यान्वित केली आहे.

**४) ग्रंथ ठेवण्यासाठी कपाट/रॅक मांडणीसाठी सामान अर्थसहाय्य योजना :–**

ग्रंथालये ही संस्था असल्याने ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह वाचन साहित्य यात दिवसेंदिवस भर पडते. त्यामुळे साहित्याचे जतन व संवर्धन करण्यास सार्वजनिक ग्रंथालयाना कपाटे/ रॅक खरेदीसाठी ही योजना १९७८–७९ मध्ये मंजूर केली या योजनाची प्रत्यक्ष अंमल बजावणी १९७९–८० पासून सुरू झाली.

**५) सार्वजनिक ग्रंथालयाना शैक्षणिक उपक्रमासाठी दूरचित्रवाणी संचासह व्ही.सी.पी. संच घेण्यासाठी समतुल्य अर्थसहाय्य योजना :–**

ज्ञानाचा प्रसार दिवसें दिवस झपाट्याने होत आहे त्या दृष्टीने ग्रंथालयाना ज्ञानसंग्रह व माहिती संपादन करून ती वाचक अभ्यासकांना पुरविणे गरजेचे आहे ग्रंथ व नियतकालिके याच बरोबर ग्रंथालय सेवेने दृकश्राव्य साधनाच्या सहाय्याने विविधता यावी व प्रयोजनासाठी प्रतिष्ठानने सार्वजनिक ग्रंथालयांना दूरचित्रवाणी संच व व्ही. सी. पी. संचासाठी अर्थ सहाय्य देण्याची योजना सन १९७८–७९ मध्ये सुरू केली आहे.

**६) जिल्हा स्तरावरील सार्वजनिक ग्रंथालयाना इमारत विस्तार बांधणीसाठी समतुल्य अर्थ सहाय्य :–**

शासनाद्वारे चालविलेल्या किंवा अनुदानित जिल्हास्तरा खालील सार्वजनिक ग्रंथालयाना नवीन ग्रंथालय इमारत उभारल्या साठी किंवा वापरात असलेल्या ग्रंथालय इमारतीचा विस्तार करण्यासाठी अर्थ सहाय्य देण्यात येते ही योजना १९८९–९० पासून स्वीकारण्यात आलेली आहे.

**ब) असमतुल्य सहाय्य योजना :–**

**१) केंद्रीय/मध्यवर्ती ग्रंथनिवड पध्दतीने ग्रंथालयाना पुरेसा ग्रंथसंग्रह वाढविण्यासाठी अर्थ सहाय्य :–**

राज्य मध्यवर्ती ग्रंथालये, जिल्हा ग्रंथालये किंवा इतर प्रतिष्ठानने निवड केलेल्या सार्वजनिक ग्रंथालयाना ग्रंथ व साहित्य पुरविणे हा या योजनेचा उद्देश आहे याशिवाय नेहरू युवक केंद्र विश्वभारती संघटना विभागाव्दारे चालणाऱ्या ग्रंथालयाना ग्रंथ संच पुरवून देशात वाचनाची अभिरूची वाढविण्याचे कार्य सातत्याने चालावे असाही उद्देश आहे.

**२) केंद्रशासनाने पुरवठा केलेंल्या ग्रंथालयाना अर्थसहाय्य :-**

या योजनेतून भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयामार्फत युवक सेवा कार्यक्रमासाठी देशातील जिल्हा केंद्र मानून नेहरू युवक केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे या युवक केंद्रामार्फत १५ ते ३५ वयोगटातील शाळेत न जाणाऱ्या युवकांची कल्याण योजना राबविण्यात येते.

**३) चर्चासत्र/राष्ट्रीय पातळीवर ग्रंथालय संघाची परिषद आयोजित करण्यासाठी असमतुल्य सहाय्य योजनेतून अर्थसहाय्य :-**

राष्ट्रीय पातळीवरील ग्रंथालय संघटनाना व्यवसायिक चर्चा सत्र किंवा परिषद आयोजित करण्यासाठी सहाय्य करणे हे या योजनेचे उद्दीष्ट आहे.

**३.१३) पंढरपूर शहराचा इतिहास :-**

पंढरपूर हे दक्षिण भारतातील एक प्राचीन तीर्थक्षेत्र भारताची दक्षिण काशी म्हणून सर्वत्र ओळखले जाते पंढरपूर हे महाराष्ट्राच्या सोलापूर जिल्हयातील कुर्डूवाडी  या गावापासून सुमारे ३२ मैलावर आहे त्याचा पंढरपूर, पंढरी, पांडुरंगपुर, पंढरपूर, पौडरीक क्षेत्र, पंडरगे पांडुरंगपल्ली अशी विविध नावे आहेत संतजन या क्षेत्राचा भुवैकुंठ किंवा दक्षिण काशी म्हणून उल्लेख करतात.

पंडरंगे हा कानडी शब्द आहे त्याचे पंडरिका, पंडरी किंवा पंढरी असे रूप झाले असले पाहिजे पंढरी या शब्दाला पूर हा नगरवाचक प्रत्यय लागून पांढरीपूर आणि मग पंढरपूर हा शब्द बनला. डी. राज पुरोहित व डॉ. रा. गो. भांडारकर यांनी अनुक्रमे पंढरीकपूर वपांडुरंगपूर या शब्दापासून पंढरपूर हा शब्द व्युत्पादला आहे.

पंढरपूर हे क्षेत्र भिमा नदीच्या तीरावर वसलेले आहे या ठिकाणी ही नदी अर्धचंद्राकृती वाहते म्हणून तिला चंद्रभागा हे नांव मिळाले आहे पंढरपूर क्षेत्राचे महात्म्य सांगणारा पंढरी महात्म्य हा एक नामक संस्कृत ग्रंथ आहे हा ग्रंथ स्कंदपुराणातर्गत समजला जातो त्यामध्ये पंढरपूराचे वर्णन आहे.

पौण्डरीकमिति ख्यात तिर्थ क्षेत्रच पुजितम ।
पांण्डूरंगश्च तवस्ते मूर्तिमान देवतोत्तम ।।
अर्थयोजन विस्तीर्ण तद्‌र्थाया मसाम्यतिम् ।

सर्वश्रेष्ठ देव पांडुरंग मुर्तिरूपात आहे हे क्षेत्र अर्धा योजन लांब आहे व त्याची रूंदी तदर्थ म्हणजे एक कोस आहे पंढरी महात्म्यात पंढरी क्षेत्र वर्णनाबरोबरच तिथल्या व्दारांचाही उल्लेख आहे. या क्षेत्राचे पुर्वेकडील द्वार भीमा व शिशुमाला या नद्यांच्या संगमावर आहे तिथे संध्याकाळी देवीचे स्थान आहे मानसून हे याचे दक्षिणव्दार आहे. तिथे सिध्देश्वर शिवलिंग आहे. भीमा व पुष्पावती या नद्यांच्या संगमावर हे व्दार आहे. भुवनेश्वरी देवीचे स्थान हे याचे पश्चिमव्दार होय.

**३.१४) संशोधन :–**

शब्दकोषात संशोधन (Reserarch) पुन्हा पुन्हा शोधणे असा आहे. अभ्यासाच्या किंवा काळजीपूर्वक तपासाच्या अथवा सखोल चौकशीच्या सहाय्याने वस्तुस्थिती किंवा तथ्य शोधून काढण्याच्या शास्त्रीय स्वरूपाचा पध्दतशीर प्रयत्न म्हणजे संशोधन होय.

**३.१५) संशोधनाची व्याख्या :–**

**१) स्लेसिजर व स्टिफन्सन –**

सामाजिक घटना विषयाच्या ज्ञानाच्या कक्षा वाढविण्यासाठी याची प्रचिती घेण्यासाठी त्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी सामान्यीकरण करण्यासाठी त्याच प्रमाणे व्यावहारीक उपयुक्ततेसाठी विशिष्ट वस्तुची संकलनाची अथवा प्रतिकाची सुव्यवस्थीत हाताळणी करणे म्हणजे संशोधन होय.

**गोपाळ बेणारे, राणा पंढरीचा, श्री संतवाङमय सेवा प्रकाशन पंढरपूर १९९३ पान नं. १९**

## २) The New Century Dictionary :-

एखाद्या विषयाचा विशेष काळजीपूर्वक शोध घेणे म्हणजे संशोधन अगर नवीन बाब शोधून काढण्यासाठी सातत्याने काळजीपूर्वक केलेली चिकित्सा म्हणजे संशोधन होय.

## ३) जे डब्ल्यू बेस्ट :-

संशोधन ही एक व्यवस्थीत क्रिया होय ज्याव्दारे शोध घेतला जातो आणि संघटीत ज्ञानाच्या अंगाचा विकास केला जातो.

## ४) वेबस्टरच्या शब्दकोषानुसार :-

संशोधन म्हणते तथ्ये वा तत्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परीक्षण किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पध्दतशीरपणे केलेले परीक्षण होय.

५) काळजीपूर्वक शोध घेणे म्हणजे संशोधन होय.

## ३.१६) संशोधनाचे प्रकार :-

संशोधनाचे व्यवहारापयोगी दोन प्रकार आहेत.

**१) मुलभूत संशोधन/पायाभूत संशोधन**

**२) उपयोजित संशोधन**

## १) मूलभूत संशोधन/पायाभूत संशोधन :-

कोणतेही उद्देश जाणीवपूर्वक न बाळगता केलेले संशोधन म्हणजे मूलभूत संशोधन होय.

या संशोधनात संशोधक स्थायी तत्वाचा शोध घेत असतो तो संशोधकात एखादा सिध्दांत मांडतो मूलभूत संशोधनात संशोधक निसर्गातील रहस्य उलगडण्याचा प्रयत्न करतो तो आज्ञेच्या शोधात असतो हे संशोधन पूर्णत: वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असते मूलभूत संशोधनापासून संशोधकाला आत्मिक आनंद आणि समाधान मिळत असते.

## २) उपयोजित संशोधन :-

मूलभूत संशोधनावर आधारित उपयोजित संशोधन असते वाफेच्या शक्तीचा शोध हे मूलभूत संशोधन आहे तर त्या शक्तीचा वापर दैनंदिन गरजेच्या प्रेशर कुकर मध्ये करून कमी वेळात उर्जेची बचत करून अन्न शिजविणे हा उपयोजित संशोधनाचा प्रकार आहे.

**३.१७) संशोधन पध्दती :-**

संशोधन प्रामुख्याने तीन पध्दतीने केले जाते.

**१) वर्णनात्मक संशोधन पध्दती**

**२) ऐतिहासिक संशोधन पध्दती**

**३) प्रायोगिक संशोधन पध्दती**

या तीन पध्दतीपैकी प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा संशोधक उपयोग करणार आहे.

**३.१७.१) वर्णनात्मक संशोधन पध्दती :-**

सर्व सामाजिक शास्त्रामध्ये वर्णनात्मक पध्दतीचा फार मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो वर्णनात्मक संशोधनात घटनेच्या सामाजिक संस्थेच्या/एखादा उपक्रमाच्या सद्यस्थितीचा सर्वकंश अभ्यास प्रगतीचा आढावा घेण्यात येतो व विश्लेषणात्मक वर्णन करण्यात येते अशा सर्व संशोधनास वर्णनात्मक संशोधन पध्दती असे म्हणतात. म्हणून सत्य शोधन वाचकासंबधीचा अभ्यास यासारख्या गोष्टीचा वर्णनात्मक संशोधनात समावेश होतो.

**वर्णनात्मक संशोधन पध्दतीचे गुण :-**

१) वस्तुनिष्टपणे गोळा केलेली माहिती

२) उपयुक्त माहितीचे वर्गीकरण माहितीचे शास्त्रशुध्द विश्लेषण

३) चिकित्सा

४) चिकित्सेला लाभलेली चिंतनाची पार्श्वभूमी

**वर्णनात्मक पध्दतीचे महत्व :-**

वर्णनात्मक पध्दतीचे महत्व स्पष्ट करताना असे सांगता येईल की आधुनिक काळात सर्व ज्ञानाचे वर्णन प्रधान होत आहे त्या दृष्टीने वर्णनात्मक पध्दतीचे महत्व अनन्यसाधारण आहे. वर्णनात्मक संशोधन हे सत्य शोधनाशी संबंधीत असते या प्रकारच्या संशोधनामध्ये सत्य

परिस्थितीचा शोध घेणे हे उद्दीष्ट असते सत्य परिस्थितीचा चिकित्सकपणे शोध घेतल्यावर आणि योजनेतील गुणदोषांची चर्चा केल्यावर मार्गदर्शक सूचना करू शकतो अशाप्रकारे या संशोधनाव्दारे कार्यकर्ते योजनाकार, व्यवस्थापक राजकीय संस्था यांना त्यांच्या नियोजनात मार्गदर्शन प्राप्त होते.

वर्णनात्मक पध्दतीच्या आधारे साधन सामुग्रीव्दारे मिळवलेली माहिती योग्य पध्दतीने शास्त्रशुध्द पध्दतीने मांडली जाते तेंव्हा संशोधनास सुरूवात होते अशी ही वर्णनात्मक पध्दती साधन वाटते पण फार महत्वाची आहे विषयानुसार स्वरूप बदलते.

### ३.१७.२) ऐतिहासिक संशोधन पध्दती :–

इतिहास विषयक व ऐतिहासिक संशोधनात ऐतिहासिक साधनांचा जमवा जमवीला फार महत्वाचे स्थान आहे वर्तमान काळातील भूतकाळातील विविध अवशेषातून भूतकाळ व इतिहासकाळ समजून घ्यावा लागतो यावरून इतिहासकालीन घटनांची अनुभूती करायची असते यामुळे ऐतिहासिक संशोधनात साधनाचे स्वरूप निर्माण झाले आहे.

सर्व संशोधन पध्दतीमध्ये ऐतिहासिक संशोधन पध्दती अतिशय उपयुक्त अशा प्रकारची आहे. गतकालीन प्राचीन घटनांचा अभ्यास या पध्दतीव्दारा करावा लागतो कालचा समाज आणि आजचा समाज, उद्याचा समाजाचा मूलाधार असतो.

गतकालीन घटनांचा मागोवा घेताना त्याचे स्वरूप अनेकवेळा गुंतागुंतीचे संदिग्ध निरीक्षक, बाह्य व कालबाह्य तसेच दूर अंतरावरचे असते सहाजिकच अशा घटनांचा अभ्यास एका वेगळ्या पध्दतीनेच करावा लागतो या नवीन पध्दतीलाच ऐतिहासिक संशोधन पध्दती असे म्हणतात.

ऐतिहासिक संशोधनात चिकित्सा पायाभूत सुविधा आहे ऐतिहासिक घटनांचा बाबतीत ज्यांनी प्रत्यक्ष एखादी घटना पाहिलेली असते किंवा ज्यांची तिच्यात भागीदारी असते अशांचे अभिप्राय व प्रतिक्रिया विचारात घेणे महत्वाचे असते.

**३.१७.३) प्रायोगिक संशोधन पध्दती :–**

प्रायोगिक ही संशोधनाची प्रवृत्ती असावी लागते तरच त्याचा सांप्रत परिस्थितीत सुधारणा करण्याची जाणीव होते प्रायोगिक संशोधन पध्दतीमध्ये कोणत्याही गोष्टीत घडून येणाऱ्या बदलांचे विश्लेषण असते.

जे गृहीतक सोडून संशोधनाला निश्चित दिशा द्यावयाची असते या गृहितांची चाचणी घेण्यासाठी प्रायोगिक संशोधन पध्दती वापरतात त्या गृहितांची चाचणी घेण्यासाठी प्रायोगिक संशोधन पध्दती वापरतात. एफ. एस. चॅपिन म्हणतात, ' नियंत्रिक परिस्थितीत केलेले नियंत्रण म्हणजे प्रयोग होय ' एखाद्या समस्येमध्ये अंतर्गत असणाऱ्या विविध घटकांवर प्रकाश पाडण्यास जेंव्हा निरीक्षण पुरे पडते तेंव्हा संशोधकाच्या प्रयोगाचा आसरा घेणे जरूरीचे असते.

**३.१८) माहिती संकलनाची तंत्रे :–**

सदर संशोधनात वर्णनात्मक पध्दतीचा वापर करून माहिती संकलनाची साधने प्रश्नावली व अनुसूची ही तंत्रे वापरतात वर्णनात्मक संशोधनात पाहणी या तंत्रावरून प्रश्नावली माहिती संग्रहासाठी वापर केला जातो आणि अनुसूची या साधनाचा उपयोग करून माहिती संकलित करतात याचा फायदा असा होतो कीं एखाद्या प्रश्नाबद्दल किंवा मुद्याबद्दल उत्तरदात्याला स्पष्टीकरण हवे असल्यास तो प्रश्नकर्ता लगेच देऊ शकतो त्यामुळे कोणताही प्रश्न अनुत्तरीत रहात नाही.

**३.१८.१) प्रश्नावली :–**

सामाजिक संशोधनातील माहिती मिळविण्याचे आणखी एक महत्वपूर्ण साधन म्हणून प्रश्नावलीला ओळखले जाते विविध विषय समजून घेण्यासाठी संबंधिताना प्रश्न विचारावे लागतात संशोधनातील तथ्य मिळविण्याचे प्रश्नावली  हे एक अतिशय महत्वाचे साधन आहे विशिष्ट समस्येचा अभ्यास करण्यासाठी समस्येच्या संदर्भात प्रश्नांची यादी तयार केली जाते याव्दारे संबंधिताकडून संबंधिताची माहिती मिळविली जाते. माहिती मिळविण्यासाठी कोणते साधन वापरावे हे संशोधन विषय व हेतु यावर अवलंबून असते तेंव्हा विशिष्ट समस्येचा अभ्यास करण्यासाठी संबंधिताकडून त्यासंबंधी माहीती म्हणून या प्रश्नाची यादी तयार केली जाते त्यालाच प्रश्नावली म्हणतात.

### ३.१८.२.१) प्रश्नावलीच्या व्याख्या :–

### १) गुड व हॅट :–

सर्व सामान्य प्रश्नावली हे प्रश्नाचे उत्तर मिळविण्याचे एक तंत्र आहे कीं ज्या छापील कागदावरील प्रश्नांची उत्तरे निवडक स्वत:च भरत असतो.

### ३.१८.२.२) प्रश्नावलीची बांधणी :–

प्रश्नावलीची बांधणी करताना अभ्यासकाने काळजी घेतली पाहिजे प्रश्नावलीचा आकार मर्यादित असावा की त्यातील सर्व प्रश्न अभ्यास घटकाच्या प्रतिनिधीना जाणून घेता यावा. प्रश्नावली पाहता क्षणिक वाचण्याची इच्छा होईल चित्ताकर्षकता प्रश्नावली पाहिजे प्रश्नावलीतील प्रश्न सुटसुटीत व स्पष्ट असावेत प्रश्नांची मांडणी व्यवस्थीत असावी प्रश्नांना क्रम अत्यंत तर्कशुध्द व सुसंगत असला पाहिजे.

अभ्यासकाने प्रश्नांची मांडणी अशा प्रकारे करावी की त्याचा अभ्यास घटकाकडून माहिती मिळविताना एखाद्या वर्तुळाच्या परिघाकडून केंद्र बिंदूकडे जायचे आहे याचे भान असावे प्रश्नावलीच्या रचनेच्या आधारावर पडणारे प्रश्नावलीचे प्रकार पुढील प्रमाणे :–

### १) संरचित प्रश्नावली :–

प्रश्नावलीमध्ये जेंव्हा अभ्यास विषयाचा हेतु व ख्याती विचारात घेवून अभ्यासक प्रश्नाचे स्वरूप व क्रम आणि त्यांची पर्यायी उत्तरे यांची योजना बध्दरित्या मांडणी करतो तेंव्हा त्यास संरचित प्रश्नावली असे म्हणतात.

या प्रश्नावलीचे दोन प्रकार पडतात.

### अ) बंदिस्त संरचित प्रश्नावली :–

ज्या प्रश्नावलीमध्ये प्रश्नांना पर्यायी उत्तरे दिलेली असतात अशा प्रश्नावली ना बंदिस्त प्रश्नावली म्हणतात जेंव्हा एकत्रित करावयाची माहिती विशिष्ट वर्गातच वर्गीकृत केलेली असावी अशी अभ्यासकाची इच्छा असते तेंव्हा या पध्दतीचा प्रामुख्याने वापर केला जातो.

**ब) खुली संरचित प्रश्नावली :-**

ज्या प्रश्नावलीमध्ये प्रश्नांची उत्तरे दिलेली असतात आणि उत्तरदात्याने त्या प्रश्नांची उत्तरे स्वत: घ्यावयाची असतात अशा प्रश्नावलीला खुली संरचित प्रश्नावली असे म्हणतात.

**२) असंरचित प्रश्नावली :-**

अभ्यास विषयासंबंधीचे उत्तरदात्याने असणारे दृष्टीकोन याची मते व अभिवृत्ती जाणून घेवून संशोधनाना एक निश्चित दिशा देण्याच्या उद्देशाने वापरली जाणारी लवचिक प्रश्नावली म्हणजेच असंरचित प्रश्नावली होय.

**३) चित्रमय प्रश्नावली :-**

ज्या प्रश्नावलीमध्ये उत्तरदात्याची मानसिकता महत्वाची मानून निश्चित प्रश्नाबरोबरच प्रश्नाच्या अनुषंगाने चित्राचाही अवलंब केला जातो की ज्यामुळे उत्तरदात्याचा उत्साह वाढून अधिकाधिक माहिती मिळविण्याची शक्यता वाढते तिला चित्रमय प्रश्नावली म्हणतात.

वरील प्रश्नावलीमुळे लहान मुलांच्या काही प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी ही पध्दत उपयोगी पडते.

**३.१८.२.३) प्रश्नावलीचे फायदे :-**

**१) वेळ, पैसा व श्रम याची बचत :-**

अभ्यासकाने तयार केलेली प्रश्नावली ही अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केलेली असते निवेदकाला समाजातील असे छोटे पण सुटसुटीत प्रश्न तयार केलेले असतात व ही प्रश्नावली पोस्टाने पाठवावयाची असल्यामुळे जाण्यायेण्यासाठी प्रवास खर्च करावा लागत नाही.

**२)** प्रश्नावली भरून देण्यासाठी निवेदकास पुरेसा वेळ असल्याने त्याची उत्तरे देण्यासाठी भरपूर वेळ लागतो.

**३)** निवेदकाकडून काही कालांतराने त्याच विषयावरील माहिती पुन्हा पुन्हा मिळविता येते.

**४)** विस्तृत स्वरूपात विखुरलेल्या निवेदकासाठी प्रश्नावली हे मंत्र वापरता येते.

**५)** प्रश्नावली पाठवून निवेदकाकडून माहिती मिळविणे प्रश्नावली तंत्रात शक्य होते जेंव्हा जवळ असलेले व दुरवर पसरलेले निवेदक प्रश्नावली माध्यमातून माहिती देवू शकतात

**३.१८.२.४) प्रश्नावलीचे तोटे :-**

**१) निवेदकाची असमर्थता :-**

निवेदक साक्षर असले तरी प्रश्नांची उत्तरे योग्य शब्दात देण्याची त्यांची कुवत असतेच असे नाही.

**२)** प्रश्नावली तंत्राचा वापर केवळ साक्षर निवेदका पुरताच मर्यादित राहतो निवेदकानी प्रश्नावली स्वत: वाचून प्रश्नाची उत्तरे द्यावयाची असतात साहजिकच जर त्या व्यक्ती साक्षर नसतील तर प्रश्नावली त्यांच्याकडे पाठविणे अशक्य असते.

**३)** ज्या निवेदकाना संशोधनाबद्दल प्रेम व आस्था नसते ते प्रश्नावली पाठवून देत नाहीत ते अपेक्षित प्रतिसाद देत नाहीत.

**३.१८.२.५) अनुसुची :-**

अनुसूची हे उत्तरदात्याकडून अभ्यास विषयासंबंधी आवश्यक माहिती मिळविण्याचे एक प्रत्यक्ष तंत्र आहे त्या पध्दतीला अभ्यासासंबंधी प्रश्नांची एक यादी तयार करून अभ्यासक त्या यादीसह उत्तरदात्याकडे जातो व त्यांना प्रश्न विचारून त्यांनी दिलेल्या माहितीची नोंद करतो

**व्याख्या :-**

**१) इ. एस. ओ. गार्डस :-**

अनुसुची ही संक्षित प्रश्नाची यादी असते ही यादी अभ्यासक सामान्यपणे स्वत:कडेच ठेवतो व अभ्यास विषयाच्या चौकशी बरोबरच या प्रश्नांचा यादीतील प्रश्नांची उत्तरे तयार करत असतो.

अनुसूची व प्रश्नावली या माहिती मिळविण्याच्या तंत्रात बरेचसे साम्य आढळते पण प्रश्नावली तंत्राचा वापर करताना अभ्यासक व उत्तरदाते यांचा संबंध अप्रत्यक्षरित्या होत असतो तर अनुसूची तंत्रात तो प्रत्यक्ष व समोरासमोर असतो.

निकोसे सत्यप्रकाश व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती नागपूर प्रकाशन २००७ पृ. ११

**३.१९) अनुसुचीचे प्रकार :-**

या तंत्राचा वापर कोणत्या पध्दतीने केला जातो या आधारावर अनुसूचीचे खालील प्रमाणे प्रकार करता येतात.

**१) निरीक्षण अनुसुची :-**

एखाद्या बाबीचे निरीक्षण करण्यासाठी या अनुसुचीचाच उपयोग केला जातो अभ्यास विषयासंदर्भात महत्वाच्या बाबीचे अभ्यासक उत्तरदात्याकडून माहिती मिळवत असतानाच निरीक्षणही करू शकतो एखाद्या विषयासंबंधी गोळा केलेल्या माहितीचे परिक्षण म्हणूनही अनुसुची उपयुक्त ठरते.

**२) श्रेणी निर्धारण अनुसुची :-**

जेंव्हा व्यक्तीची अभिवृत्ती मते आवडी निवडी अथवा दृष्टीकोन समजून घेण्याचा अभ्यासकाचा उद्देश असतो तेंव्हा अशी अनुसुची वापरली जाते.

**३) लेखी अनुसुची :-**

अभ्यासक चरित्र, आत्मचरित्र, रोजनिशी सरकारी कागदपत्रे इत्यादीतून अभ्यास विषयासंबंधी माहिती गोळा करतो व त्याआधारे अनुसुची तयार करून उत्तरदात्याकडून प्राथमिक माहिती मिळवितो तेंव्हा या अनुसुचीचाच वापर केला जातो.

**४) संख्यात्मक सर्वेक्षण अनुसुची :-**

सामाजिक संस्थाचे स्वरूप व त्यांच्या समस्या याविषयी माहिती संकलित करण्यासाठी या अनुसुचीचाच वापर होतो.

**५) मुलाखत अनुसुची :-**

एखाद्या अभ्यासासंबंधी प्रश्नावली तयार करून त्या प्रश्नावलीतील प्रश्नाप्रमाणे अभ्यास जेंव्हा उत्तरदात्याकडून प्रश्न माहिती स्वत: अनुसुचीत नोंद करतो अशावेळी ही अनुसची उपयुक्त ठरते.

### ३.२०) माहिती संकलनाची साधने :–

संशोधनात संशोधन हाती येताना संशोधकाला प्रस्तावित संशोधनाची माहिती कशाप्रकारे संकलित करायची हे ठरवावे लागते त्यासाठी काही तंत्राची व साधनाची निवड करणे अनिवार्य असते माहिती संकलनाची साधने मुलाखत आणि निरीक्षण ही आहेत याची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे :–

### ३.२०.१) मुलाखत :–

मुलाखतीत इंग्रजीमध्ये Interview म्हणतात म्हणजे Inter अंत व view म्हणजे दृष्टी तेंव्हा एक प्रकारची अंतरदृष्टी अभ्यासकाला प्राप्त करून देणारे एक प्रभावी साधन म्हणून मुलाखतीचा उल्लेख करावा लागतो मुलाखतीत अभ्यासक उत्तरदाता यांच्यात प्रत्यक्ष संवाद घडत असतो ही एक विचारांच्या आदान प्रदानाची दुहेरी प्रक्रिया असते.

**व्याख्या :–**

**१) पी. व्ही. यंत्र :–**

मुलाखत ही अशी सुव्यवस्थीत पध्दती आहे की ज्यायोगे तुलनेने त्रयस्थ असलेल्या व्यक्तीच्या जीवनात अभ्यासक कल्पना शक्तींचा बळावर शिरत असतो.

**२) गुड व हंट :–**

मुलाखत म्हणजे मुलत: सामाजिक आंतरक्रियाचीच प्रक्रिया आहे प्रक्रिया आहे.

पी. व्ही. यंत्र यांनी मुलाखतीचे कार्य मुलाखतीत समाविष्ट होणाऱ्या व्यक्तींची संख्या, मुलाखतीचा कालावधी आणि मुलाखतीचा दृष्टीकोन या आधारावर मुलाखतीचे प्रकार केले आहेत.

**१) मुलाखतीचे कार्य :-**

या आधारावर मुलाखतीचे चार प्रकार घडतात.

**अ) निदानात्मक मुलाखत :-**

एखाद्या सामाजिक समस्येमागील फक्त कारणे शोधण्यासाठी ज्या मुलाखती केल्या जातात तिला निदानात्मक मुलाखत असे म्हणतात.

**ब) उपचारात्मक मुलाखत :-**

एखाद्या सामाजिक समस्येतील कारणाची मिमांसा करून तिच्या सोडवणूकीच्या उद्देशाने जी मुलाखत घेतली जाते तिला उपचारात्मक मुलाखत असे म्हणतात.

**क) संशोधनात्मक मुलाखत :-**

**ज्या मुलाखतीत एखाद्या घटनेमागील कार्यकारण भाव समजून घेणे एवढेच उद्दिष्ट असे तिला संशोधनात्मक मुलाखत असे म्हणतात.**

**ड) साधी मुलाखत :-**

जेंव्हा अभ्यासकाला मुलाखतीत ज्या घटने विषयी माहिती मिळवावयाची असते त्याविषयी निश्चित ठोकताळा तयार करून त्यावर हुकूम प्रश्न न विचारता उत्तरदात्यांना जास्तीतजास्त बोलण्याची संधी देतो त्यास साधी मुलाखत असे म्हणतात.

**२) व्यक्तीची संख्या :-**

या आधारावर मुलाखतीचे पुढील दोन प्रकार पडतात.

**अ) व्यक्तीगत मुलाखत :-**

जेंव्हा अभ्यासक अभ्यास विषयासंबंधीची माहिती व्यक्तीकेंद्रीत पध्दतीने गोळा करतो तेंव्हा त्याला व्यक्तीगत मुलाखत म्हणतात.

**ब) समुह मुलाखत :-**

जेंव्हा अभ्यास विषयासंबंधी आवश्यक माहिती अभ्यासक समुहकेंद्रीत पध्दतीने करतो तेंव्हा त्याला समुह मुलाखत असे म्हणतात.

### ३) कालावधी :–

या आधारावर मुलाखतीचे दोन प्रकार पडतात.

#### अ) अल्पकालीन मुलाखत :–

ज्या मुलाखत प्रक्रियेस कालावधी अल्प असतो अशा मुलाखतीला अल्पकालीन मुलाखत असे म्हणतात घडलेल्या घटनेविषयी तात्काळ माहिती मिळविण्यासाठी अशा मुलाखती घेतल्या जातात.

#### ब) दिर्घ कालीन मुलाखत :–

अभ्यास विषयासंबंधी व्यापक दृष्टीकोन ठेवून समग्र माहिती मिळविण्याचा प्रयत्न दिर्घकालीन मुलाखतीच्या माध्यमातून केला जातो.

### ४) मुलाखतीचा दृष्टीकोन :–

या आधारावर मुलाखतीचे दोन प्रकार पडतात.

#### अ) संरचित मुलाखत :–

ज्या मुलाखतीत प्रश्नांची अनुसूची त्यांच्या पर्यायी उत्तरासह तयार केली जाते आणि त्यावर हुकूम अभ्यासकाने उत्तरदात्याकडून माहिती गोळा करावयाची असते तिला संरचित मुलाखत असे म्हणतात.

#### ब) असंरचित मुलाखत :–

ज्या मुलाखतीत अभ्यासकाने अभ्यासपूर्वक मुलाखती विषयी एक आराखडा आपल्या डोक्यात तयार केलेला असतो पण प्रश्न विचारताना अभ्यासक परिस्थिती सापेक्ष उत्स्फुर्तपणे उत्तरदात्याला प्रश्न विचारून त्याच्याशी संवाद साधतो त्या प्रश्नाला असंरचित मुलाखत असे म्हणतात.

### ५) मुलाखतीचे मुल्यमापन :–

अभ्यासक व उत्तरदाते यांचा प्रत्यक्ष संवाद नैसर्गिक आदान प्रदान होवून उत्तम प्रतिसाद मिळणे शक्य होते खाजगी व व्यक्तीगत माहिती ही उत्तरदात्याकडून मिळत असल्यामुळे सखोल अभ्यास शक्य होतो शिवाय अभ्यासकाच्या प्रत्यक्ष उपस्थितीमुळे उत्तरदात्याच्या उत्तरातील सत्त्यसत्त्यता पडताळून पाहणे शक्य होते.

### ३.२०.२) निरीक्षण :-

निरीक्षण म्हणजे पध्दतीशिररितीने हेतुपुर्वक पहाणे असे म्हटले जाते सामाजिक संशोधनातील निरीक्षण अतिशय महत्वपूर्ण साधन आहे तसेच सामाजिक शास्त्रात निरीक्षणाचा अवलंब केला जातो शास्त्राची सुरूवातच निरीक्षणापासून झाली असे म्हटले जाते.

**१) गुड व हंट :-**

'' Science begings with observation and must ulmitately between to observaiton for final validation ''

**१) निरीक्षण व्याख्या :-**

पध्दतशीरपणे पहाणे व त्याच बरोबर पाहिलेल्या घटनांची चिकित्सा करणे म्हणजे निरीक्षण होय

**२) निरीक्षणाचे प्रकार :-**

१) सहयायी निरीक्षण

२) असहयायी निरीक्षण

३) संमिश्र निरीक्षण

४) नियंत्रित निरीक्षण

५) अनियंत्रित निरीक्षण

**३) निरीक्षणाचे मुल्यमापन :-**

सामाजिक संशोधनात माहिती मिळविण्याचे एक महत्वपूर्ण साधन आहे यात मानवाच्या उपक्रम शक्तीचा पुरेपर उपयोग केला जातो यासाठी इतर कोणत्याही साधनाची आवश्यकता नाही. परिणामी निरीक्षण हे अत्यंत साधे व सोपे असे साधन आहे.

### ❊ पाहणी तंत्र :-

पाहणी क्षेत्राचा वापर वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये प्रचंड प्रमाणात करण्यात आलेला आहे त्यामध्ये समान गट संख्या यांचा सद्यस्थितीचा विश्लेषणत्मक आणि चिकित्सक अभ्यास करणेसाठी योजनाबध्द अशी पाहणीची व्याख्या करावी लागते.

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयांचा चिकित्सक अभ्यास करावयाचा असल्याने या तंत्राचा वापर करून माहिती गोळा केली जाते तसेच या अंकातील अंगभूत माहितीचे विश्लेषण करण्यासाठी आवश्यक आशय विश्लेषण या तंत्राचा वापर केला आहे.

### ३.२१) माहिती संकलन :-

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधनासाठी वर्णनात्मक पध्दतीचा वापर करून पाहणी यातंत्राचा उयोग केला आहे माहिती संकलनासाठी संस्थेच्या दर त्रैमासिक प्रकाशित होणाऱ्या अंकाचा वापर केला आहे. त्रैमासिक अंकाव्दारे पाहणी करून त्यात उपयोगात आणलेल्या लेख, ऐतिहासिक प्रसंग, ऐतिहासिक संशोधन, साहित्य किंवा इतर काही प्रकार हे कितपत प्रमाणात आहेत याचे विश्लेषण केले आहे तसेच मुखपृष्ठ विषयी माहिती दिलली आहे मुखपृष्ठाबद्दल संपादक काय सांगतात हे सांगण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे पायचार्टचा वापर करून लेखाचे प्रमाण दाखविले आहे लेखाचे विविध प्रकार दाखविण्यासाठी तक्त्याचा वापर केला आहे.

# <u>प्रकरण चौथे</u>

## माहिती सादरीकरण आणि विश्लेषण

### ४.१) प्रस्तावना :-

मोठ्या प्रमाणात सर्वच क्षेत्रात माहितीची निर्मिती होत आहे. तेवढ्याच प्रमाणात तिचे महत्वही वाढत आहे व तिचा वापरही तेवढाच वाढला आहे. अशी माहिती सर्वच क्षेत्रात, कार्यात महत्वाची भूमिका बजावत आहे. कोणतेही कार्य करावयाचे असेल त्यासाठी प्रथम प्रत्येक बाबीची माहिती ही हवीच असते. त्याशिवाय कार्याची सुरवात होतच नाही.

आधुनिक काळात व्यवस्थापनास फार महत्व आले आहे त्यामुळे कोणत्याही संस्थेत आपली उद्दीष्टे साध्य करण्यासाठी संस्था यशस्वी चालवण्यासाठी व्यवस्थापनाची गरज असते नियोजन हे व्यवस्थापनाचे एक अंग आहे.

संशोधन ही सतत चालणारी प्रकिया आहे या प्रक्रियेव्दारे नवनवीन ज्ञानप्राप्ती करून घेण्यासाठी प्रयत्न केले जातात संशोधन म्हणजे शास्त्रीय पातळीवरून केलेली चिकित्सा समजली जाते. संशोधनाचे उद्देश निश्चित केल्यानंतर संशोधनासाठी लागणारी आकडेवारी वेगवेगळ्या स्त्रोताव्दारे प्राप्त केली जाते. प्राप्त केलेल्या माहितीचे गुणधर्मानुसार नियोजन करणे म्हणजते आशय विश्लेषण होय.

संशोधकाने प्रस्तूत प्रकल्प हा पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाचा चिकित्सक अभ्यास घेतला आहे यासाठी संशोधकाने प्रत्यक्ष ग्रंथालयाचा वारंवार भेटी देवून सदर ग्रंथालयाच्या कामकाजाचे प्रत्यक्ष निरीक्षण केले ग्रंथपालाच्या मुलाखती घेतल्या आणि प्रश्नावलीचे वाटप करून संबंधीत ग्रंथालयाकडून प्रश्नावली भरून घेतल्या त्याचप्रमाणे ग्रंथालयात ग्रंथपालाच्या वाचकाच्या मुलाखती घेतल्या आहेत. ग्रंथालयाकडून भरून आणलेल्या माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल.

## ४.२) आशय विश्लेषणाची संकल्पना :-

आशय विश्लेषणाची संकल्पना मानव जेंव्हा वाचायला व पहायला लागला तेंव्हापासून संशोधनाची गरज माणसाला भासू लागली व त्यातूनच संशोधन संकल्पना निर्माण झाली. मानव जेंव्हा वाचायला, निरीक्षण करायला व समजावून घ्यायला लागला तेंव्हा याचा तरी विचार करण्यास सुरवात झाली मानवाच्या मनामध्ये आणि ज्ञानामध्ये जन्मताच विचार करण्याची क्षमता असते व त्यामुळे त्यांना ह्या कल्पना कळतात व त्यातुन संकल्पनेची निर्मिती झाली.

### ४.२.१) आशय विश्लेषणाचे महत्व :-

अ) गुणात्मक विषयाचे परिणामात्मक अध्ययन करता येते

ब) प्रचार, प्रसार झाल्याचे स्वरूप व परिणाम ह्या तंत्राव्दारे स्पष्ट करता येते ह्या साधनांचा जनतेवरील वांचकावरील प्रभाव वैज्ञानिक पध्दतीने मापता येतो.

क) साहित्य, शिक्षण, करमणुकीचे साधन ह्यांच्या प्रभावामुळे विश्लेषण करणे शक्य होते.

ड) व्यक्तीने दिलेली भाषणे, मुलाखती प्रसिध्द केलेले लेख, ग्रंथ इत्यादीव्दारे व्यक्तीमत्वाचे अध्ययन करता येते.

## ४.३) ग्रंथालयाचा परिचय :-

**तक्ता क्रमांक १**

| अ.नं | ग्रंथालयाचे नांव | पत्ता |
|---|---|---|
| १ | नगरवाचन मंदिर | उध्दव घाट, पंढरपूर |
| २ | सावरकर मुक्तव्दार वाचनालय | सावरकर पथ, पंढरपूर |
| ३ | सुशील वाचनालय | गांधी रोड, पंढरपूर |
| ४ | संत ज्ञानेश्वर सार्वजनिक वाचनालय | सांगोला रोड, पंढरपूर |
| ५ | शब्दशिल्प वाचनालय | गाताडे प्लॉट मनिषा नगर, पंढरपूर |
| ६ | दलित वाचनालय | इंद्रप्रस्थ शॉपिंग सेंटर, पंढपूर |
| ७ | डॉ. द. ता. भोसले सार्वजनिक वाचनालय | इसबावी, पंढरपूर |

**पंढरपूर शहरातील ग्रंथालयाची माहिती दर्शविणारा तक्ता**

वरील तक्त्यावरून पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाची माहिती सांगता येईल. पंढरपूर शहरामध्ये एकूण सात सार्वजनिक ग्रंथालये असून ते अनुक्रमे नगरवाचन मंदिर, सावरकर मुक्तव्दार वाचनालय, सुशील वाचनालय, संत ज्ञानेश्वर सार्वजनिक वाचनालय, शब्दशिल्प वाचनालय, दलित वाचनालय, डॉ. द. ता. भोसले सार्वजनिक वाचनालय इसबावी, पंढरपूर असे सात ग्रंथालय आहेत त्यापैकी सर्वात जुने नगर वाचनालय असून त्याची स्थापना १८७४ साली नगरवाचन मंदिर पंढरपूर या संस्थेने केली आहे शहरातील ग्रंथालयाची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**१) नगर वाचन मंदिर उध्दव घाट, पंढरपूर :–**

पंढरपूर शहरातील सर्वात जुने ब्रिटीशकालीन सार्वजनिक ग्रंथालय म्हणून नगरवाचन मंदिर हे असून ग्रंथालयाचे जुने नांव 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' असे होते संस्थेची स्थापना ही १ एप्रिल १८७४ साली झाली आहे या ग्रंथालयाची स्थापना येथील श्री. रावबहादूर बाणशंकर उमियाशंकर त्रिवेदी यांनी सन १८७४ साली केली सदर ग्रंथालय इमारत दुमजली आहे त्यास दगडी कंपाऊंड १९४१–४२ मध्ये श्री  ग. सा. अभंगराव व चिटणीस श्री. पा. द. आराध्ये व चेअरमन मगनलाल नेमचंद गांधी असताना झालेले आहे त्यावेळी माजी आमदार श्री. पां. भा. डिंगरे हे दुय्यम चिटणीस होते. सदर इमारतीचे बांधकाम श्री माधव, श्री. रामचंद्र बाळकृष्ण परिचारक, श्री. द. रा. तेरकर श्री. शंकर रामचंद्र बडवे यांनी लोकवर्गणीतून व जातीने देखरेख करून इमारत उभी केली आहे.

८ आक्टोबर १९३२ च्या कार्यकारिणीच्या ठरावान्वये दि. २४/१०/१९३२ रोजी पंडीत मदनमोहन मालवीय यांच्या  भेटीच्या वेळी त्यांच्या हस्ते लायब्ररीच्या नुतन इमारतीचे उदघाटन व नेटिव्ह जनरल लायब्ररी हे पूर्वीचे नांव बदलून पंढरपूर नगरवाचन मंदिर असे नामकरण समारंभपूर्वक करण्यात आले. नगरवाचन मंदिर पंढरपूरची स्थापना १८७४ ला झाली असली तरी वाचनालयास स्वत:ची इमारत मिळण्यास सन ५ मे १९१८ साल उजाडले नगरवाचन मंदिर हे एक सार्वजनिक ग्रंथालय आहे. त्यामुळे समाजातील सर्व स्तरातील वाचकांची गरज पूर्ण करणे हे ग्रंथालयाचे प्रमुख उद्दीष्ट आहे आजूबाजूचा परिसर हा शहरी आहे. तमुळे परिसरातील  बाल,

माहिला, विद्यार्थी, शिक्षक, डॉक्टर, व्यापारी, वकील, शासकीय अधिकारी, व्यावसायिक, वृध्द इ. सर्व प्रकारचे वाचक या वाचनालयात येतात या वाचनालयाकडून वाचकांना वाचन सुविधा आवश्यक तितक्या प्रमाणात उपलब्ध करून दिली जाते. ग्रंथालयाच्या वाचन कक्षात बसून दैनिके, विविध नियतकालिके यांचा वाचनासाठी वापर करणाऱ्या सामान्य वाचकांची संख्या वर्गणीकृत सभासद संख्येपेक्षा जास्त आहे. ग्रंथालयाच्या सर्व सेवांचा लाभ वाचकांना कोणताही भेदभाव न करता देण्यात येतो. नगरवाचनालयास सुमारे ७० ते ७५ वाचक भेट देतात नियमित वाचक संख्या ५० आहे. वाचनालयातील सभासद ग्रहवाचनासाठी ग्रंथ, कथा, कादंबऱ्या याचा लाभ घेतात.

ग्रंथालयामध्ये एकूण ग्रंथसंख्या ३३२०५ एवढी असून ग्रंथ वापरण्याच्या दृष्टीने वाचक व ग्रंथालय कर्मचारी यांना सोयीचे व्हावे म्हणून वेगवेगळी लाकडी कपाटे विशिष्ट ठिकाणी ठेवली आहेत. ग्रंथालयाच्या समोरील बाजुस लाकडी शोकेस आहे. ग्रंथालयातील फर्निचर व्यवस्था पुरेशा प्रमाणात आहे हे वाचनालय सर्व सोयीनी युक्त सक्षम आहे. या ग्रंथालयाला शतायू ग्रंथालय व सोलापूर जिल्हा आदर्श ग्रंथालय पुरस्कार हा मानाचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

**नगर वाचनालयातील सेवक वर्ग दर्शविणारा तक्ता**

| अ.नं. | पद | संख्या | शिक्षण | वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल | १ | बी. लिब | ७५००/– |
| २ | सहा ग्रंथपाल | १ | बी ए | ४२००/– |
| ३ | लिपिक | १ | बी.कॉम. | ३८००/– |
| ४ | सेवक | १ | ९ वी पास | ३०००/– |

## नगरवाचनालयातील वाचकांची यादी

१) श्री. भागवत चंद्रशेखर उत्पात

२) श्री. कोरे अनिल मच्छिंद्र

३) सौ. अनुराधा जयंत हरिदास

४) श्री. धारूरकर बाळकृष्ण दामोदर

५) श्री. घोडके रविंद्र भागवत

६) सौ. कानडे संगिता भागवत

७) श्री. शहापुरे गोपाळकृष्ण दत्तात्रय

८) श्री. महाजन युवराज काशिनाथ

९) श्री. कोल्हापुरे संजय अरविंद

१०) सौ. गाताडे मंजूषा मिलींद

## २)	स्वा. सावरकर मुक्तव्दार वाचनालय :-

स्वा. सावरकर मुक्तव्दार वाचनालय हे शहराच्या मध्यभागी असून वाचनालयाची इमारत भव्य दिव्य अशी आहे. सावरकर प्रेमी मंडळ या संस्थेने हे वाचनालय सुरू केले असून सुरवातीला या मंडळाच्या कार्यकर्त्यांना अभ्यास करण्यासाठी म्हणून लोकाकडून जुनी पुस्तके आणून एक छोटे वाचनालय सुरू केले कै. दत्ता सांगोलकर हे वाचनालय पहात होते. नंतर ते शंकर आप्पा मंगळवेढेकर व वा. ना. उत्पात यांच्या घरी बरेच दिवस चालले त्यापुढे १९७१ साली सावरकर प्रेमी मंडळ ही संस्था पंजीकृत झाली व मुक्तव्दार वाचनालय गाडगे महाराज धर्मशाळेच्या जागेत सुरू झाले. त्याचे उदघाटन श्री. विक्रमराव सावरकर यांनी केले. आरंभी पुस्तक संख्या २४२ होती. तीन वर्षातच पुस्तक संख्या पाच हजारावर गेली. वाचनालय शासनमान्य झाले व अ दर्जा व अनुदानित सुरू झाले आता वाचनालय मोठ्या पण भाडेतत्वावर नवीन इमारतीत स्थलांतरीत केले. पुढे श्री. पंढीतराव व श्री ज्ञानेश्वर आगाशे यांनी त्यांच्या वडीलांच्या स्मरणार्थ ८० × ९० ची खुली जागा मंडळास दान केली १९८० साली मंडळाने त्या जागेवर छोटी तात्पुरती इमारत बांधली व सध्या मुक्तव्दार वाचनालय तेथे स्वत:च्या जागेत चालते. आता वाचानालयात २५००० च्या वर पुस्तके असून सुमारे ९५० वर्गणीदार आहेत रोज येणाऱ्या वाचकांची संख्या २५० ते ३०० आहे. वाचनालयात सावरकरांचे सर्व ग्रंथ तर आहेतच त्याच बरोबर ललित, सामाजिक, चरित्रात्मक ग्रंथ आहेत आज ग्रंथपाल म्हणून योगेश पडवळे व संतोष भोसेकर हे काम पाहतात.

२६ फेब्रूवारी १९६६ या दिवशी स्वातंत्र्यवीर सावरकर समाधीस्त झाले म्हणजे वग्युदेशाकडून त्यांनी आत्म सन्मानपर आत्मार्पण केले त्यांच्या मृत्यूनंतर १३ दिवसांनी सावरकरावर प्रेम करणाऱ्या वा. ना. उत्पात, प्रकाश उत्पात अशा युवकांनी सावरकरांच्या चित्राचे रांगोळी प्रदर्शन तांबट धर्मशाळा गांधीरोड, पंढरपूर येथे भरविले. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू दत्तोपंत पोतदार हे त्या प्रदर्शनाचे उद्घाटनाला आले होते आणि त्याचवेळी सावरकर ग्रंथालय उभा करण्याची कल्पना सुचली. सावरकर वाचनालय १९७३ साली सुरू झाले १९७४ साली नगरपालिकेने सावरकर पुतळा ते शिवाजी पुतळा या रस्त्याला आगाशेपथ हे नामकरण केले त्यावेळी महाराष्ट्र शुगरचे पंडीतराव आगाशे आले होते. त्यांनी ८० × ९० ची जागा दान म्हणून

वाचनालयाला द्यावी अशी विनंती केली त्यांनी ती मागणी मान्य केली. दिलेल्या वचनाप्रमाणे ती जागा मंडळाला त्यांनी दान केली पंढरपूर को–ऑप बँकेने एक लाख रू देणगी दिली व सावरकर क्रांती मंदिराचे काम चालू झाले या क्रांती मंदिरात तळजल्यावर १८५७ ते १९४७ या काळात देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ज्यांनी ज्यांनी मरण पत्करले, फासावर गेले त्या क्रांतीकारकांची चित्रे व माहिती आहे या मंडळातर्फे सावरकर जयंती, सावरकर पुण्यतिथी, युवक व्याख्यानमाला व महिला व्याख्यानमाला असे कार्यक्रम आयोजित केले जातात याशिवाय सावरकर वक्तृत्व स्पर्धा व पाठांतर स्पर्धा घेतली जाते. याच मंडळाने पंढरपूरात टांगा स्टॅण्ड ते रेल्वे रूळ या रस्त्याने नगरपालिकेमार्फत सावरकर पथ असे नामकरण केले येथे सावरकरांचा पुतळा नऊ फुट उंचीचा मंडळाने बसविला आहे. सावरकर वाचनालय गेली ४६ वर्षे सावरकरांचे विचार प्रसार करण्याचे कार्य करत आहे. भविष्यकाळात एक लाख पुस्तकाचे वाचनालय व सावरकर अभ्यास केंद्र चालु करण्याचा मानस आहे.

**सावरकर वाचनालय सेवक वर्ग दर्शविणारा तक्ता–**

| अ.नं. | पद | संख्या | शिक्षण | वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल | १ | १२ वी एलटीसी | ४५००/– |
| २ | सहा ग्रंथपाल | १ | बी ए एलटीसी | ४३००/– |
| ३ | लिपिक | १ | बी ए | ३०००/– |
| ४ | सेवक | १ | बी ए | २७००/– |

**वाचनालयातील वाचकांची यादी**

१) श्री. पी. जे. लाड

२) श्री. विवेकानंद उत्तम कदम

३) श्री. बाबासाहेब राजकुमार फडतरे

४) सौ. करंडे मोहिनी नितीन

६) श्री. रघुनाथ वसंतराव हंपी

७) श्री. पांडूरंग तुकाराम जाधव

८) सौ. सुमित्रा विठ्ठल मिरासदार

९) श्री. राजेंद्र नामदेव केंगार

१०) श्री. विलास किसनराव देशमुख

### ३)     श्री संत ज्ञानेश्वर महाराज सार्वजनिक ग्रंथालय सांगोला रोड, पंढरपूर:-

पंढरपूर येथील ह.भ.प. श्री ज्ञानेश्वर जोगदंड महाराज यांनी वारकरी शिक्षण संस्थेची स्थापना सन २००३ मध्ये केली या संस्थे अंतर्गत श्री संत ज्ञानेश्वर महाराज सार्वजनिक ग्रंथालयाची स्थाना २००३ मध्ये करून या संस्थेमध्ये वाररकरी शिक्षण, धर्मप्रचार, व्यसनमुक्ती, बालसंस्कार शिबिर इ उपक्रम राबविले जातात. श्री. जोगदंड महाराज यांच्या मार्गदर्शनाखराली संस्था नावारूपाला आली आहे. संस्थेमध्ये सध्या दोनशेच्या वपर विद्यार्थी वारकरी शिक्षण घेत आहेत. त्यासाठी त्यांना नाममात्र स्वरूपामध्ये राहणे, जेवण, शिक्षण इ सोयी सुविधा परविल्या जातात. संस्थेअंतर्गत गोशाळा चालविली जाते. सध्या ही संस्था सांगोला रोड, पंढरपूर येथे कार्यरत असून संस्थेचे सर्वेसर्वा श्री. ह.भ.प. जोगदंड महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था वाटचाल करीत आहे संस्थेमधील विद्यार्थी शहरामध्ये परगावी जावून वारकरी पध्दतीचे शिक्षण उदा. भजन, किर्तन, तबला, मृदुंग वाजविणे, हार्मोनियम इ सेवा देतात येथील विद्यार्थी धार्मिक शिक्षणामध्ये प्राविण्य मिळवित आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच धार्मिक, आध्यात्मिकतेची आवड निर्माण व्हावी यासाठी संस्थेने ग्रंथालयाची स्थापना केली ग्रंथालयामध्ये धार्मिक, पौराणिक, आध्यात्मिक ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. इत्यादी उपक्रमाव्दारे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी वाचन संस्कृतीचे जतन केले जाते आज श्री जोगदंड महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था कार्यरत आहे.

**श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज सार्व. ग्रंथालय सेवक वर्ग दर्शविणारा तक्ता-**

| अ.नं. | पद | संख्या | शिक्षण | वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल | १ | बी.ए. | ३०००/- |
| २ | शिपाई | १ | १० वी | २५००/- |

**वाचनालयातील वाचकांची यादी**

१) श्री. गायकवाड प्रणव गणेश

२) श्री. महामुनी आकाश कैलास,

३) श्री. खोत कुलदीप शिवगौडा

४) श्री. पांचाळ बालाजी बंडू

५) श्री. राहुल अतुल डोके

६) श्री. बापू गंगाप्पा चौगुले

७) श्री. जगताप आनंद आण्णासाहेब

८) श्री. जोगदंड राधा ज्ञानेश्वर

९) श्री. शिंदे बाळासाहेब हरिश्चंद्र

१०) श्री. धतुरे आदिनाथ नवनाथ

### ४) दलित वाचनालय पंढरपूर :-

पंढरपूरमध्ये दलित समाज खूप मोठ्या प्रमाणामध्ये आहे या समाजासाठी म्हणून श्री. प्रा. लक्ष्मण ढोबळे यांनी दलित वाचनालयाची स्थापना १९८० मध्ये केली. हा समाज अशिक्षित न राहता तो शिक्षण घेवून पुढे गेला पाहिजे हा उद्देश समोर ठेवून संस्थेचे अध्यक्ष ढोबळे यांनी दलित चळवळ उभी करून दलित समाजासाठी शिक्षण क्षेत्रात खूप मोठे काम केले आहे दलित समाजाच्या उध्दारासाठी म्हणून त्यांनील शाहू शिक्षण संस्थेची स्थापना केली या संस्थे अंतर्गत वेगवेगळ्या शाळा, महाविद्यालये, वसतिगृह चालविली जातात दलित समाज शिकला पाहिजे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून पंढरपूरमध्ये दलित वाचनालयाची स्थापना केली या वाचानालयामध्ये दलित साहित्याची संख्या खूप आहे डॉ बाबासाहेब आंबेडकर, आण्णाभाऊ साठे इयांचे ग्रंथ उपलब्ध आहेत. हे वाचनालय पंढरपूर येथे इंद्रप्रस्थ शॉपिंग सेंटर सावरकर पथ येथे कार्यरत आहे.

**दलित वाचनालय, पंढरपूर येथील सेवक वर्ग दर्शविणारा तक्ता-**

| अ.नं. | पद | संख्या | शिक्षण | वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल | १ | सी टी सी | ४०००/- |
| २ | शिपाई | १ | १० वी | २५००/- |

## वाचनालयातील वाचकांची यादी

१) कांबळे अमर किसन

२) कांबळे संतोष उत्तम

३) मस्के संदिप अंकुश

४) खिलारे बाबासाहेब बलभीम

५) कुचेकर मंगेश अनिल

६) बागल बालाजी हणमंत

७) कुचेकर अक्षय दिलीप

८) रणदिवे श्रीमंत आण्णासाहेब

९) पाटोळे विशाल सुखदेव

१०) खिलारे प्रियंका धनंजय

## ५) शब्दशिल्प वाचनालय, गाताडे प्लॉट पंढरपूर :-

पंढरपूर येथील जुना कराड नाका गाताडे प्लॉट मध्ये सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या स्त्रिया एकत्र येवून सन १९८१ मध्ये शब्दशिल्प वाचनालयाची स्थापना केली सध्या संस्थेच्या अध्यक्षा सौ शारदा महाडिक या असून कार्यवाहक म्हणून सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या सौ मंगलताई शहा काम पाहत आहेत. यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे कार्य चालु आहे मंगलताई शहा यांचे कार्य खूप मोठे आहे त्यांनी एडस् बाधित मुलासाठी म्हणून पालवी संस्था चालू केली या संस्थेमध्ये वेगवेगळे सामाजिक उपक्रम चालविले जातात यासाठी त्यांचे कुटुंब खूप मोलाची साथ देत आहे.

मंगलताईनी खूप मोठ्या धाडसाने या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली वाचनालयात दहा हजाराच्या आसपास ग्रंथ संख्या असुन ग्रंथालय मध्ये वेगवेळे सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात पालवी संस्थेमार्फत एड्सबाधित मुलांसाठी चांगल्या दर्जाचे शिक्षण दिले जाते मंगलताईना ासाठी वेगवेगळे सामाजिक पुरस्कार प्राप्त झाले आहेत त्यांचे कार्य महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात झाले आहे.

**शब्दशिल्प वाचनालय, पंढरपूर येथील सेवक वर्ग दर्शविणारा तक्ता-**

| अ.नं. | पद | संख्या | शिक्षण | वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल | १ | बी.लीब. | ४०००/- |
| २ | शिपाई | १ | १० वी | २५००/- |

## वाचनालयातील वाचकांची यादी

१) डुबल अर्चना

२) कदम गणेश

३) सौ बागल आशा दिलीप

४) कुलकर्णी गौरी

५) सौ टकले वनिता

६) सौ चव्हाण योगीता राहूल

७) शहा प्रमोद

८) ओहाडे ज्योती

९) कोरे परशुराम

१०) शिंदे कोमल विष्णू

## ६) डॉ. द. ता. भोसले सार्वजनिक वाचनालय, इसबावी, पंढरपूर :-

पंढरपूर शहरापासून जवळच इसबावी मध्ये श्री. कल्याण शिंदे, श्री. हणमंत मलपे यांच्या सारख्या तरूणांनी एकत्र येवून पंढरपूर येथील ग्रामीण साहित्यिक श्री. डॉ. द. ता. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच त्यांच्या नावाने सन २००५ मध्ये या वाचनालयाची स्थापना केली आज संस्थेच्या धोरणानुसार संस्था कार्यरत आहे. वाचनालयामध्ये साधारण पाच हजारच्या आसपास ग्रंथ संख्या असून वाचनालयाव्दारे वेगवेगळे सांस्कृतिक कार्क्रम आयोजित केले जातात. त्या बरोबर पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. भविष्यामध्ये वाचनालयाची स्वतंत्र इमारत उभा करून वेगवेगळे सामाजिक कार्य हाती घेण्याचे उद्दिष्ट आहे डॉ द. ता. भोसले यांच्यासारख्या ग्रामीण साहित्यीक यांचे मोलाचे मार्गदर्शन संस्थेला मिळत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था कार्यरत आहे. दरवर्षी या वाचनालयातर्फे वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंतांना राज्यस्तरीय पूरस्कर वितरण केले जातात.

**ग्रंथालय सेवक वर्ग दर्शविणारा तक्ता–**

| अ.नं. | पद | संख्या | शिक्षण | वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल | १ | बी लीब | ४०००/– |
| २ | शिपाई | १ | १० वी | २०००/– |

**वाचनालयातील वाचकांची यादी**

१) बागवान नासीर महंमदशरीफ

२) मलपे संतोष शिवाजी

३) कदम पांडूरंग कृष्णाजी

४) भांगे सागर हणमंत

५) मलपे कविता अरूण

६) गंभीर आदित्य

७) भोसले धनराज शेखर

८) धारेकर संतोष लक्ष्मण

९) कोळी संतोषकुमार शंकर

१०) मलपे कल्याण शिवाजी

## ७) सुशिल सार्वजनिक वाचनालय, गांधी रोड, पंढरपूर :-

सुशिल सार्व वाचनालय हे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून येथील सामाजिक कार्याची आवड असणारे सामाजिक कार्यकर्ते श्री मिलींद उत्पात यांनी इ स २००३ साली श्री सुशिलकुमार शिंदे यांचे नावाने सुशिल वाचनालयाची स्थापना केली. वाचनालयामध्ये अनेक सामाजिक उपक्रम साजरे केले जातात या वाचनालयास इतर ब दर्जा प्राप्त आहे.

**ग्रंथालय सेवक वर्ग दर्शविणारा तक्ता–**

| अ.नं. | पद | संख्या | शिक्षण | वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल | १ | बी कॉम | ३०००/– |
| २ | लिपिक | १ | बी कॉम | २५००/– |
| ३ | शिपाई | १ | १० वी | १८००/– |

**वाचनालयातील वाचकांची यादी**

१) श्री. थोरात उदय नारायण

२) श्री. बेणारे लक्ष्मण गणे

३) सौ. रसाळ कांचन खुशालचंद

४) सौ. सुपेकर अश्विनी

५) श्री. उत्पात हेमंत यशवंत

६) श्री. उत्पात भागवत चंद्रशेखर

७) श्री. माणकेश्वर लक्ष्मीकांत

८) श्री. सलगर बाळासाहेब

९) श्री. कासेगांवकर राजेंद्र

१०) सौ. बडवे सारिका श्रीराम

वरील तक्त्यावरून असे सांगता येईल की, पंढरपूर शहरात एकूण सात सार्वजनिक ग्रंथालय आहेत.

त्यामध्ये सात ग्रंथालयांची सविस्तर माहिती येथे घेतली आहे. सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपाल तसेच प्रत्येक दहा वाचकांची माहिती प्रश्नावली द्वारे प्रत्यक्ष माहिती वरून असे दिसून येते की,


पंढरपूरातील नगरवाचनालय व सावरकर नगरवाचनालय हे प्रामुख्याने ग्रंथसंग्रहाने समृध्द असे वाचनालय दिसून येते. यामध्ये नगरवाचनालय हे सर्वांत जुने असून येथील ग्रंथसंया ३३२०५ आहे तर सावरकर वाचनालय ग्रंथसंख्या २६९८० एवढी आहे. तसेच सुशील सार्वजनिक वाचनालय ग्रंथसंख्या ६२६० एवढी आहे. तर संत ज्ञानेश्वर महाराज सार्वजनिक वाचनालय, सांगोला रोड ग्रंथ संख्या ७६१० एवढी आहे. दलित वाचनालय पंढरपूर, इंद्रप्रस्थ बिल्डींग पंढरपूर ग्रंथ संख्या ३००० एवढी आहे. शब्दशिल्प वाचनालय ग्रंथसंख्या ९२१०, डॉ. द. ता. भोसले सार्वजनिक वाचनालय, इसबावी ग्रंथसंख्या ५२५१ एवढी आहे. तरी प्रत्येक वाचनालयातील प्रत्येक दहा–दहा वाचकांकडून प्रश्नावलीद्वारे माहिती प्रत्यक्ष भरून घेण्यात आलेली आहे. यावरून असे दिसून येते की, सर्वात जुने ब्रिटीशकालीन ‘ नगरवाचन मंदिर ’, ‘ सावरकर वाचनालय ’ हे वाचकांसाठी समृध्द वाचनालय आहे. तसेच वेळोवेळी प्रत्येक वर्षी सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये ‘ संत ज्ञानेश्वर वाचनालय ’ हे धार्मिक ग्रंथासाठी तसेच बालवाचकांसाठी समृध्द आहे.

| अ.क्र. | ग्रंथालयाचे नांव | ग्रंथ संख्या | सभासद संख्या |
|---|---|---|---|
| १ | नगरवाचन मंदिर, पंढरपूर | ३३२०५ | २२० |
| २ | सावरकर वाचनालय | २६९८० | ८८५ |
| ३ | सुशील सार्वजनिक वाचनालय | ६२६० | २५० |
| ४ | दलित वाचनालय | ३००० | १०५ |
| ५ | संत ज्ञानेश्वर महाराज सार्वजनिक वाचनालय | ७६१० | १०५ |
| ६ | शब्दशिल्प वाचनालय | ९२१० | २५० |
| ७ | डॉ. द. ता. भोसले सार्वजनिक वाचनालय | ५२५१ | १८२ |

**पंढरपूर शहरातील ग्रंथालयांचा ग्रंथसंख्या व सभासद संख्या दर्शविणारा तक्ता**

सार्वजनिक ग्रंथालयांच्या उद्देशांच्या व सर्व कामाचा केंद्रबिंदू म्हणजे ग्रंथसंग्रह विभाग होय. हा विभाग ग्रंथालयाच्या प्रवेशद्वारात, परंतू अभ्यासिकेच्या जवळ या विभागात ग्रंथांची व्यवस्थित पध्दतीने मांडणी करणे व वाचकांनी मागितलेल्या ग्रंथ ताबडतोब काढून देणे व परत आल्यानंतर त्याच जागेवर व्यवस्थित ठेवणे ही महत्वाची कामे सतत चालू असतात. सार्वजनिक ग्रंथालय चालू राहण्यासाठी प्रामुख्याने त्या ग्रंथालयात सभासद व ग्रंथसंग्रह आवश्यक असतो. जर सभासद नसतील तर ते ग्रंथालय होऊ शकत नाही. यासाठी कोणतीही संख्या त्या संस्थेच्या अधिकारी कर्मचारी त्या संस्थेचे सभासद असणे आवश्यक असते.

पंढरपूर शहरातील सात सार्वजनिक वाचनालय ग्रंथालय स्वतंत्रपणे कार्यरत असून त्यांची सभासद संख्या ही ग्रंथालयाच्या गरजेनुसार उपलब्ध आहे.




**ग्रंथसंख्या व सभासद संख्यांचा स्तंभालेख**

वरील स्तंभालेखावरून एकूण सात ग्रंथालयातील सभासद संख्या येथे दाखवता येईल. यामध्ये नगरवाचनालयात सन २०१४–१५ यासाली सभासद संख्या ही २०० तर सावरकर वाचनालयात सन २०१४–१५ साली सभासद संख्या ८८५ तर सुशील सार्वजनिक वाचनालयात सन २०१४–१५ साली सभासद संख्या २५०, दलित वाचनालयात सन २०१४–१५ साली सभासद संख्या १०५, संत ज्ञानेश्वर महाराज सार्वजनिक वाचनालयात सन २०१४–१५ साली सभासद संख्या १०५, शब्दशिल्प वाचनालयात सन २०१४–१५ साली सभासद संख्या २५०, डॉ. द. ता. भोसले सार्वजनिक वाचनालयात सन २०१४–१५ साली सभासद संख्या १८२ एवढी

दिसून येते. सावरून असे निष्पन्न होते की, सार्वजनिक ग्रंथालये ही पंढरपूर शहरातील ग्रंथालय सभासद, व्यापारी, कामगार वर्ग, व्यावसायिक वर्ग व इतर क्षेत्रातील उपभोक्त्यांना त्यांच्या गरजेनुसार ग्रंथसंग्रह वाचन साहित्य उपलब्ध करून देत आहे. यामुळे तेथील सभासदांच्या गरजा पूर्ण होताना दिसत आहे.

## ४.४) ग्रंथालय कार्यालयीन वेळ :-

समाजामध्ये कोणताही संस्था अस्तित्वात आल्यानंतर त्या संस्थेने काही अटी व नियम अंमलात आणावे लागतात. त्यामध्ये काही निर्णय हे संस्थेच्या दृष्टीने हिताचे असू शकतात तर काही निर्णय हे सभासदांच्या दृष्टीने लाभदायक तर काही वेळेस नुकसानीचे पण असू शकते. यामध्ये सार्वजनिक ग्रंथालये हे ज्यावेळेस अस्तित्वात येईल त्यावेळी त्या ग्रंथालयास काही मर्यादा सांभाळणे आवश्यक असते.

पाच नियमानुसार पंढरपूरातील सार्वजनिक ग्रंथालये कामकाज पूर्ण करत असतात. त्यांनी काही महत्वाचे निर्णय घेऊन सर्व सभासद, कर्मचारी व इतर व्यक्तींचा विचार करता त्या ग्रंथालयाला एक महत्वाची भूमिक बजावत असताना ग्रंथालयात येणाऱ्या सर्व सभासदांच्या वेळा लक्षात घेता सभासदांच्या हिताची वेळ लक्षात घेऊन पंढरपूरातील सार्वजनिक ग्रंथालयातील वेळा निश्चित केल्या आहेत. यामध्ये नगर वाचनालयातील कार्यालयीन वेळ सकाळी ९ ते ११ व सायं. ४ ते ९ ह्या वेळेत ग्रंथालय उघडे ठेवणे. साप्ताहिक सुट्टी रविवार. तसेच सावरकर वाचनालयाची वेळ सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८ ह्या वेळेत ग्रंथालय उघडे ठेवलेले आहे व साप्ताहिक सुट्टी गुरूवारची आहे.

सुशिल सार्वजनिक वाचनालयाची कार्यालयीन वेळ सकाळी ९ ते १२ व सायं. ४ ते ६ व साप्ताहिक सुट्टी रविवारची आहे, दलित वाचनालयाची कार्यालयीन वेळ सकाळी ८.३० ते सायं. ६.३० व साप्ताहिक सुट्टी रविवार, संत ज्ञानेश्वर महाराज वचनालयाची कार्यालयीन वेळ सकाळी ९ ते ११ व सायं. ५ ते ८, साप्ताहिक सुट्टी सोमवारची आहे. शब्दशिल्प वाचनालयाची कार्यालयीन वेळ सकाळी १० ते व सायं. ४ ते ७ एवढी आहे. साप्ताहिक सुट्टी रविवारची आहे. डॉ. द. ता. भोसले सार्वजनिक वाचनालाची कार्यालयीन वेळ सकाळी ८ ते ११ व सायं. ६ ते ८ ग्रंथालय उघडे आहे व साप्ताहिक सुट्टी बुधवारची आहे.

## ४.५) ग्रंथालयातील उपलब्ध ग्रंथेत्तर साहित्य :-

| **अ. क्र.** | **ग्रंथेत्तर सहित्याचे नांव** | **नगर वाचनालय** | **सावरकर** | **सुशिल सा. वा.** | **दलित वाचनालय** | **संत ज्ञानेश्वर** | **शब्दशिल्प वाचनालय** | **डॉ. द. ता. भोसले** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रेडिओ | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| २ | व्हिडीओ कॅसेट | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ३ | व्ही.सी.आर. | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ४ | व्ही.डी.ओ. कॅमेरा | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ५ | टेलिव्हिजन | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ६ | ऑडिओ कॅसेट | नाही | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ७ | संगणक | होय | होय | नाही | नाही | होय | नाही | नाही |
| ८ | स्लाईड | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ९ | लाऊड स्पीकर सेट | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| १० | इतर | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनालयातील ग्रंथेत्तर साहित्य दर्शविणारा तक्ता**

सार्वजनिक ग्रंथालयात प्रामुख्याने ज्ञान देणारी साधने म्हणजे ग्रंथसंग्रह असता. यामुळे या ग्रंथालयात सर्व सभासदांना वाचनाची अभिरूची निर्माण होते व त्याच्या ज्ञानात भर पडण्यास मदत होते. आजचे युग हे आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. यामुळे आज सार्वजनिक ग्रंथालयात आधुनिक यंत्रसामुग्री असणे गरजेचे आहे.

पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयात ग्रंथेत्तर साहित्याची उपलब्धता अल्प प्रमाणात दिसून येते. यामध्ये नगर वाचनालयात प्रामुखने संगणक व लाउड स्पिकर हे दोनच उपकरणे सध्या उपलब्ध आहेत. उर्वरीत उपकरणे भविष्य काळात खरेदी करण्याचा त्यांचा मानस आहे, तर सावरकर वाचनालयात प्रामुख्याने ऑडिओ कॅसेट, संगणक व लाउड स्पिकर ही उपकरणे

सद्यस्थितीत कार्यरत आहेत. उर्वरीत उपकरणे भविष्य काळात घेण्याचा त्यांचा मानस आहे. संत ज्ञानेश्वर वाचनालयात प्रामुख्याने संगणक हे उपकरण उपलब्ध आहे. उर्वरीत उपकरणे भविष्य काळात घेण्याचा त्यांचा मानस आहे. इतर वाचनालयात म्हणजे सुशिल सार्वजनिक वाचनालय, दलित वाचनालय, शब्दशिल्प वाचनालय व डॉ. द. ता. भोसले वाचनालय यांमध्ये कोणत्याही प्रकारची उपकरणे सद्यस्थितीत उपलब्ध नाहीत.

## ४.६) ग्रंथालयातील विभाग :–

| अ. क्र. | ग्रंथालय विभाग | नगर वाचनालय | सावरकर | सुशिल सा. वा. | दलित वाचनालय | संत ज्ञानेश्वर | शब्दशिल्प वाचनालय | डॉ. द. ता. भोसले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथ देवघेव | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| २ | अभ्यासिका | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ३ | संगणक विभाग | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ४ | ग्रंथ प्रदर्शन विभाग | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ५ | ग्रंथोपार्जन | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ६ | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभाग | नाही | होय | नाही | होय | नाही | नाही | नाही |
| ७ | झेरॉक्स विभाग | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ८ | इतर | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनालयातील ग्रंथालय विभाग दर्शविणारा तक्ता**

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, नगर वाचनालय व सावरकर वाचनालय हे दोन्ही ग्रंथालये ‘ अ ’ या दर्जाची असून या ग्रंथालयात ग्रंथालय सभासदांना सेवा देण्यासाठी वेगवेगळे विभाग असल्याचे आढळून येते. इतर वाचनालय ही ब, क, ड या दर्जाची आहेत.

यामध्ये महत्वाचे कार्य म्हणजे ग्रंथ देव–घेव हे असून नगर वाचनालयामध्ये व सावरकर वाचनालयामध्ये हा विभाग स्वतंत्र असल्याचे दिसून येते. तसेच येणारा सभासद आपले दैनंदिन कामकाज करून ग्रंथालयात मनोरंजन, करमणूक, पौराणिक गोष्टी, कथा, कादंबऱ्या, वृत्तपत्रातील चालू घडामोडी पाहण्यासाठी तो ग्रंथालयाकडे धाव घेत असतो. त्यामुळे या येणाऱ्या उपभोक्त्यास किंवा सभासदास ग्रंथालयामध्ये बसण्याची सोय करणे आवश्यक आहे. यासाइी या दोन्ही ग्रंथालयात अभ्यासिकेची किंवा बैठकिची व्यवस्था करण्यात आली आहे.

आजचे युग हे आधुनिकतेचे असल्याने जे एखादी घटना जगाच्या कोणत्याही काना–कोपऱ्यात घडली तरी ती इंटरनेटद्वारे संगणकाच्या मार्फत सर्व लोकांपर्यंत पोहचवण्याचे कार्य हे ग्रंथालयामार्फत आज चालू आहे. तरी संगणक विभाग वरील दोन्ही ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहे. ग्रंथालयात येणारा नवीन ग्रंथ हा ग्रंथालयातील सभासदांना निदर्शनास येण्यासाठी किंवा ग्रंथालयातील जुना ग्रंथ उपभोक्त्याच्या किंवा सभासदांच्या नजरेस आणून देण्याचे कार्य ग्रंथालय कर्मचाऱ्याचे असून ग्रंथालयामध्ये नवीन ग्रंथ आल्यानंतर या ग्रंथाची यादी बनवून काचफलक किंवा वार्ताहार फलक यावर प्रसिध्द करणे महत्वाचे आहे हे कार्य प्रामुख्याने दोन्ही ग्रंथालयात राबविले जाते.

वरील दोन्ही ग्रंथालये जुनी असून या ग्रंथालयातील वाचन साहित्य जुने झालेले आहे. यामुळे त्या वाचन साहित्याचीही निगा राखण्यासाठी खूप आवश्यक आहे. त्यामुळे वरील दोन्ही ग्रंथालयात ग्रंथोपार्जन करण्याचे महत्वाचे कार्य स्वत: ग्रंथालय व ग्रंथालयीन कर्मचारी करीत आहेत. याचप्रमाणे आज स्पर्धेच्या युगामध्ये ग्रंथालयातील सभासदांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करण्याचे कार्य सावरकर वाचनालय हे करत आहे. याचप्रमाणे एखाद्या ग्रंथालयातील महत्वाची माहिती एखाद्या उपभोक्त्यास द्यावयाची झाल्यास ती माहिती देण्याचे कार्य नगर वाचनालय प्रामुख्याने करत आहे.

### ४.७) ग्रंथ खरेदी :-

| अ. क्र. | ग्रंथ खरेदी पध्दत | नगर वाचनालय | सावरकर | सुशिल सा. वा. | दलित वाचनालय | संत ज्ञानेश्वर | शब्दशिल्प वाचनालय | डॉ. द. ता. भोसले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोटेशन मागवून | होय | नाही | होय | नाही | नाही | नाही | होय |
| २ | स्टँडींग व्हेंडर नेमून | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ३ | प्रकाशकाकडून | होय | नाही | होय | नाही | होय | नाही | होय |
| ४ | विक्रेत्याकडून | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ५ | ॲप्रुव्हल बेसिस | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ६ | खाजगी एजंट मार्फत | होय | नाही | होय | नाही | नाही | होय | नाही |
| ७ | इतर | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनालयातील ग्रंथ खरेदी दर्शविणारा तक्ता**

पंढरपूर शहरात सार्वजनिक ग्रंथालयात ग्रंथ खरेदी ग्रंथालयाच्या सोयीनुसार अवलंबली जात आहे. नगर वाचनालयामध्ये ग्रंथ खरेदी कोटेशन, प्रकाशकाकडून, विक्रेत्याकडून व खाजगी एजंटामार्फत खरेदी करण्याचे काम करते. तर सावरकर वाचनालय विक्रेते व खाजगी एजंटामार्फत नवीन ग्रंथ खरेदी करण्याचे काम करते. या खरेदीमध्ये सार्वजनिक ग्रंथालयात हवे असणारे ग्रंथ मागवून घेऊ शकतात. यामुळे या ग्रंथाची कुवत त्याची पृष्ठे व त्या ग्रंथाची किंमत तपासून नवीन ग्रंथाची मागणी केली जाते.

## ४.८) सार्वजनिक ग्रंथालयातील उपक्रम :-

| अ. क्र. | उप्रकमाचे नांव | नगर वाचनालय | सावरकर | सुशिल सा. वा. | दलित वाचनालय | संत ज्ञानेश्वर | शब्दशिल्प वाचनालय | डॉ. द. ता. भोसले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथ प्रदर्शन | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| २ | व्याख्याने आयोजित करणे | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ३ | सामाजिक कार्यक्रम | होय | नाही | होय | होय | होय | होय | होय |
| ४ | ग्रंथालय सप्ताह साजरा करणे | नाही | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ५ | महापुरूषांच्या जयंती/ पुण्यतिथी | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ६ | इतर | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनालयातील सामाजिक उपक्रम दर्शविणारा तक्ता**

सार्वजनिक ग्रंथालयातील समाजातील सर्वच बाबींचा विचार करून व समाजात अगोदर होऊन गेलेले समाजसुधारकांच्या जयंत्या, सामाजिक सण, उत्सव व व्याख्यानमाला, ग्रंथप्रदर्शन, ग्रंथालय सप्ताह व प्रजासत्ताक दिन इ. कार्यक्रम राबवले जातात. यामुळे समाजात जनजागृती होण्यास मदत होते. या कार्यक्रमामुळे पुर्वी होऊन गेलेले समाजसुधारक व्यक्तींची कार्ये व त्यांचे योगदान समजुन घेण्यास मदत होते. तसेच या कार्यक्रमामध्ये समाज एकत्र येऊन त्यातून त्या समाजाची प्रगती होण्यास मदत होते ही माहिती लक्षात घेऊन नगर वाचनालय व सावरकर वाचनालय हे कार्यक्रम राबवत असल्याचे दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने नगर वाचनालय हे ग्रंथ प्रदर्शन, थोर पुरूषांची व्याख्याने आयोजित करणे, सामाजिक कार्यक्रम, महापुरूषांच्या जयंत्या/ पुण्यतिथी, आयोजित करून समाज प्रबोधन करते. सुशिल वाचनालयात कथाकथन तसेच वक्तृत्व स्पर्धेचे कार्यक्रम भरविले जातात. दलित वाचनालयात थोर पुरूषांची व्याख्याने भरविले जाते. संत ज्ञानेश्वर वाचनालयात जयंत्या, शब्दशिल्प व डॉ. द. ता. भोसले येथे महापुरूषांच्या जयंत्या, काव्य वाचन, व्याख्याने भरविले जातात.

वरील सर्व ग्रंथालये समाज प्रबोधन करण्यास महत्व देत आहेत.

## ४.९) नियतकालके :-

| अ. क्र. | नियतकालि-काची भाषा | नगर वाचनालय | सावरकर | सुशिल सा. वा. | दलित वाचनालय | संत ज्ञानेश्वर | शब्दशिल्प वाचनालय | डॉ. द. ता. भोसले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| २ | हिंदी | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ३ | इंग्रजी | नाही | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ४ | परदेशी भाषा | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ५ | इतर | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनालयात नियतकालिके दर्शविणारा तक्ता**

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, नगर वाचनालयात एकूण ९४ नियतकालिके आहेत त्यापैकी मराठी ७३ असून हिंदी २१ आहेत. सावरकर वाचनालयात नियतकालिके एकूण ८६ असून मराठी ७०, हिंदी १४, इंग्रजी ०२ आहेत. सुशिल वाचनालयात नियतकालिके मराठी ०५ आहेत. दलित वाचनालयात मराठी ०४ नियतकालिके आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज वाचनालयात मराठी ०४ नियतकालिके आहेत. शब्दशिल्प वाचनालयात एकूण २५ नितकालिके असून त्यापैकी मराठी २० व इतर ०५ आहे. डॉ. द. ता. भोसले सार्वजनिक वाचनालय येथे नियतकालिके २१ असून त्यापैकी मराठी २० व हिंदी १ असे आहेत.

यावरून असे स्पष्ट होते की, पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनालयात नियतकालिकवर जी महत्वाची माहिती आहे त्यामुळे गृह, वास्त, पाककला, क्रिडा विषयक, दिवाळी अंक यांची माहिती प्रत्येक दैनंदिन साप्ताहिक पाक्षिकी, मासिके, त्रैमासिक, सहामाही, वार्षिक अंक यांच्या प्रती उपलब्ध करून व त्यावरून समाजातील चालू घडामोडी समजावून घेण्यास मदत होते.

## ४.१०) वर्तमानपत्रे :-

| अ. क्र. | वर्तमानपत्राची भाषा | नगर वाचनालय | सावरकर | सुशिल सा. वा. | दलित वाचनालय | संत ज्ञानेश्वर | शब्दशिल्प वाचनालय | डॉ. द. ता. भोसले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | १८ | १७ | ०६ | ०४ | ०४ | ०५ | ०५ |
| २ | हिंदी | ०२ | ०२ | ०० | ०० | ०० | ०२ | ०० |
| ३ | इंग्रजी | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०२ | ०० |
| ४ | इतर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनालयातील वर्तमानपत्रे दर्शविणारा तक्ता**

आजच्या जगामध्ये चालू घडामोडी काय घडत आहेत याची सर्वसामान्य लोकांनी काही क्षणातच घटनेच्या दुसऱ्या दिवशी त्या घडामोडीची माहिती पोहोचवण्याचे कार्य हे वृत्तपत्र करत असते. त्यामध्ये आपल्या भोवताली, तालुक्यात, जिल्ह्यात, राज्यांत, देशात आणि जगात जी काही घटना घडली आहे ती त्या-त्या घटनेची माहिती त्या-त्या विभागानुसार पोहोचण्याचे कार्य हे वृत्तपत्रे करत असून त्याचा उपयोग सर्व स्तरातील लोकांना होतो.

पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनालयात वृत्तपत्रे घेतली जाताना यामध्ये नगर वाचनालयात मराठी या भाषेची १८ असून हिंदी या भाषेचे ०२ तर इंग्रजी या भाषेची ०२ वृत्तपत्रे आहेत. याचप्रमाणे सावरकर वाचनालयात मराठी या भाषेची वृत्तपत्रे १७ असून हिंदी या भाषेचे ०२ व इंग्रजी ०१ अशी वृत्तपत्रे आहेत. सुशिल वाचनालयात मराठी या भाषेची ०४ वृत्तपत्रे आहेत. दलित वाचनालयात मराठी या भाषेची ०४ वृत्तपत्ते असून हिंदी व इंग्रजी या भाषेची वृत्तपत्रे नाहीत. संत ज्ञानेश्वर वाचनालयात मराठी या भाषेची ०४ वृत्तपत्रे आहेत. शब्दशिल्प वाचनालयात मराठी या भाषेची ०५ वृत्तपत्रे असून हिंदी ०२ व इंग्रजी ०२ असे वृत्तपत्रे आहेत. डॉ. द. ता. भोसले वाचनालयात मराठी या भाषेची ०५ अशी वृत्तपत्रे आहेत. यावरून असे दिसून येते की, या सर्व वाचनालयात/ ग्रंथालयात वृत्तपत्रे घेऊन ग्रंथालय सभासदांना चालू घडामोडीची माहिती देण्याचे कार्य हे सर्व वाचनालय करतात.

## ४.११) ग्रंथालयीन सुविधा :-

| अ. क्र. | मिळणाऱ्या सुविधा | नगर वाचनालय | सावरकर | सुशिल सा. वा. | दलित वाचनालय | संत ज्ञानेश्वर | शब्दशिल्प वाचनालय | डॉ. द. ता. भोसले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| २ | आरसा | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ३ | खुर्ची | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ४ | लाइट | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ५ | फॅन | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ६ | टेबल | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ७ | स्वच्छता गृह | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ८ | ट्युब | होय | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ९ | इतर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनायात मिळणाऱ्या सुविधांचा तक्ता**

सार्वजनिक ग्रंथालय हे येणाऱ्या उपभोक्त्यांना सुविधा देणेवर जास्त भर देत असतात. त्यामुळे या उपभोक्त्यांला त्या ग्रंथालयाबद्दल आपुलकी, जिव्हाळा निर्माण होऊन ग्रंथालये हे आपले घरच आहे या भावनेने तो तेथे वावरत असतो. यामुळे सार्वजनिक ग्रंथालयाकडून पाणी, आरसा, खुर्ची, लाईट, फॅन, टेबल, स्वच्छता गृह, ट्युब या सुविधा उपलब्ध करून देतात. यामुळे येणाऱ्या उपभोक्त्यांस आत्मिक शांतता मिळून तो समाधानी होतो.

पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनालयात वरील सर्व सुविधा या ग्रंथालयीन सभासदांना देण्याचे महत्वाचे कार्य हे करत आहेत व त्यातून ग्रंथालयाचा विकास घडवून आणत आहेत.

## ४.१२) ग्रंथालयातीन उपाययोजना :-

| अ. क्र. | औषधाचे प्रकार | नगर वाचनालय | सावरकर | सुशिल सा. वा. | दलित वाचनालय | संत ज्ञानेश्वर | शब्दशिल्प वाचनालय | डॉ. द. ता. भोसले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | औषध फवारणी | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| २ | डांबर गोळ्या | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ३ | कीटक नाशक औषध | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| ४ | डी.डी.टी. पावडर | होय | नाही | होय | नाही | होय | नाही | नाही |
| ५ | इतर | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही | नाही |

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनालयातील ग्रंथ संरक्षणासाठी उपाययोजना दर्शविणारा तक्ता**

### १) वाळवी :-

वाळवीचा प्रादुर्भाव विशिष्ट हवामानातच होतो. समुद्र किनाऱ्याजवळ भुसभुसित जमिनीत वाळवी मोठ्या प्रमाणधात असते. वाळवीचे जमिनीत बीळे असल्याने सहज लक्षात येत नाही. भिंतीवर अथवा कपाटावर मातीने आच्छादलेल्या रांगा दिसल्या की हिच त्याची ओळख असते. ८ ते १० दिवस जरी याकडे दुर्लक्ष झाले तरी सर्व ग्रंथसंग्रह नष्ट होऊ शकतो. इमारतीत ओली जागा राहणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच संग्रह वारंवार झटकण्यात यावा.

### २) उधई (आळी) :-

उधई नावाची आळी (कीटक) पुस्तकाच्या एका भागाकडून दुसऱ्या भागाकडे छिद्र पडत जाते. तसेच मध्ये बारीक चुरादेखील होतो. जर खराब ग्रंथ आढळला तर कीटक नाशक धुरी द्यावी.

### ३) बुरशी :-

बुरशी ही एक वनस्पती आहे. ग्रंथालयातील वातावरण दमट असेल तर बुरशी होते. ग्रंथ दाटीवाटीने ठेवले, एखादा ग्रंथ ओला असेल तर बुरशी येऊ शकते. बांधणीसाठीचे ग्रंथ नीट बसले

नाही तरीही बुरशी येऊ शकते. कागद जीर्ण होतो. ग्रंथ कोरडा हवेत ठेवावेत व वारंवार खराब होत असतील तर थायेमाळची धुरी द्यावीत.

**४) उंदीर :–**

ग्रंथालयाच्या इमारतीत पाया योग्य नसेल तर त्यान बिळे केलेले असतील, जमिनीवरील फरशा योग्य प्रकारे बसवलेल्या नसतील, खिडक्यांना फटी असतील तर रात्रीच्या वेळी उंदीर बाहेरून आत प्रवेश करू शकतात. त्यासाठी आजुबाजुचा परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. तसेच त्यांच्या बंदोबस्तासाठी पिंजरा वापरावा. तसेच उंदीर नाशक पावडर पिठात मिसळून केलेल्या गोळ्या दालनात ठेवाव्यात. याशिवाय झुरळांसाठी जी उपाययोजना केली जाते तीच उंदरासाठी करणे आवश्यक आहे.

**५) झुरळ :–**

इामरतीमध्ये भरपूर उजेड नसेल, भिंतीत, जमिनीत भेगा पडलेल्सया असतील तर अशा जागेत झुरळाचा प्रादुर्भाव होतो. ग्रंथालयाच्या दालनामध्ये भरपूर उजेड यावा याची काळजी घेतली पाहिजे. ग्रंथांच्या बांधणीसाठी वापरली जाणारी खळ, कागद इ. साहित्य म्हणजे झुरळांचे खाद्य असते. ग्रंथ दालनात खाद्य पदार्थ असल्यास झुरळांचा खाद्य मिळते. म्हणून खाद्य पदार्थ आणणे टाळले पाहिजे. ज्या ग्रंथ बांधणीवर पांढऱ्या रंगाचा थर असेल ते पुस्तक झुरळांनी खराब केल्याचे समजते. यासाठी कपाटाच्या प्रत्येक कप्प्यात डांबर गोळ्या ठेवाव्यात. डी.डी.टी. पावडर दर महिन्यात ग्रंथ दालनात फर्निचर, जमीन व भिंतीवर फवारणी करावी.

**६) पाणी :–**

ग्रंथ संग्रहावर पावसाळ्यात आणि टाळत असेल किंवा खिडकीतून पाण्याचे ओसांडे येत असतील तर ग्रंथांची बांधणी ओली होते. ग्रंथासाठी वापरलेला डिंक, कापड खराब होऊन मूळ ग्रंथांची बांधणी सुटते. ग्रंथांची पाने एकमेकांना चिकटतात व वेगवेगळे करणे अवघड होते. समुद्रकाठी असलेल्या शहरात शहरात इतर शहरात पावसाळ्यात आर्द्रता जास्त असेल अशावेळी ग्रंथ दाटीवाटीने ठेवल्यास त्याची पुष्टे एकमेकांना चिकटतात. ज्या ग्रंथालयांना भूमिगत हॉल काढलेल्या असून त्यात ग्रंथसंग्रह ठेवलेला असेल अशा ठिकाणी पावसाळ्यात पाणी शिरण्याची शक्यता असते. या ग्रंथालयात अधिक काळजी घेणे जरूरीचे असते.

**७) उष्णता :-**

आपल्या देशात हवामान विषम आहे. यामुळे कागदावर विरीत परिणाम होतो. ग्रंथावर सूर्यप्रकाश किरणे पडू नये याची काळली घेतली पाहिजे. उष्णतेमुळे कागदातील आवश्यक असणारे पाण्याचे प्रमाण कमी होते आणि कागद ठिसूळ बनतो. असा कागद मुडपला गेला तर त्याचा तुकडा पडतो. ग्रंथाच्या बांधणीसाठी वापरलेला पुठ्ठा वाकडा तिकडा होतो. लोखंडी फर्निचर उन्हाळ्यात तापते. त्यामानाने लाकडी फर्निचर तापत नाही. पण लाकडी फर्निचर इतर कीटक अग्नीपासून धोका संभवतो. तसा लोखंडी फर्निचरचा संभवत नाही. ग्रंथालयाच्या आजुबाजुला वृक्ष लावल्यास इमारतीचे तापमान कमी राहते. तसेच परिसरात धुम्रपान करण्यास बंदी घालावी. दररोज ग्रंथालय बंद करताना विजेची सर्व बटणे बंद असल्याची खात्री करावी. विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा कोठेही तुटून कमजोर होत नाहीत याची काळजी घ्यावी. ग्रंथालयात अग्नी शमनासाठी लागणारे साहित्य असावे. ग्रंथालयात उपहारगृह सुविधा असेल तर ती एका बाजूस असावी. तसेच सिगारेट, धुम्रपानास बंदी करावी.

**८) वाचकाच्या सवयी :-**

ज्या वाचकासाठी सेवा पुरवल्या जातात ते वाचक देखील ग्रंथालयाचे नुकसान करताना आढळतात. त्यासाठी आवश्यक सूचना फलक लावावेत. तोंडी सुचना द्याव्यात. पुस्तक वापराविषयी माहिती द्यावी. पाने दुमडणे, पानावर लिहीणे, पाने फाडणे याबाबत दक्षता घ्यावी लागते. ' ग्रंथ हेच गुरू ' अशा प्रकारच्या म्हणी प्रवेशद्वाराजवळ अथवा देवघेव विभागाजवळ लावण्यात याव्यात.

सार्वजनिक ग्रंथालयात वरील आपत्तीपासून ग्रंथाचा बचाव करण्यासाठी ग्रंथालयात ग्रंथ सरंक्षणासाठी औषधे फवारणे आवश्यक असते. त्यामध्ये नगर वाचनालयात डांबर गोळ्या व डी.डी.टी. पावडर यांचा वापर करून ग्रंथाचे व ग्रंथालयाचे संरक्षण केले जाते. तसेच सावरकर वाचनालयात डांबर गोळ्या ठेवून ग्रंथाचे संरक्षण केले जाते.

वरील सर्व ग्रंथालयात ग्रंथाचे व ग्रंथालयाचे संरक्षणासाठी आवश्यक त्याबाबींचा विचार केला जातो. ग्रंथालयातील जुन्या वाचन साहित्याचा विचार करून ग्रंथाचे रक्षण करण्यावर भर देण्यात येतो.

### ४.१३) ग्रंथालयांना मिळालेले पुरस्कार :–

समाजामध्ये अनेक संस्था स्थापन होत आहेत. त्या संस्था समाजासाठी समाजकार्य करण्यासाठी स्थापन होऊन समाजाची प्रगती आहे. ते करत असताना संस्थांना काही नियम अटी पाळाव्या लागतात. त्यातून त्या संस्थेचा विकास व कारभार पासरदर्शक होण्यास मदत होते. हा कारभार व त्याचा विकास करण्यामागे समाजात त्यांची प्रतिष्ठा व मानसन्मान निर्माण होतो. यामुळे त्या संस्थेचा गौरव करणे त्यांच्या कार्यांचे कौतुक करणे, कर्मचाऱ्यांना त्याच्या कार्यावर वेगवेगळी बक्षिसे बहाल करणे व त्यातून त्या संस्थेचा प्रसार करणे हे महत्वाचे लक्ष समोर ठेवून त्या–त्या संस्थेचे कार्य लक्षात घेऊन समाजातून त्यांना वेगवेगळे पुरस्कार देऊन त्या संस्थांना गौरवण्यात येते. यामुळे त्या संस्थेचे कार्य कौतुकास्पद असून कारभारात पारदर्शकात येते. पुरस्कार दिल्याने लोकांचा संस्थेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो. त्यातून त्या संस्थेचे नावलौकिक होते.

आज समाजामध्ये सार्वजनिक ग्रंथालय हे विद्येचे माहेरघर होत आहे. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांना गावपातळीपासून विविध सामाजिक संस्था व महाराष्ट्र शासनातर्फे विविध पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात येते. नगर वाचनालयात व सावरकर वाचनालयात या पध्दतीचा गौरव झालेला आढळून येतो. नगर वाचनालय हे १८७४ यासाली स्थापन झाले.या ग्रंथालयाला ' शतायू ग्रंथालय ' (महाराष्ट्र शासन) हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. तरी सावराकर वाचनालय हे चौथ्या दशकात कार्यरत असून या ग्रंथालयास ' सोलापूर जिल्हा आदर्श ग्रंथालय पुरस्कार ' हा मानाचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. यावरून या दोन्ही ग्रंथालयांचे महत्व लक्षात येते.

### ४.१४) ग्रंथालयांना भेडसावणाऱ्या समस्या :–

सार्वजनिक ग्रंथालयामध्ये आपले दैनंदिन कामकाज पहाणे गरजेचे असून त्यामध्ये समाजातील व्यक्तींना योग्य मार्गदर्शन करणे सोयीचे असते. पण हेच कार्यरत असताना सार्वजनिक ग्रंथालय सर्व सोयी सुविधा परिपूर्ण असतीलच असे नाही. यामध्ये त्यांना अनेक प्रसंगांना तोंड देऊन सामाजिक दृष्टीकोनातून उपभोक्त्यांचे, कर्मचाऱ्यांचे अडीअडचणी जाणून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन देण्याचे कार्य ही सार्वजनिक ग्रंथालयात करावे लागते. यामध्ये ग्रंथालयांना भेडसावणाऱ्या समस्या कोणकोणत्या आहेत. त्यांचा विचार करून त्यावर योग्य ती उपाययोजना त्वरीत करून त्या समस्येवर मात करण्याचा प्रयत्न सार्वजनिक ग्रंथालये करत असतात.

पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनालयात पुढील प्रकारच्या भेडसावणाऱ्या समस्या दिसून येतात. ह्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत. अत्यल्प शासकीय अनुदान, ग्रंथांच्या वाढत्या किंमती, कमी पगारामुळे न टिकणारे कर्मचारी वर्ग, अनुदान वेळेवर न मिळणे व शासनाचे होणारे दुर्लक्ष या समस्या या सर्व ग्रंथालयात प्रामुख्याने आढळून येतात.

यावरून असे सांगता येईल की, वरील सर्व ग्रंथालयात भेडसावणाऱ्या समस्या यावर योग्य ती उपाययोजना करण्याचे कार्य शासनाच्या व संस्थेच्या दृष्टीने योग्य ते पाऊल उचलण्यास प्रयत्न होत आहे.

**४.१५) भविष्यकालीन योजना :-**

कोणतीही संस्था स्थापन झाल्यानंतर ते विशिष्ट हेतू समोर ठेवून आपले कार्य बजावीत असते. त्यामध्ये नवीन संस्था स्थापन करून त्या संस्थेतील कर्मचारी सभासद सर्व सामान्य नागरिक संस्थेला लागणारा निधी संस्थेसंदर्भातील महत्वाचे निर्णय संस्थेचे कार्य चालू राहण्यासाठी संस्थेची इमारत त्यांचे फर्निचर, आधुनिक यंत्रसामुग्रीचा विचार तसेच भविष्यात येणारे नवनवीन तंत्रज्ञान तसेच नवनवीन येणाऱ्या सेवासुविधा यांचा भविष्यकालीन योजनेमध्ये समावेश करणे गरजेचे असते.

हाच हेतु ठेवून पंढरपूर शहरील सार्वजनिक वाचनालय पुढील भविष्यकालीन योजना येथे नमुद केलेल्या आहेत. त्यामध्ये नगर वाचनालय भविष्यकालीन संगणकीकरण ग्रंथालयासाठी विस्तृत इमारत व इतर नवीन योजना यांचा समावेश केलेला दिसून येतो. सावरकर वाचनालयातील ग्रंथसंग्रहाचे संगणकीकरण करून एक लाख ग्रंथ उपलब्ध करण्याचे धोरण ठेवले आहे. सावरकर अभ्यास केंद्र चालू करणे, सुशिल वाचनालय येथे ग्रंथसंग्रह वाढविणे, वाचक संख्या वाढविणे. दलित वाचनालयात भविष्यकालीन ग्रंथसंग्रह वाढविणे व वाचक संख्या वाढविणेचे ठरविले आहे. संत ज्ञानेश्वर महाराज वाचनालयात भविष्यकालीन ग्रंथसंग्रह वाढविणेचे ठरविले आहे. शब्दशिल्प वाचनालय भविष्यकालीन ग्रंथसंग्रह वाढविणेचे ठरविले आहे. डॉ. द. ता. भोसले सार्वजनिक वाचनालयात भविष्यकालीन वाचक वर्ग वाढविणे, वाचनकक्ष उभारणे व सांस्कृतिक कार्यक्रम चालू करणे असे ठरविले आहे.

यावरून असे सांगता येईल की, पंढरपूर शहरातील वाचनालयात भविष्यकालीन योजना या ग्रंथालयांना उपयुक्त असुन भविष्यात त्याचा अनमोल वाटा असणार आहे.

# प्रकरण पाचवे

## निष्कर्ष व शिफारशी

### ५.१) प्रस्तावना :-

कोणतीही संस्था इमारत उभारण्यास व्यवस्थापनाचा अत्यंत मौल्यवान वाटा असतो. मुल्यमापनाचे तंत्र हे व्यवस्थापन शास्त्रातून ग्रंथालय शास्त्राने घेतले आहे. डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या पाचव्या सिध्दांतानुसार ग्रंथालय ही वधिष्णू संस्था आहे. जी सतत वाढत जाते. अशी ग्रंथालय या संस्थेची वाढ प्रथम दिसणारी दिसते.

सध्या आधुनिक युगात ग्रंथालय हे ग्रंथसंग्रहापुरते मर्यादित राहिलेले नाही. ग्रंथालय हे माहितीचे माहिती केंद्र बनले आहे. आधुनिक काळात नवनवे संशोधन होत आहे आणि या संशोधनाच्या युगात वाचकांच्या माहितीच्या गरजा वाढल्या आहेत. वाचकांना विविध प्रकारची विविध विषयांची माहिति हवी असते संगणकाच्या जाळ्यामुळे माहितीचे जग अगदी जवळ आले आहे. जगात कोठे काय चालू आहे ज्ञानाच्या क्षेत्रात नवीन शोध काय निर्माण झाले आहेत. हे संग्रहालयास वेळ लागत नाही इंटरनेटमुळे जगभरातील हवी ती माहिती क्षणार्धात प्राप्त होते.

सध्याच्या युगात ग्रंथालयाकडून वाचकांच्या गरजा व अपेक्षा या फार वाढल्या आहेत या वाढत्या अपेक्षेमुळे ग्रंथालयाना आपल्यासेवा सुविधा ग्रंथसंग्रह आर्थिक नियोजन संगणक इ बाबीचे मुल्यमापन करावे लागणार आहे. ग्रंथालयाचे सर्वागीण मुल्यमापन करताना विविध ग्रंथालयाच्या कार्याचे सेवाचे उपक्रमाचे मुल्यमापन करण्यात येते मुल्यमापनातून निघालेले निष्कर्ष हे सद्यस्थिती दर्शविणारे असते.

प्रस्तूतच्या संशोधनामध्ये पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयाचा चिकित्सक अभ्यास हा विषय घेवून संशोधकाने प्रामाणिकपणे या विषयाचा अभ्यास केलेला आहे. संशोधकाने नेमकी आणि अचूक माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे संशोधकाने संशोधना संबंधी काही निष्कर्ष काढले आहेत तसेच संकलित केलेल्या माहितीमध्ये निष्कर्षाच्या आधारे संशोधकाने काही शिफारशी केल्या आहेत तसेच या प्रकरणामध्ये संशोधकाने पुढील संशोधनास दिशा मिळावी म्हणून काही संशोधन विषय सुचविले आहेत.

## ५.२) निष्कर्ष :-

१) नगरवाचनमंदिर आणि सावरकर वाचनालय या दोन्ही ग्रंथालयाना 'अ' दर्जा प्राप्त झाला आहे.

२) दोन्ही ग्रंथालयाना वाचन साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

३) सुशिल वाचनालय, दलित वाचनालय, संत ज्ञानेश्वर वाचनालय, शब्दशिल्प वाचनालय डॉ द. ता. भोसले सार्व वाचनालय यांना स्वत:ची इमारत उपलब्ध नाही.

४) सर्व ग्रंथालयाना शासकीय अनुदान प्राप्त होत आहे.

५) नगरवाचन मंदिर व सावरकर वाचनालय राजाराम मोहन रॉय प्रतिष्ठानकडून अनुदान मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे.

६) सावरकर वाचनालय व नगरवाचन मंदिर वगळता इतर सार्वजनिक ग्रंथालयाकडे वाचन साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही.

७) नगरवाचन मंदिर व सावरकर वाचनालय यांना स्वत:ची इमारत आहे, त्यामुळे प्रत्येक वर्षी सामाजिक कार्यक्रम आयोजित करते.

८) डॉ द.ता. भोसले सार्वजनिक वाचनालय प्रत्येक वर्षी सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जातात त्याच बरोबर पुरस्कार वितरण केले जाते.

९) संत ज्ञानेश्वर सार्वजनिक वाचनालय हे आध्यात्मिक आणि धर्मप्रसार, वारकरी सांप्रदायाचा प्रसार करते.

१०) संत ज्ञानेश्वर सार्वजनिक वाचनालयामध्ये धार्मिक वाचन साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

११) नगरवाचन मंदिर हे वाचनालय चंद्रभागा नदीच्या तीरावर आल्हाददायक वातावरणात उभे आहे. वाचन आणि अभ्यासाकरिता एक प्रकारची शांतता निसर्गतहाच उपलब्ध आहे.

१२) पंढरपूर शहरातील सर्व ग्रंथालयामध्ये स्वच्छता दिसून आली.

१३) नगरवाचन मंदिर आणि सावरकर वाचनालयामध्ये जेष्ठ नागरीकांचा समावेश दिसून आला.

१४) नगरवाचन मंदिर हे नदीच्या काठावर असून पुररेषा विभागात येते.

१५)	सावरकर वाचनालय शहराच्या मध्यभागी आहे.

१६)	सर्वच ग्रंथालयामध्ये मनुष्यबळ आवश्यक प्रमाणात उपलब्ध आहे.

१७)	पंढरपूर शहराची लोकसंख्या पाहता अजून सार्वजनिक ग्रंथालयांची आवश्यकता आहे.

**५.३)	शिफारशी :-**

१)	पंढरपूर शहरातील सार्वजनिक वाचनालयातील ग्रंथपालानी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हा अभ्यासक्रम पूर्ण करून घ्यावा.

२)	वाचनालयातील कर्मचारी वर्गाना सद्याच्या वेतनश्रेणीनुसार वेतन वाढ करावी.

३)	पंढरपूर शहरातील वाचनालयानी ३६५ दिवस अखंड सेवा देण्याचा प्रयत्न करावा.

४)	शहरातील वाचनालयानी सामाजिक उपक्रम राबवावेत

५)	शहरातील वाचनालयानी आपल कार्यलयीन वेळेत वाढ करावी.

६)	महाराष्ट्र शासन ग्रंथालय समितीने शिफारस केलेल्या ग्रंथाची मागणी करावी.

७)	सुशिल वाचनालय, संत ज्ञनेश्वर सार्व वाचनालय, शब्दशिल्प, दलित व डॉ. द. ता. भोसले वाचालयानी ग्रंथेतर साहित्याची वाढ करावी.

८)	नगरवाचन मंदिराने पुर येण्यापुर्वी अतिदक्षता म्हणून तेथील ग्रंथालय पुरग्रस्त नसलेल्या भागात सोयीनुसार ग्रंथालयातील साहित्य व इतर बाबी ठेवण्याची पर्यायी व्यवस्था करावी.

९)	ग्रंथालयातील सेवकांना ओळखपत्र असणे गरजेचे आहे.

१०)	ग्रंथालयातील ग्रंथ चोरीस जाऊ नये यासाठी परिसरामध्ये कॅमेरे असणे आवश्यक आहे.

११)	पंढरपूर शहरातील वाचनालयांनी आपल्या ग्रंथालयाचा वृत्तपत्राव्दारे प्रसार करून सभासद संख्या वाढवावेत.

१२)	ग्रंथालयानी ग्रंथसंग्रह वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत.

१३)	महिला वाचकांची संख्या वाढविण्यासाठी ग्रंथालयानी प्रयत्न करावेत.

**५.४) नविन संशोधनासाठी दिशा :–**

१) पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयातील वाचकांची वाचन अभिरूची एक अभ्यास

२) पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयातील वित्तीय व्यवस्थापन एक अभ्यास

३) सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या व त्यावरील उपाय

४) पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयातील माहितीसेवा एक अभ्यास

५) सार्वजनिक ग्रंथालयतील वाचन साहित्य व त्याची उपयोजिता.

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

**विद्या निष्णात शिक्षणक्रम (एम.फील) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र २०१३-१४**

**पंढरपूर शहरातील सार्वजनिक ग्रंथालयांचा चिकित्सक अभ्यास**

**ग्रंथपालासाठी देण्यात येणारी प्रश्नावली**

१) संस्थेची माहिती :-

१) संस्थेची पार्श्वभूमी

संस्थेचे नांव व पत्ता

स्थापना वर्ष :-

२) संस्था नोंदणीकृत आहे काय?

संस्था नोंदणी क्रमांक १९५० ॲक्टप्रमाणे

संस्था नोंदणी क्रमांक १९६० ॲक्टप्रमाणे

३) ग्रंथालय समितीच्या पदाधिकाऱ्यांची माहिती

अ) अध्यक्ष :-

पत्ता :-

शिक्षण :- व्यवसाय :-

फोन नं. :-

ब) सचिव/कार्यवाहकाचे नांव :-

पत्ता :-

शिक्षण :- व्यवसाय :-

क) पदाधिकाऱ्यांची संख्या किती आहे :-

ड) ग्रंथालय समितीच्या पदाधिकाऱ्यांची सभा बोलविण्याचा कालावधी नियमानुसार

१) मासिक २) द्वैमासिक ३) त्रैमासिक

इ) ग्रंथालय समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड पध्दत

१) लोकशाही २) सभासदाद्वारे ३) संस्थेकडून

उ) ग्रंथालय समितीच्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ

१) एक वर्ष २) तीन वर्ष ४) पांच वर्ष

ऊ) ग्रंथपाल, ग्रंथालय सेवकांना पदाधिकारी मंडळात प्रतिनिधी आहे का ?

होय/नाही

ग्रंथालयाचे नांव :-

पत्ता :-

ग्रंथालयाची वेळ :- सकाळी सायंकाळी सुट्टी

ग्रंथालय इमारत स्वत:ची आहे का ?

जागेचे एकूण क्षेत्रफळ

बांधलेल्या इमारतीचे क्षेत्रफळ

इमारतीचे बांधकाम कोणत्या पध्दतीचे आहे आर.सी.सी./वीट/ दगडी

* ग्रंथालयाची त्तथापना वर्ष

मान्यता वर्ष

* दर्जा व वर्ग

* ग्रंथालयामध्ये दररोज किती वाचक येतात ?

* ग्रंथालयाची सदस्य संख्या किती आहे :-

* ग्रंथालयाने सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले आहेत का ?

होय/नाही

* सांस्कृतिक कार्यक्रमास प्रतिसाद कसा असतो ?

१) फारच चांगला २) चांगला ३) कमी

* सन २०१३–१४ या शैक्षणिक वर्षात केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाची यादी

१.

२.

३.

* ग्रंथालयाच्या स्थापनेपासून कोणकोणते पुरस्कार मिळाले आहेत ?

१.

२.

३.

* संग्रह :–

१) ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंख्या किती आहे ?

२) ग्रंथ कोणामार्फत खरेदी केली जातात ?

१) स्थानिक एजंट २) पुस्तक विक्रेता ३) प्रकाशकाकडून

३) ग्रंथालयामध्ये येणाऱ्या नियतकालिकांची संख्या व नांवे

१) २) ३)

४) ग्रंथालयातील ग्रंथ साहित्याची एकूण किंमत –

५) ग्रंथालयामध्ये संदर्भ ग्रंथ आहेत का ? असतील तर किती ?

६) ग्रंथालयामध्ये आध्यात्मिक ग्रंथ किती आहेत ?

७) ग्रंथालयामध्ये हस्तलिखित, दुर्मिळ ग्रंथ आहेत का ? असतील तर नांवे

८) नियतकालिक खरेदी कोणमार्फत केली जाते ?

१) स्थानिक एजंट २) अधिकृत एजन्सी ३) प्रकाशकाकडून

९) नियतकालीक नोंद ठेवण्यासाठी कोणती पण्दत वापरतात ?

१) त्रिपत्रपध्दत २) पत्रपध्दत ३) इतर

१०) ग्रंथालयातील वाचनसाहित्याचे वर्गीकरण केले जाते का ? होय/नाही

११) ग्रंथ वर्गीकरणाची पध्दत कोणती ?

१) दशांश २) द्विबिंदू ३) युडीसी

१२) ग्रंथालयाचे तालीकीकरण केले जाते का ?

१) वर्गीकृत २) कोष ३) विषयावर

१३) ग्रंथ देवघेव कोणत्या पध्दतीने केले जाते ?

१) ग्रंथास चिठ्ठी लावणे

२) रजिस्टरमध्ये नोंद करून

३) ग्रंथ परतीचे कागद चिटकविणे

१४) ग्रंथ परिगणन केले जाते का असेल तर कालावधी किती असतो?

१) एक वर्ष २) दोन वर्षे ३) तीन वर्षे

**इतर**

१) ग्रंथालयामध्ये कोणती संगणक प्रणाली वापरली जाते ?

२) संगणकाव्दारे कोणकोणती कामे केली जातात ?

३) वाचक संख्या वाढविण्यासाठी उपाय योजना करता काय ? कोणती ?

४) ग्रंथालयाच्या अडचणीबाबत माहिती द्या.

५) भविष्यामध्ये नविन काही उपक्रम राबविणार आहे का ?

६) ग्रंथ निवडीसाठी स्वतंत्र समिती आहे का ?

७) ग्रंथपाल, ग्रंथालय कर्मचारी यांचेव्दोर ग्रंथ निवड केली जाते का ?

८) वाचकांच्या शिफारशीचा गंथ निवडीच्यावेळी विचार केला जातो का ?

९) ग्रंथालयाची अन्य वैशिष्ट्ये काय आहेत ?

**मनुष्यबळ :–**

१) ग्रंथालयामध्ये एकूण सेवकांची संख्या किती ?

२) संगणक प्रशिक्षित कर्मचारी आहेत का ?

३) प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची संख्या –

४) ग्रंथालय कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी दिली जाते का ?

५) ग्रंथालयातील सेवक नियमानुसार आहेत का ? होय / नाही

**सेवा**

| | | |
|---|---|---|
| १) | ग्रंथालयामध्ये देवघेव सेवा आहे का ? | होय/नाही |
| २) | ग्रंथालयामध्ये संदर्भ सेवा आहे का ? | होय/नाही |
| ३) | संगणक सेवा आहे का ? | होय/नाही |
| ४) | हस्तलिखित सेवा आहे का ? | होय/नाही |
| ५) | ग्रंथालयामध्ये संदर्भ विभाग आहे का ? | होय/नाही |
| ६) | ग्रंथालयामध्ये अभ्यासिकेची सेवा आहे का ? | होय/नाही |
| ७) | ग्रंथालयामध्ये वाचनकक्ष आहे का ? | होय/नाही |
| ८) | ग्रंथालयामध्ये वृत्तपत्रसेवा आहे का ? | होय/नाही |
| ९) | नियतकालिक सेवा आहे का ? | होय/नाही |
| १०) | माहितीसेवा दिली जाते का ? | होय/नाही |
| ११) | दृक्षश्राव सेवा दिली जाते का ? | होय/नाही |
| १२) | इमारतीमध्ये नैसर्गिक हवा, भरपूर प्रकाश मिळतो का ? | होय/नाही |
| १३) | महिला विभाग, बाल विभाग स्वतंत्र आहे का ? | होय/नाही |
| १४) | ग्रंथालयामध्ये पिण्याच्या पाण्याची सोय आहे का ? | होय/नाही |
| १५) | कार्यक्रमासाठी स्वतंत्र सभागृहाची सोय आहे का ? | होय/नाही |
| १६) | प्रसाधनगृहाची सोय आहे का ? स्त्री/पुरूष | होय/नाही |
| १७) | ग्रंथालयामध्ये टेलिफोनची सुविधा आहे का ? | होय/नाही |
| १८) | वाचकांसाठी सुचनापेटी किंवा तक्रारपेटी आहे का ? | होय/नाही |
| १९) | वाचकांच्या सुचना तक्रारीचे निवारण कसे करता ? | होय/नाही |
| २०) | लेख संग्रह किंवा वृत्तपत्र कात्रण सेवा आहे का ? | होय/नाही |

**वाचकांना देण्यात येणारी प्रश्नावली :-**

**१) खालील दिलेल्या प्रश्नासमोरील पर्यायी शब्दांच्या पुढील चौकोनामध्ये अशी ✓ खुण करावी.**

**२) योग्य त्या ठिकाणी माहिती लिहा**

**प्र.-१ वाचकांची वैयक्तिक माहिती**

पूर्ण नांव:-

पत्ता :-

शिक्षण :-

वयोगट :- १) १० ते २० ☐ २) २० ते ४० ☐ ३) ४० ते ६० ☐

लिंग :- १) स्त्री ☐ २) पुरूष ☐

२) आपण या ग्रंथालयाचे नियमित वाचक आहात का ? होय ☐ नाही ☐

३) आपण दररोज वाचन करता का ? होय ☐ नाही ☐

४) दररोज आपण वाचनासाठी किती वेळ देता ?

एक तास ☐ एक तासापेक्षा जास्त ☐

दोन तास ☐ दोन तासापेक्षा जास्त ☐

५) आपण ग्रंथालयाला नियमित भेट देता का ? असल्यास

रोज ☐ आठवड्यातून एकदा ☐

पंधरा दिवसातून एकदा ☐ महिन्यातून एकदा ☐

६) तुम्ही मोकळ्या वेळात काय करता त्याची यादी खाली देण्यात आली आहे. त्यातील तुम्हाला योग्य वाटतील त्यरपैकी पर्याय निवडा

दुरदर्शन पाहणे ☐ कथा कविता लेखन ☐

अभ्यासाव्यतिरिक्त वाचन करणे ☐ छंद जोपासणे ☐

खेळ खेळणे ☐ गाणी/संगीत ऐकणे ☐

७) तुम्ही वृत्तपत्र वाचता का ?

नियमित ☐ अधुनमधून ☐ कधीही नाही ☐

८) तुम्ही घरी स्वत: वृत्तपत्र घेता का ?

होय ☐ नाही ☐

११) घेत असल्यास त्याची नांवे –

१) २)

३) ४)

१२) तुम्ही ग्रंथालयातून कोणकोणते वृत्तपत्र वाचता ?

१) लोकसत्ता ☐ २) पुढारी ☐

३) सकाळ ☐ ४) म. टा. ☐

५) लोकमत ☐ ६) तरूण भारत ☐

७) पुण्यनगरी ☐ ८) संचार ☐

१३) वृत्तपत्रातील खालीलपैकी कोणता मजकूर/सुंदर तुम्ही वाचता एखादी गोष्ट वाचत नसाल तर चौकोन रिकामे सोडा

अग्रलेख ☐ सुविचार ☐ वाचकाचा पत्रव्यवहार ☐

शिक्षण विषयक ☐ भविष्य ☐ बोध कथा ☐

राजकीय घडामोडी ☐ जाहिराती ☐

१४) तुम्ही मासिके वाचता का ?

होय ☐ नाही ☐

१५) होय असल्यास कोणती मासिके वाचली जातात त्यांची नांवे –

१) २)

३) ४)

१६) दररोज वृत्तपत्रे, मासिके वाचन करण्यासाठी किती वेळ मिळतो ? ते खालील दिलेल्या कोष्टकात योग्य त्या रकान्यात अशी ✓ खूण करा

| | | | |
|---|---|---|---|
| १० मिनीटे | ☐ | ३० मिनीटे | ☐ |
| एक तास | ☐ | एक तासापेक्षा जास्त | ☐ |

१७) ग्रंथ खरेदी करण्यासाठी आपण ग्रंथाची शिफारस करता का ?

होय ☐ नाही ☐

१८) ग्रंथ घरी नेवून वाचता का ? होय ☐ नाही ☐

१९) होय असल्यास खाली पुस्तकाचे काही प्रकार दिले आहेत त्यापैकी तो प्रकार वाचता त्यापुढे ✓ अशी खुणा करा.

| | | | |
|---|---|---|---|
| ऐतिहासिक कादंबरी | ☐ | कथा.कादंबरी | ☐ |
| प्रवास वर्णन | ☐ | वैज्ञानिक साहित्य | ☐ |
| नाटक | ☐ | काव्य/ कविता संग्रह | ☐ |
| थोर पुरूषांची चरित्रे | ☐ | विनोदी | ☐ |

२०) वाचलेल्या पुस्तकांची/ग्रंथाची नांवे

१) २)

३) ४)

२१) या ग्रंथालयात उपलब्ध नसलेले वाचन साहित्य ते कोठून मिळवितात ?

| | | | |
|---|---|---|---|
| १) स्वत: खरेदी करून | ☐ | २) मित्राकडून | ☐ |
| ३) ग्रंथालयातून | ☐ | ४) वाचनालयातून | ☐ |

२२) अधिक वाचन करण्यासाठी तुम्हास कोणकोणत्या अडचणी येतात ?

१) अभ्यासामुळे वेळ मिळत नाही ☐

२) पाहिजे ते ग्रंथ ग्रंथालयात मिळत नाहीत. ☐

३) डोळे अधू आहेत ☐

४) वाचनाचा वेग अत्यंत कमी आहे ☐

५) त्रस्त वाचनाने शिण येतो ☐

६) सर्व वेळ दुरदर्शन पाहण्यास जातो. ☐

७) वाचनाची अजिबात आवड नाही ☐

८) घरातील कामामुळे वेळ मिळत नाही ☐

९) शेतातील कामामुळे वेळ मिळत नाही ☐

१०) वाचनाबाबत योग्य मार्गदर्शन मिळत नाही. ☐

२३) ग्रंथ खरेदी करण्यासाठी आपण ग्रंथाची शिफारस करता का ?

होय ☐ नाही ☐

२४) आपणाला हवे असणारे ग्रंथ आापण कसे शोधता?

प्रत्यक्ष कपाटाजवळ जावून ☐ रजिस्टर अथवा तालिका पाहून ☐

ग्रंथपाल किंवा सेवकांची मदत घेवून ☐

२५) तुमचा स्वत:चा ग्रंथ संग्रह आहे का ?

होय ☐ नाही ☐

२६) होय असल्यास किती ग्रंथ आहेत ?

१) १ ते १० ☐ २) ५ ते १० ☐

३) १५ ते २० ☐ ४) २० पेक्षा जास्त ☐

२७) वाचन अभिरूची वाढविण्यासाठी तुम्हाला असलेल्या कल्पना किंवा विचार थोडक्यात लिहा.

२८) वाचन संस्कृती जोपासताना आपला अनुभव काय ?

२९) आपण दररोज टी. व्ही. पाहता का ?

होय ☐ नाही ☐

३०) दररोज टी. व्ही. पाहण्यासाठी किती वेळ देता ?

एक तास ☐ दोन तास ☐

तीन किंवा तीन पेक्षा जास्त ☐ पाहत नाही ☐

३१) वाचनामध्ये आपणास आवश्यक माहिती आपण कशामधून मिळविता ?

संदर्भ ग्रंथ ☐ नियकालिक ☐

वर्तमानपत्र ☐ इन्टरनेट ☐

३२) बाल विद्यार्थी वाचकांमध्ये वाचनभिरणी निर्माण व्हावी, म्हणून काही गोष्टी करणे आवश्यक आहे. उदा.

१) वाचलेल्या गोष्टीचा सारांश लिहिण्यास उत्तेजन देणे ☐

२) लेखन, वक्तृत्व कथाकथन यांसारख्या स्पर्धकामध्ये भाग घेण्यास प्रवृत्त करणे ☐

३) वाचलेल्या गोष्टी सांगण्यास प्रोत्साहन देणे ☐

४) गोष्टी, कथा, किर्तने व प्रवचने, ऐकण्यास पाठविणे ☐

३२) बाल विद्यार्थी वाचनाची गोडी लावण्याबाबत ग्रंथालयातील मार्गदर्शन पुरेसे आहे असे आपणास वाटते का ?

३३) योग्य वाटत असल्यास ग्रंथालयाकडून या संदर्भात आपल्या अधिक अपेक्षा कोणत्या आहेत ?

३४) आजच्या युगात मनोरंजनाचे एवढे साहित्य उपलब्ध असताना आपली वाचन अभिरूची कशी जोपासली याबाबत आपला अनुभव काय ?

**दिनांक :-**

**ठिकाण :-** **वाचक स्वाक्षरी**

# संदर्भ ग्रंथ सूची


१)	भिंताडे वि. रा. शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे नित्यनूतन प्रकाश १९९४, पृ. ६६

२)	काचोळे दा. धो. सामाजिक संशोधन पध्दती, औरंगाबाद कैलास पब्लिकेशन १९९३, पृ. १४५

३)	निकोसे सत्यप्रकाश :- ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, संशोधन पध्दती, नागपूर, प्रज्ञा प्रकाशन २००७ पृ. ११८७

४)	खैरनार दिलीप - प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी पुणे - डायमंड पब्लिकेशन २००९ पृ ३०, ३२

५)	आगलावे प्रदीप, संशोधन पध्दतीशां व तंत्रे, नागपूर, विद्या प्रकाशन, २०००.

६)	मोरे कुंडलिक बापू, सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रबोधन, अकलुज, शिवसृष्टी प्रकाशन, २०१०

७)	कुंभार राजेंद्र, ग्रंथालय आणि माहितीशां संशोधन, युनिर्व्हसल प्रकाशन, पुणे २०१३

८)	देशमुख रा. नी. आपला सोलापूर जिल्हा - २०११

९)	नाडगोंडे, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर- १९९९,

१०)	श्री पांडुरंग व पंढरी महात्म्य, श्री. ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज, उर्फ दास ज्ञानेश्वर, मेघा पब्लिकेशन्स, अमरावती.

११)	प्रा. लक्ष्मण थोरात, ग्रंथालय माहितीशां , डायमंड पब्लिकेशन, पुणे - २००७

१२)	ग्रंथपरिवार संपादक ना. वि. देशपांडे, मराठवाडा विभाग, ग्रंथालय संघ औरंगाबाद वर्ष १७ वे अंक जाने. २००२ पृ. १०

१३)	पुणे विभाग ग्रंथालय संघ व पूर्ण जिल्हा ग्रंथालय संघ संयुक्त व वार्षिक अधिवेशन स्मरणिका, ज्ञानदिप, सार्वजनिक वाचनालय लेख सु. ना. कांबळे सन १९९९ स्थळ पृष्ठ १०

१४)	महाराष्ट्र शासन/ उच्च तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. १०९६/ ७५/ ८८०/९६१/ सारी ५ मंत्रालय विस्तार भवन मुंबई - ४०००३२, दि. २२/०१/१९९८